हरिपाठपराग



डॉ. सुहास पेठे





हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा ।

।।श्री।।

हरिपाठपराग

(श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचं सुबोध, व्यावहारिक विवरण)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* हरिपाठपराग

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : जानेवारी २०१३
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

“ *या पुस्तकाच्या*

मुखपृष्ठावर साकारलेल्या

श्रीरामभक्त कै. आजीच्या
आणि आता पुढं आमच्या
नित्यपूजेत कृपाळूपणे राहिलेल्या
श्री विठ्ठलरखुमाई

आणि ...

‘समओवी’चा आनंदप्रसाद
म्हणून लाभलेल्या
श्री ज्ञानेश्वर माउली

– यांच्या चरणी

श्रद्धापूर्वक ...”

– सुहास पेठे

*

परागानुक्रम

	• परागकण वेचण्यापूर्वी	५
१	प्रपंचातला न्याय परमार्थात	७
२	मन : व्यर्थ व सार्थ	११
३	देवाचं निवासस्थान	१५
४	सारासार विचार	१८
५	प्रमाण ज्ञान	२१
६	अवघड ध्येयाचा सोपा मार्ग	२४
७	प्रपंचाचं धरणं	२६
८	साधूचे संगती तरणोपाय	२९
९	गुरूची गरज	३२
१०	दुर्गमांची आवड	३६
११	घनदाट हरी	३९
१२	वायाचि उपाधी	४२
१३	तरी ते व्यर्थ	४५
१४	मनोमार्ग	४८
१५	विरळा ज्ञानी	५१
१६	एक कळकळीचा प्रश्न	५४
१७	असोनी संसारी	५७
१८	अद्वैताची कला	६०
१९	तैसे घे अनंता	६४
२०	खरं मोलाचं काय ?	६७
२१	वाउगाचि श्रम व्यर्थ जाय	७१
२२	ठायीच समाप्ती	७३
२३	द्वैताचं बंधन	७६
२४	वाया येरझार हरिवीण	७९
२५	हरिनामाचं शस्त्र	८२
२६	स्वजनांच्या उद्धाराचा मार्ग	८६
२७	इहलोकीचा स्वर्ग	९०
२८	नामधारकांची जीवनकळा	९४
	• श्री ज्ञानेश्वरांचा हरिपाठ / ९८	
	• श्री ज्ञानेश्वरांची नवी आरती / १०७	
	• श्री हरिपाठाची नवी आरती / १०८	

● परागकण वेचण्यापूर्वी ...

श्री ज्ञानेश्वर माउलींचा हरिपाठ ही भगवंताची सर्वसामान्य लोकांवरची आणि नाममार्गावरची कृपा आहे याचा अनुभव आज अनेक शतकं येत आहे. हरिभक्तीचं, नामाचं महत्त्व सांगण्याबरोबरच हरिपाठात अनेक महत्त्वाच्या विषयांचा उलगडाही साधलेला दिसतो. त्यात उगीच अवघड मार्गाला जाऊ नये, नामानं प्रपंचाचा गुंता सुटतो, देव त्यागाचा-भावाचा आहे, भगवंत सर्वांठायी आहे, नाम सोपं-सुलभ साधन असूनसुद्धा त्याचं हे महत्त्व ओळखणारे मात्र दुर्लभ आहेत, नामानं स्वत:बरोबरच आपल्या आप्तस्वकीयांचासुद्धा उद्धार होतो, अद्वैताची कला जाणणारे दुर्मीळ आहेत,नामाशिवाय इतर पंथांना जाऊ नये,भगवंताशिवाय जीवन व्यर्थ आहे -अशी अनेक अनुभवसिद्ध सूत्रं श्री माउलींनी हितबुद्धीनं आपल्याला दिली आहेत. हरिपाठातून अधिक विचारासाठी निवडलेल्या अशा काही सूत्रांच्या निमित्तानं घडलेल्या चिंतनाचा समावेश या पुस्तकात केलेला आहे.

काही सूत्रांच्या निमित्तानं घडलेल्या असं म्हणण्याचं कारण असं की, इथं हरिपाठातल्या अशा साऱ्या सूत्रांचा समावेश झालेला नाही. पुस्तकाच्या मर्यादेत शक्य झालेल्या विषयांची निवड इथं केली आहे. दुसरं म्हणजे त्या त्या सूत्रांचं हे थेट विवरण नाही. इथं चिंतन करताना असा नम्र उद्देश ठेवला आहे की, आजच्या आपल्या परिस्थितीचा, घटनांचा विचार करावा, त्या त्या संदर्भात या सूत्रांतला विचार आजही कसा, कुठं उपयुक्त आहे, त्याचा उलगडा व्हावा. त्यामुळं हरिपाठ नुसता पठणात राहाण्याऐवजी व्यवहारात अंमलात आणायला मदत होईल, अशा विचारानं या पुस्तकाची मांडणी केलेली आहे. म्हणून कुठल्या विशिष्ट अभंगाचं निरूपण इथं नाही.

सातारा आकाशवाणीच्या तत्कालीन कार्यक्रम अधिकारी सौ.अरुणा

रानडे यांच्या सूचनेमुळं यातले बारा विषय आकाशवाणीवरून पूर्वी प्रसारित झाले. सौ. रानडे यांचा मी ऋणी आहे. पुढं 'किमया' या संकलनातून ते प्रसिद्ध झाले आहेत. फक्त हा हरिपाठाचा राहिलेला विचार पूर्ण करावा या प्रेरणेतून इतर सोळा विषय आता नव्यानं घेतले आहेत. 'हरिपाठपराग' मध्ये ही सर्व चिंतनं आता एकत्रितपणे प्रसिद्ध होत आहेत. 'किमया'च्या नव्या आवृत्तीत हरिपाठाच्या वरील बारा विषयांऐवजी इतर नवे विषय समाविष्ट झाले आहेतच.

हरिपाठाचं भक्तिपुष्प तर अलौकिक पुष्पच आहे. त्यात असंख्य परागकण आहेत. काही वेचून इथं ठेवण्याचं भाग्य लाभलं ही श्री माउलींची थोर कृपा आहे. ती अखंड राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना. या पुस्तकात अखेरीला संदर्भासाठी, वाचन-चिंतनसाठी हरिपाठाची संशोधित आवृत्ती दिली आहे. तसंच श्री ज्ञानेश्वर माउलींची आणि या अलौकिक हरिपाठाची आरतीही दिली आहे.तिचा समावेश येथील ऑडिओ डीव्हीडी क्र.७ मध्ये करण्यात आला आहे. श्रींच्या आज्ञेनुसार सध्या येथील प्रकाशनं पेठे कुटुंबियांच्या वतीनं अत्यल्प किमतींत प्रकाशित केली जातात. सर्व थरांतल्या जास्तीत जास्त वाचकांपर्यंत ती पोचावीत म्हणून स्वेच्छेनं व सेवाभावानं धडपडणाऱ्या अनेक साधकांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. पुस्तक आकाराला येण्यात नेहमीप्रमाणं सौ. मैथिली, सौ. केतकी, अनघा, मा.श्री. संदेशजी शहा, श्री.प्रकाश फुले इत्यादी अनेकांचा नि:स्वार्थी, प्रेमळ वाटा आहे. या साऱ्यांविषयी मी कृतज्ञ आहे.

हरिपाठावरील या चिंतनांचा उपयोग हरिपाठाचा अधिक विचार घडण्यासाठी व त्याचा आपापल्या जीवनाला आणि कल्याणाला उपयोग करून घेण्यासाठी होवो, ही श्रीचरणी प्रार्थना.

–सुहास पेठे

प्रपंचातला न्याय परमार्थात

श्री ज्ञानेश्वर माउलींची 'हरिपाठ' ही रचना अत्यंत प्रसिद्ध आणि नित्यनेमानं लाखो ठिकाणी म्हटली जाणारी प्रासादिक रचना आहे. अत्यंत सोप्या भाषेत साध्या दृष्टांतांतून महत्त्वाची तत्त्वं आणि भगवंताच्या प्राप्तीचा सोपा मार्ग सांगणारा हा 'हरिपाठ' पठणीय तर आहेच पण तो अंतर्मुख व्हायला लावणारा आहे. त्यातल्या विचारांची व्यवहार्यता आणि व्यापकता विचारात घ्यायचा प्रयत्न केला तर मात्र त्यातून एक वेगळं आणि उपयुक्त दर्शन होतं.

वास्तविक, अशा आध्यात्मिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या छोट्यामोठ्या ग्रंथांचा आपल्या दैनंदिन आयुष्याशी कमी संबंध असतो आणि त्यामुळंच ते फावल्या वेळात, निवृत्तीच्या वयात आणि त्यांतही नुसतेच वाचून ठेवून टाकायचे ग्रंथ असतात, अशा अनेक समजुती पसरलेल्या दिसतात. त्या अर्थातच बरोबर नाहीत. उलट हरिपाठातील विचार, सूचना आपल्या जीवनात, घटनांत कसे निगडित आहेत हे वेगळ्या दृष्टीनं पाहाणं खचितच उद्‌बोधक ठरेल.

अनेकदा आपण ऐकतो की, प्रपंच होतच असतो पण परमार्थ मात्र करावा लागतो. नेहमीच्या अर्थानं ते खरं आहे. पण होतच असतो म्हणजे अगदी श्वास घ्यावा तसा किंवा पाण्यानं उताराकडं जावं तशा सहजतेनं तो आपोआप होत असतो असा एक भाव त्यातून उगीचच निर्माण होतो. त्यामुळं साहजिकच प्रपंच एकदम सोपा, बिनकष्टाचा असतो असा कुणाचा समज होत असला तर तो मात्र चुकीचा आहे.

प्रपंचाइतके अडथळे परमार्थातसुद्धा नसतील. प्रपंचात तर असंख्य प्रसंग, शंभर तऱ्हांची माणसं. बरं कुणाची गरज कधी लागेल सांगता येत नाही. सगळ्यांना पदोपदी, कित्येक गोष्टी मनाविरुद्ध असूनही, सांभाळावं लागतं. दूरचं राहू दे घरातली पतीपत्नी, मुलगासून यांसारखी माणसंसुद्धा कितीतरी न पटणाऱ्या गोष्टी करीत असतात, न आवडणाऱ्या पद्धतीनं वागत असतात. अनेक क्षण आणि प्रसंग असे असतात की, स्वाभिमानी माणसांना वाटतं - पुरे आता ही तडजोड. पण असं असूनही पुन्हा तो जुळवाजुळवीवर येतो. स्वत: शारीरिक, मानसिक कष्ट, त्रास सोसतो पण तो प्रपंच महाकष्टांनी पुरा करतो, निदान आयुष्यभर धडपडत राहातो. त्यामुळं प्रपंच, या अर्थानं, सहजपणे वगैरे होत नसून माणसाचे अपरंपार कष्टच तो व्हायला कारण असतात असं आढळून येईल.

आपण पाहिलं असेल की, अनेकदा माणसांना लग्नाकार्याची आमंत्रणं येतात. कार्यांचा सीझन असतो. त्यात शाळांच्या सुट्ट्या सुरू झालेल्या असतात. ज्याचे-त्याचे दौरे ठरतात. साऱ्या मार्गांवर बसला, रेल्वेला, खासगी गाड्यांनाही गर्दी असते. बरं, ज्यांचं आमंत्रण येतं त्यांचे मोठे, चांगले संबंध असतात असंही अनेकदा नसतं. पण प्रपंचातला व्यवहार असतो, शिष्टाचार असतो. न जाऊन नाराजी ओढवून घेण्यापेक्षा कसंही करून एकदा जाऊन येणं बरं असं माणसांना वाटत असतं.

अशा वेळी माणूस रेल्वेस्टेशनवर जाऊन येतो. तो प्रवास त्यातल्या त्यात सुखाचा असतो. तिथं आरक्षण मिळत नाही. असं झालं तर माणूस खासगी आराम गाडी बघतो. तीही मिळत नाही. अवाच्यासवा पैसे भरण्याची तयारी दाखवूनसुद्धा काम होत नाही. मग साध्या गाडीकडं वळतो. त्यात कशीबशी जागा मिळते. निम्मा प्रवास उभ्यानं करावा लागतो. पुढं जागा होणार असते. त्या आशेवर माणूस उभा राहातो. पुढं अवघडून बसून

अनेक तासांचा, कष्टमय प्रवास करतो, पण तो ती प्रापंचिक गोष्ट करतोच करतो.

तीच गोष्ट अनेकदा शिक्षणांची असते. एका ठिकाणी प्रवेश मिळाला नाही तर दुसरीकडं धावतो. पैशापरी पैसा ओततो. ओळखी काढण्यासाठी खेपा घालतो. तेच नोकरीत असतं. अपमान होतात, बदल्या होतात, चुकीच्या गोष्टी लादलेल्या दिसतात, कामाचा ताण सहन होत नसतो - त्यातून आजारपणं जडतात. त्यावर औषधं घेतो, डॉक्टरांकडं खेपा घालतो, तपासण्या करून घेतो, खर्चवेच करतो पण चिकाटीनं नोकरी-व्यवसाय करतोच. हे असं असंख्य गोष्टींत अविरत सुरू असलेलं आपल्याला हरघडी दिसेल. इतकं करून पुन्हा प्रपंचात सुख मिळत नाही ते वेगळंच !

श्री ज्ञानेश्वर माउलींचा या कष्ट करण्याला आक्षेप नाही. ते तसं करू नका असंसुद्धा म्हणत नाहीत. खरं सुख देणाऱ्या परमार्थाची ते जाणीव करून देतात. पण ती जाणीव झालेले लोकसुद्धा जेव्हा परमार्थातल्या कष्टांबद्दल कुरकूर करतात, तेव्हा मात्र श्री माउली फक्त एकच प्रश्न आपुलकीनं, आर्ततेनं हरिपाठात विचारतात की, प्रपंचात एवढ्या अडीअडचणी असताना चिकाटीनं इतके मरेस्तोवर कष्ट तुम्ही करता तर परमार्थासाठी, देवासाठी, त्याच्या भक्तीसाठी काही कष्ट करायला तुम्ही का तयार होत नाही ?

नाहीतरी हे खरंच आहे की, देवाच्या कामात जरा अडचण आली की, माणूस आमच्या नशिबात नाही, आमचा योग अजून आला नाही, देवाचीच इच्छा नाही, गुरूंनाच आमची सेवा नको असावी - असं म्हणून सुटका करून घेतो. मग ते देवदर्शन असो, नामस्मरण असो किंवा पारायण-वाचन असो. श्री माउलींचा प्रश्न आपल्याला जागं करणारा आहे, आपल्याच कल्याणाच्या तळमळीनं विचारलेला आहे. ते म्हणतात, 'सायासे करिसी

प्रपंच दिननिशी । हरिसी न भजसी कवण्या गुणे ?'

प्रपंचातल्या मोठमोठ्या अडचणींना मार्ग काढणाऱ्या आणि सर्वांवर जमेल तशी मातही साधणाऱ्या आपल्यासारख्यांनी यावर थोडा विचार करावा आणि माउलींच्या प्रश्नामागचा भाव समजून घ्यावा, असं म्हणावंसं वाटतं.

त्यासाठी आपापल्या प्रपंचातले आपले व्यवहार आपणच तपासून बघावेत. मग माउलींच्या प्रश्नामागची तळमळ आणि सत्यता अधिक जाणवेल. मग प्रपंच करण्यातली चिकाटी, कौशल्य व शक्ती त्याच न्यायानं हरिभक्तीत दाखवणं गरजेचं आहे, हे श्री माउलींचं म्हणणं आपल्याला पटेल आणि ते आपल्याच कल्याणाचं आहे, हेही आपल्याला लक्षात घेता येईल.

***

मन : व्यर्थ व सार्थ

अशोकराव आपले रोजचे हिशेबटिशेब लिहीत होते. ते आता निवृत्त होते.घरात आजोबा झाले होते. लहानपणीच आईवडील गेल्यानं त्यांचा सांभाळ त्यांच्या एका जवळच्या मावशीनं केला होता. परिस्थिती अर्थातच गरीबीची होती. मावशीचं पाठबळ होतं पण ते सांभाळ करण्यापुरतंच होतं. घरातल्या इतर नातेवाईकांचं पाठबळ नव्हतं. त्यामुळं त्यांचे लहानपणीही कुठले लाड होत नव्हते. कडक शिस्तीत अन् कष्टांत ते दिवस काढीत. आपली इतर आते-मामे-मावस भावंडं पैशाच्या बळावर कशी चांगलं खातपीत, हौसमौज कशी करीत ते त्यांनी पाहिलं होतं.

त्यामुळं तेव्हापासून त्यांचं मन पैशाच्या बाबतीत जे काटकसरी आणि हिशेबी बनलं ते बनलंच. मावशीचा आधार फार काळ पुरणारा नव्हता. म्हणून लहानपणापासूनच छोट्यामोठ्या नोकऱ्या, व्यवसाय करायला त्यांनी सुरुवात केली. शक्य ती पै अन् पै त्यांनी साठवायला सुरुवात केली. तेव्हा जी हिशोबाची नि ते लिहिण्याची मनाला सवय लागली ती कायमची. आज त्यांचा बंगला होता, गाडी होती, ड्रायव्हर होता. मुलगा-सून उत्तम नोकरीला होती. आता नातू चांगल्या शाळेत होता. त्यांचं मन मात्र अजूनही त्या पै अन् पैच्या विचारानं व्यापलेलं राही.

वारंवार ते आपल्या गुंतवणुकींचा, व्याजांचा, मिळकतींचा हिशेब काटेकोरपणे तपासून बघत. असंख्य बँका-पेढ्या-शेअरदलाल यांच्याकडं खेपा घालीत. रुपया दोन रुपयाची चूक अन् नुकसान त्यांना अस्वस्थ करी. ते पाठपुरावा करीत. मुलगा-सून मोठे होऊन, मिळवते झाले तरी ते

त्यांच्याकडून हिशेब घेत. भाववाढ, जाणारे पैसे यावर त्यांची सततची चिंता नि भाष्यं असत. कुणी स्नेही भेटले तरी तोच विषय असे. मित्र खासगीत त्यांना अशोकराव ऐवजी शोकराव, कंजूषराव, अस्वस्थराव अशा टोपण नावांनी हाका मारीत. कधीकधी त्यांना ते कळे पण ते विचलित न होता हा पैशाचा पाठपुरावा करीत राहात.

आजही हिशेब लिहिताना नातवाकडून एक रुपयाची चूक झाल्याचं त्यांना 'सापडलं' होतं. त्याची सविस्तर 'शहानिशा' करून तो रुपया शाळेत जाताना गडबडीत बसवाहकाकडं नातू विसरल्याचं त्यांनी 'हुडकून' काढलं होतं. तेव्हा एकाच वेळी झोपताना त्यांना तो हुडकण्याचं समाधान तर नातवाच्या गलथानपणाचं दु:ख झालं होतं. उद्यापरवा तो वाहक त्याला भेटून हा रुपया परत मिळवण्यात नातू यशस्वी होईल की नाही या चिंतेनं ते अस्वस्थ होते. त्यातच पहाटे त्यांच्यावर हृदयविकारानं झडप घातली आणि एक अस्वस्थ जीव प्रचंड मालमत्ता मागं ठेवून काळाच्या पडद्याआड गेला. सतत 'पैशात' अडकलेलं एक मन संपलं.

अशी अनेक आयुष्यं आणि मनं आपण पाहिली असतील. त्यांची त्यांची मनं कशानं ना कशानं व्यापलेली असतात. बरीचशी पैशानं असतात. काही मानाच्या अपेक्षांनी, काही माणसांच्या काळज्यांनी, काही आजारपणाच्या विचारांनी, कुणी काही काल्पनिक भीतींनी, चिंतांनी ! मन ज्यांचा ध्यास घेतं, त्यांच्यामागं धावण्यात ते कधीतरी मृत्यूची हात मिळवणी करतं. नव्हे मृत्यूच अखेरचं हस्तांदोलन करतो. कारण संधी मिळाली तर त्या त्या गोष्टींत त्यांनी अजूनही उरलेलं आयुष्य काढलं असतं.

याचा अर्थ कुणी पैशाची किंवा इतर कशाची काळजीच करू नये असा नाहीच पण त्या त्या गोष्टीला तेवढं तेवढं मोल असावं. हेही लक्षात असावं की, सर्व गोष्टी मिळवण्याचं मन हेच साधन आहे कोणतीही

गोष्ट जेव्हा मनानं घेतली जाते तेव्हा ते मन त्या त्या विचारांनी व्यापून प्राप्तीच्या कृती शोधून काढतं-करतं. यशस्वीही होतं. मग तो पैसा असो नाहीतर भगवंत.

पण हे सारं लक्षात आल्यावर मन त्या त्या गरजेच्या गोष्टींसाठी वापरणं आणि पुन्हा तेच मन बाजूला काढून घेणं वेगळं आणि मन त्याच गोष्टींत ठेवून तेच ते करीत राहाणं वेगळं. तशी शरीरधारणेसाठी जेवणात मन घालायची गरज मनाला रोजचीच आहे.

पण म्हणून ते रोज काही चोवीस तास त्यातच घातलेलं नसतं. जेवल्यावर तरी ते बाजूला काढून आपण नोकरीला निघतोच ना? तेच मुलाबाळांचं, तेच घरादाराचं, तेच पाहुण्यारावळ्यांचं आहे. त्या त्या ठिकाणी मन घालणं हे तर गरजेचं असेलच, ते तसं घालावंही लागेल. पण त्यातून मन वर काढावंच.

कारण या गोष्टी अखेर कधीच पुऱ्या होणार नाहीत. कधी टिकणाऱ्या नाहीत. कायमचं समाधान देणाऱ्या नाहीत. याची ओळखही मनुष्यजन्मातच शक्य आहे ना?

ही ओळख जर वेळेत झाली नाही तर मन फक्त एका अशाश्वत गोष्टीतून दुसऱ्या अशाश्वत गोष्टीत जाईल आणि त्यामुळं स्वाभाविकच अस्वस्थ, असमाधानी राहील. ती गोष्ट मनाच्या साहाय्यानं माणूस मिळवील, तात्पुरतं सुखही मिळवील पण शाश्वत सुखाला म्हणजेच भगवंताला पारखा राहील. कारण ते मन कधी शाश्वत भगवंत मिळवण्यात घातलेलंच नाही. मग ते मन श्री माउलींच्या भाषेत 'व्यर्थ' जाईल.

माणसानं हेच मन जर रोज असं शाश्वत भगवंताकडं लावायचं, त्याची ओळख, त्याचा सत्संग, त्याचं स्मरण, त्याच्या प्रकाशात सारे व्यवहार करण्यासाठी द्यायचं ठरवलं तर हेच मन भगवंतमय

होईल. सारे व्यवहार अधिकच अचूक करील. पण त्याच्या कुठल्याच लाभहानीनं अस्वस्थ होणार नाही. तेच मन हरिमय, भगवंतमय असल्यानं वाया जाणार नाही, व्यर्थ जाणार नाही. अखेर स्वस्थपणे सारी कर्तव्यं यथाशक्ती करून आनंदानं जगाचा निरोप घेईल.

मग कुणा अशोकरावांचे शोकराव होणार नाहीत. पण त्यासाठी श्री माउली म्हणतात तसं 'हरिवीणे मन व्यर्थ जाय।' याची ओळख फार लवकर व्हायला हवी हेच खरं.

***

देवाचं निवासस्थान

एखाद्या माणसाला भेटायचं असलं तर स्वाभाविकपणे आपण तो कुठं राहातो त्याचा शोध घेतो. मग जायचा मार्ग, वाहन वगैरे गोष्टी ठरवतो, माहीत करून घेतो. हे काम माणसांच्या बाबतीत एकप्रकारे जरा सोपं असतं. एक तर माणूस दृश्यातला - हाडामांसाचा - निश्चित स्वरूपाचा. दुसरं तो कितीही लहान मोठा झाला तरी तो कुठल्या ना कुठल्या ठिकाणी, कुणाच्या तरी घरात राहातो. कुणाशी तरी संबंधित असतो. अशा कुठल्या ना कुठल्या धाग्यानं त्याचा ठावठिकाणा शोधणं-अगदी महानगरातसुद्धा शक्य असतं. अप्रसिद्ध, प्रसिद्धिपराङ्मुख माणूससुद्धा आपण शोधून काढतो.

पण देवाच्या बाबतीत मात्र हे इतकं सोपं खचितच नाही. एक तर तो मूळ निर्गुण. त्याला ना आकार, ना आकृती. ना ठाव ना ठिकाणा. आपल्याला ज्या ज्या गोष्टी भेटीसाठी लागतात - नाव, पत्ता, खूण, नातेवाईक, संबंधित माणसं - असंही काही त्याच्याबद्दल मिळत नाही. मिळावं वाटलं, कुणी सांगितलं तरी खात्री वाटत नाही. तरीही एखादं प्रचंड पण उत्तमपणे चालणारं कार्यालय, कारखाना, व्यवसाय पाहिला - तो प्रत्यक्ष चालवणारे कामगार, तिथली व्यवस्थापक माणसं - सारं पाहिलं तरी तो कारखाना, कार्यालय कुणाचं, त्याची निर्मिती कुणी केली, हे औत्सुक्य सामान्य व्यवहारात साध्यासाध्या माणसालाही वाटतं. अर्थात त्यासाठी त्या त्या ठिकाणचा व्यापक कारभार, यंत्रणा लक्षात येण्याइतपत दृष्टी, समजूत हवीच. मग हे औत्सुक्य माणूस पुरं करण्याचा प्रयत्न करतो.

वरवर पाहाताना हे त्यालाही दिसतं की, वेगवेगळ्या विभागात, वेगवेगळ्या स्थानावर वेगवेगळी माणसं, यंत्रतंत्राच्या मदतीनं हे काम करताहेत. पण ते कुणी आले, गेले, बदलले, निवृत्त झाले, नसले तरी हा व्याप अव्याहत चालू राहातो. याचा अर्थ, समोर दिसत नसला, कुठं दूर गावी असला तरी कुणी अंतिम कर्ता, नियामक त्याला आहे. तो शोधावा, त्याचं कौतुक करावं, त्याची आठवण ठेवावी असं वाटतं.

असंच मोठ्या प्रमाणावर पाहाताना मानवी देहाचं यंत्र, अवाढव्य निसर्गव्यापार, माणसाचं विलक्षण अंतर्याम, महाविलक्षण कर्मफलव्यवस्था- असं सारं पाहाणाऱ्याला खऱ्या कर्त्याची, नियामकाची, निर्मात्याची, वेळी संहारकाची, सर्व मूल्यांच्या-व्यवस्थेच्या आधारस्तंभाची उत्सुकता लागते. ती देवाची उत्सुकता होय. या साऱ्या निर्मितीत, व्यवस्थेत, संहारात तो कुठंच व्यक्त रूपात दिसत नसला तरी त्याचा ठाव घ्यावा, त्याला भेटावं, असं कुणा जिज्ञासूला वाटलं तर ते उचित तर आहेच पण ते मोठ्या भाग्याचंच म्हणावं लागेल. पण ही उत्सुकता आधी सांगितलेल्या कारणांसाठी पुरी करणं तितकं सोपं नाही, हे कुणाच्याही लक्षात येण्यासारखं आहे.

तरीही अशा वेळी अशा भगवंताचा, देवाचा ठावठिकाणा निश्चिततेनं हरिपाठात सांगितला गेला आहे, हे ध्यानात घेण्याजोगं आहे. श्री ज्ञानेश्वरांचे शब्द साधार व स्वानुभवाचे आहेत. ते म्हणतात, -द्वारकेचे राणे पांडवाघरी- भगवंताचं निश्चित निवासस्थान म्हणजे त्यांच्या अनन्य भक्ताचं घर किंवा त्याचं हृदय हे होय.

आपला स्वत:चा अनुभवही सांगतो की, ज्याचं आपल्यावर आत्यंतिक, निरपेक्ष, निखळ प्रेम असतं तो आपल्याला आवडतो. नुसताच आवडतो असं नव्हे तर त्याच्याकडं आपण जाऊन त्याच्या सहवासात राहावं असं आपल्याला वाटतं. देव हा सर्व आदर्श गुणांचा समुच्चय आहे.

म्हणून देवावर आत्यंतिक प्रेम म्हणजे स्वधर्मावर, न्याय - नीती - शांती - दया अशा गुणांवर आत्यंतिक प्रेम आणि असं प्रेम करणं म्हणजे नुसता अशा गुणांचा उद्‌घोष करणं नव्हे तर ते प्रत्यक्ष आचरणात आणणं. अशा तऱ्हेनं देवावर प्रेम करणारे देवाला आवडतात इतकंच नव्हे, तर साहजिकच देवाला तिथं येऊन राहावं असं वाटतं. पांडवांनी ते केलं. त्यासाठी त्यांनी हालअपेष्टा सोसल्या पण न्याय-शांती-स्वधर्म म्हणजेच-देव सोडला नाही. म्हणूनच भगवंत त्यांच्या घरी वनवासातही राहिले आणि राजवाड्यातही. अशा तऱ्हेनं भगवंत जवळ राहाणं म्हणजे असं आचरण करणाऱ्याला धैर्य-बळ मिळणं आणि त्याचा अंतिम विजय व उद्धार होणं.

म्हणून असं सद्‌गुणांचं आचरण तर जरूर करावंच पण सर्वांत मोठा सद्‌गुण म्हणजे भगवंताची आठवण. ती आठवण आपली कर्तव्यं करताना ठेवणं, त्याचं नाम घेणं, गुणगान करणं हे जो करील त्याच्या घरी, मनात भगवंत आणि त्याच्या रूपानं शांती आणि समाधान वास करील. असे असंख्य भक्त आपण पाहातोच.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं, देव निर्गुण असला तरी तो ज्या ठिकाणी राहातो ते भक्त सगुणसाकार आहेत, आपल्यात आहेत. त्यामुळं देवाच्या अशा निवासस्थानी त्याला गाठणं, भेटणं शक्य आहे. इतकंच नव्हे तर आपणसुद्धा स्वतः देवाचं निवासस्थान बनणं शक्य आहे.

***

सारासार विचार

प्रत्येक माणसाची आयुष्यभर अविरत धडपड चालू आहे. हृदय जसं एक विशिष्ट ठेका धरून आत अखंड कार्य करीत असतं तसा माणूस एक विशिष्ट ठेका धरून बाहेर सकाळपासून रात्रीपर्यंत कर्मं करीत असतो. हृदयाचं कार्य तर रात्री झोपेतही तितक्याच अविरतपणे चालू असतं. ते हृदय माणसाचा, त्याच्या शरीराचा भाग असला आणि त्या अर्थानं त्याच्याच कर्मांच्या अंतर्गत ते येत असलं तरी जिवंत राहाण्याचा एकमेव हेतू असलेलं, ते एकमार्गी कर्म आहे. शिवाय खऱ्या अर्थानं माणूस त्याचा कर्ताही नाही. पण त्याच्या साहाय्यानं माणूस बाहेर जो कर्मांचा डोंगर उभा करतो तो मात्र असा एकमार्गी, सरळ, निर्हेतुक नाही. त्याच्या कर्मांत असंख्य हेतू, प्रकार, गुंतागुंत आहे. त्याला स्वत:लासुद्धा त्याच्या साऱ्या कर्मांचं स्पष्टीकरण किंवा भूमिका नीट सांगता येते असं नाही. अनेकदा तर ती फारशी सुसंगत असते असंही नाही.

यात असं आढळून येईल की, माणसाच्या मनातल्या विचारांच्या ठेवणीवरून कर्मांच्या या साऱ्या पार्श्वभूमीवर किंवा हेतू-प्रकार यांच्या वैविध्यावर थोडाफार प्रकाश पडतो. जशा प्रकारचे विचार मनामध्ये घडतात, मूळ धरतात - त्यांनुसार माणसाच्या कर्मांच्या व्यापाराची दिशा राहाते. एखाद्याच्या मनात जमीनजुमल्याचे विचार घोळत असतील तर त्या विचारांनी मूळ धरणं, जमिनींची माहिती काढणं, त्यासंबंधित माणसांशी संपर्क ठेवणं, त्यासाठी पैशाच्या जुळवाजुळवीत असणं, हळूहळू गुंठ्यानं,एकरानं जमिनीत प्रत्यक्ष भर घालणं, त्यासाठी वेळ पडल्यास उद्योग - व्यवसाय वाढवणं,

सर्वत्र खेपा घालणं - अशी असंख्य कर्मं त्या विचारांमुळं घडतात असं दिसतं.

त्यातही या विचारांना मनात स्थान मिळण्यामागं त्या त्या विषयांना मनानं दिलेलं महत्त्व कारणीभूत असतं असं लक्षात येईल. समजा एखाद्याच्या मनात पैशाच्या विचारांनी मूळ धरलं असलं तर त्याच्याही मागं 'पैसा' या विषयाला त्या वेळी तरी मनानं दिलेलं महत्त्वपूर्ण स्थान कारणीभूत असतं. त्यालाच आपण 'मूल्य' म्हणतो. पारमार्थिकदृष्ट्या अशा 'मूल्यव्यवस्थे'वर विचार आणि विचारांनुसार व्यवहार, कृती, कर्मं एवढी एक माणसाच्या वागण्यातली संगती दाखवता येते. एकदा पैसा हे मूल्य ठरलं, त्यांतही प्रधान मूल्य ठरलं की, मनाची सारी विचारशक्ती त्याच्याभोवती गोळा होते. मग भल्याबुऱ्या मार्गानं तो मिळवण्याकडं, साठवण्याकडं, टिकवण्याकडं कल होतो आणि पुढं तशा प्रत्यक्ष कर्मांनी माणसाचं जीवन व्यापून जातं. पण हेच जर एखादं आजारपण आलं आणि अत्यंत 'मूल्य'वान असलेला - वेळी माणसं-नीतिनियम-कर्तव्यं बाजूला ठेवून अमाप संचय केलेला - पैसा जवळ असला तरीही जर त्या आजारापासून तो वाचवू शकत नसेल तर त्याचं फोलपण जाणवतं. कदाचित त्यापेक्षा बरं करणाऱ्या औषधाचं, निष्णात वैद्याचं आणि वेळी त्या आजारावरही ज्यांची सत्ता चालते अशा गुरूंचं-निसर्गाचं-देवाचं 'मूल्य' एकदम प्रधान होतं. आता पैशाची आसक्तीही सुटते. कारण 'मूल्य' बदललं. पहिल्या मूल्याचं फोलपण,'असार'पण लक्षात आलं.

म्हणून माणसाच्या कृती तपासायच्या, बदलायच्या, विधायक, मोजक्या व्हायच्या तर त्याची मूल्यव्यवस्था, त्यानुसार विचार - व्यवस्था 'सारासार' विचार करते की नाही आणि तो अंमलात आणते की नाही, ते पाहाणं किती महत्त्वाचं आहे, ते लक्षात येऊ शकेल. ज्यांचं मूल्य

काळ - परिस्थिती - घटना अशामुळं बदलत नाही,अशा मूल्यांना धरून कृती करावी. हे सार-असार विचार करून 'सार विचाराला' म्हणजेच शाश्वताला, विधायक, कल्याणाच्या मूल्यांना धरून कृती करणं होय. अशा सारभूत विचारांत माणुसकी, श्रद्धा, करुणा, प्रेम, शांती अशी अनेक मूल्यं येतील. तर असारात पैसा, सत्ता, स्थावरजंगम गोष्टी, इंद्रियांची सुखं - अशा अनेक बदलणाऱ्या, नष्ट होणाऱ्या गोष्टी येतील. या गोष्टींनी अनेकदा स्वत:तला आणि समाजातला क्षोभ व अशांती वाढते. श्री माउली म्हणतात की, असा 'सारासार विचार करून त्यानुसार वागणं म्हणजेच हरिपाठ करणं, खऱ्या अर्थानं उपासना करणं, नाम घेणं होय.'

आता ही सारभूत मूल्यं मनात स्थिर झाली तर तसे विचार व कृती होतील. ती स्थिर करायला मन शांत व स्थिर व्हायला हवं. या कामी भगवंताचं नाम किंवा हरिपाठ सर्वांत उपयुक्त आहे. नामामुळं सर्वश्रेष्ठ व सारभूत असलेल्या 'भगवंत' या मूल्याचा सातत्यानं बोध व जागरण मनामध्ये होतं.

म्हणून एका बाजूनं नाम सातत्यानं घेऊन, हरिपाठ सातत्यानं म्हणून सार विचाराला उपयुक्त अशी मनाची पार्श्वभूमी तयार करणं आणि दुसऱ्या बाजूनं आपले विचार असारात गुंतत नाहीत ना, ते सारभूत गोष्टींनाच धरून राहातात व तशा कृती होतात ना, यावर सतत लक्ष ठेवणं असा दुहेरी कार्यक्रम साधकाला उपयोगी ठरेल. मग खऱ्या अर्थानं 'सारासार विचार हरिपाठ।' होईल.

***

प्रमाण ज्ञान

माणसाचं जग बरंचसं 'आधारा'वर चाललेलं जग असतं. याची जाणीव आपल्याला असो किंवा नसो. माणसांच्या संबंधांच्या दृष्टीनं पाहिलं तर बाळपणी आईवडिलांच्या आधारावर, पुढं शाळेत शिक्षक -शिक्षिकांच्या, नंतर मित्रमंडळींच्या, पुढं व्यावसायिक-सहकारी-पत्नी-पती-मुलं-समाज अशा असंख्य आधारांवर त्याचं जीवन घडतं, चालतं तीच गोष्ट इतर असंख्य बाबतीतही असते. घराच्या आधारानं मनुष्य उन्ह-पावसापासून सुरक्षित राहातो, शस्त्राच्या आधारानं लढतो, शब्दांच्या आधारानं व्यवहार करतो, विविध नियमांच्या आधारानं आचरण करून आपापलं ध्येय गाठतो.

या साऱ्या गोष्टी करायला पुन्हा आधार कशाचा असेल तर तो 'ज्ञाना'चा. घर असो, शस्त्र असो, नाहीतर शब्द असो त्यांच्या आधारानं जरी त्याचा व्यवहार होणार असला तरी ते सारे आधार गवसायला, व्यवस्थितपणे वापरायला, उपयोगाला यायला - लागतं ते त्यांचं 'ज्ञान'. ते ज्ञान नसलं तर परक्या प्रांतात गेलेला आणि तिथली भाषा न जाणणारा, तिचं ज्ञान नसलेला माणूस सांगायचं असून - विचारायचं असूनसुद्धा तिथल्या भाषेचं, त्याला जे सांगायचं आहे त्यासाठी लागणाऱ्या शब्दांचं 'ज्ञान' नसल्यामुळं हतबल होतो. त्याला 'शब्दां'चा आधार हवा असतो, तसा आधार हवा हे त्याला माहीत असतं पण त्या प्रांतात चालणारे, योग्य असलेले असे शब्द मात्र त्याच्याकडं नसतात, त्या शब्दांचं 'ज्ञान' नसतं म्हणून तो त्याचा साधासाधा व्यवहारसुद्धा करू शकत नाही, हे आपल्याला अनुभवायला आलं असेलच.

त्यामुळं तसा 'आधारां'चाच विचार केला तर त्यांत हा 'ज्ञाना'चा आधार फारच मूलभूत, महत्त्वाचा आधार आहे, हे लक्षात येईल. म्हणून माणसाच्या आयुष्यात 'ज्ञाना'चं स्थान असाधारण आहे. त्या 'ज्ञाना'च्या आधारावर इतर आधार मिळून, सुगम होऊन माणसाला आपलं जीवन जगता येतं, सफल करता येतं.

याच दिशेनं थोडा, आणखी विचार केला तर लक्षात येईल की, या 'ज्ञाना'तही पुन्हा नुसतं 'ज्ञान' एवढाच आधार पुरेसा नाही. जे ज्ञान आधाराला घ्यायचं ते 'सत्य', 'आनुभविक', 'प्रमाणित' असं असावं लागतं. असं खात्री असलेलं, खरं ठरणारं ज्ञान मिळणं हे फार महत्त्वाचं असतं. माणूस स्वत:सुद्धा नकळत अशी ज्ञानाच्या खात्रीची काळजी घेत असतो. ती खात्री असल्यावरच माणूस त्या ज्ञानाच्या आधारानं व्यवहार करू शकतो आणि ते ज्ञान 'खात्रीचं, प्रमाणित' असल्यानं त्याचा तो व्यवहार यशस्वी होतो. जसं एखादी नवीन भाषा शिकताना एखाद्या विशिष्ट वस्तूला 'अमुक' म्हणतात, त्याला असा 'शब्द' आहे, हे ज्ञान असलं तरी ते 'खरं' असावं लागतं. खरं असलं आणि तो शब्द वापरला तर तीच विशिष्ट वस्तू आपल्याला मिळते. ज्ञान अप्रमाण असलं, चुकीचं असलं आणि तो शब्द वापरला तर भलतीच वस्तू समोर येते !

हे ज्ञान प्रमाणित करण्याची प्रत्येकाची नकळत एकेक प्रक्रिया असते. कुणी म्हणेल ते छापलेलं आहे म्हणजे बरोबर, कुणी म्हणेल ते अमक्यानं सांगितलं आहे ना म्हणजे ते बरोबर - असे असंख्य प्रकार आढळतील. मग जास्ती प्रकार झाले की, त्यांतला नक्की कुठला 'अधिक' प्रमाण ? यावरही मतं असतात. तीही पुढं स्वानुभवानं बदलू शकतात. मग अधिक विचार केला तर असं लक्षात येईल की, सर्वच मानवी ज्ञान किंवा त्याची खात्री करण्याच्या पद्धती यांना आपापल्या परीनं मर्यादा आहे.

अमुक एका आधारावर ते कायमचं, शाश्वतपणे खरं ठरणारं असेल तर ते ज्ञान खऱ्या अर्थानं 'प्रमाण' ज्ञान म्हणता येईल. तसा विचार केला तर असं ज्ञान हे एका अर्थानं फक्त 'दैवी' ज्ञान असेल.

श्री ज्ञानेश्वर माउली तर स्वत: अनुभवाचे आणि ज्ञानाचे अथांग सागर आहेत. त्यांनी व्यक्त केलेलं ज्ञान आज शतकानुशतकं झाली तरी शाश्वत आहे, सत्य आहे. ते ज्ञान आपण आजही प्रमाण धरतो. पण ते स्वत: कोणत्या ज्ञानाला प्रमाण मानतात याची जिज्ञासा हरिपाठात पुरी होते.

श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात की, त्यांच्या गुरूंनी दिलेलं ज्ञान त्यांनी 'प्रमाण' ज्ञान मानलं. खात्रीचं, सत्य मानलं. त्यांचे आत्मसाक्षात्कारी गुरू श्री निवृत्तिनाथ हे जे सांगतील, जे ज्ञान देतील ते ज्ञानेश्वरांना प्रमाण आहे असं ते म्हणतात. यांतून आत्मानुभवी, दैवी ज्ञानानं संपन्न श्री गुरू निवृत्तिनाथांच्या ठिकाणच्या शाश्वत ज्ञानाची थोरवी तर एकीकडं उघडच आहे, पण आपल्या गुरूंच्या ज्ञानाला आणि म्हणण्याला अंतिम सत्यत्व देऊन निष्ठेनं तसं जगणाऱ्या शिष्योत्तम माउलींची थोरवीही शिकण्यासारखी आहे.

आपल्याआपल्या गुरूंचं म्हणणं, ज्ञान, आज्ञा आपल्याला ज्ञानेश्वरांसारखी 'ज्ञानदेवा प्रमाण । निवृत्तिदेवी ज्ञान' अशी वाटते का, याचा शोध आपल्याला या अभंगाच्या निमित्तानं घेता येईल. त्यातून गुरूशिष्य संबंध अधिक प्रगत, उन्नत होतील आणि आपल्यालाही प्रमाण ज्ञानाचा लाभ होईल, यात शंका नाही.

***

अवघड ध्येयाचा सोपा मार्ग

भगवंत ही जगात सर्वांत श्रेष्ठ वस्तू आहे. असं अशासाठी म्हणायचं की, ती अशी एकच वस्तू आहे की, जी मिळवल्यावर इतर काहीही मिळवायचं उरत नाही. म्हणजेच भगवंत मिळवल्यानं आपलं पूर्ण समाधान होतं, जे तसं जगातलं दुसरं काहीही मिळवलं तरी येऊ शकत नाही. इतर साऱ्या गोष्टी असल्या तरी एकतर त्या अपूर्ण असल्यानं त्या देतात ते समाधानही अपुरंच असतं आणि त्या मिळवल्यावर इतर नसलेल्या गोष्टींची जाणीव होते आणि ओढ लागते. असं ज्या वस्तूच्या प्राप्तीनंतर होत नाही ती वस्तू म्हणजे भगवंत होय. त्यासारखी दुसरी वस्तू म्हणजे सद्‌गुरूच होत. खऱ्या शिष्याला गुरू भगवद्‌रूपच असतात. त्यामुळंच त्यांची प्राप्ती झाली की, काहीही मिळवायचं राहात नाही, पूर्ण समाधान होतं.

आता एवढी सर्वोच्च महत्त्वाची गोष्ट मिळवायची, एवढं अवघड ध्येय साध्य करायचं म्हणजे त्याचा मार्ग, त्यासाठी लागणारे कष्ट, करावी लागणारी साधनंही तितकीच मोठमोठी आणि कष्टप्रद असतील असं वाटतं. असं वाटणं स्वाभाविक असलं तरी ते खरं नाही, हे आश्चर्य व आनंदकारक आहे. प्रथमदर्शनी तर अविश्वसनीयही आहे. आपल्या भाषेत एखादी आय.ए.एस्. सारखी परीक्षा सर्वांत सोपी असून तिला कुठलाच अभ्यास लागत नाही असं म्हटल्यासारखं आहे. सामान्य माणसाला ते पटणंही कठीण आहे.

म्हणूनच श्री ज्ञानेश्वर माउली बजावतात की,भगवंताची प्राप्ती ही अशा कुठल्या कष्टप्रद साधनेनं होते असं मानणं हा भ्रम आहे. तो फक्त

भावभक्तीनंच जाणला जाऊ शकतो आणि नामासारख्या सोप्यात सोप्या साधनानं मिळवला जाऊ शकतो. भगवंत मिळवण्यासाठी जेव्हा कठीणात कठीण साधनं सांगतात तेव्हा ते सामान्य माणसाला पटतं, तो ती आचरायला जातो. पण असलं काही करणं म्हणजे आपलीच फसवणूक आहे. त्याची गरज नाही. असली कठीण कठीण साधनं म्हणजे जमिनीवर पडलेला पारा हातानं गोळा करायला जावं तशी आहेत. त्यात साधनांचे अकारण सायास होतात. उलट अनेकदा भगवंत दूरही जातो.

वास्तविक भगवंत हा भावाचा म्हणजे जाणण्याचा व प्रेमाचा विषय आहे. 'भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे ।' एखाद्याला नि:स्वार्थ प्रेम करता आलं तर भगवंताची झलक कळू शकते. अशा निरपेक्ष प्रेमाला लौकिक किंवा बाह्य कष्ट नसतात. उलट माणसाला अपेक्षाच नसल्यामुळं तो प्रेम करताना स्वत: कष्टाऐवजी आनंदात असतो. भगवंताचं स्मरण करणं, त्यासाठी त्याचं नाम घेणं म्हणजे भगवंतावर अकारण, निरपेक्ष प्रेम करणंच आहे. त्यानं भगवंत लवकर आणि पूर्ण वश होतो. त्यात गुरुआज्ञेप्रमाणं केलं तर दुधात साखर आहे. कारण तसं आचरण केल्यानं श्री माउली म्हणतात की, श्री गुरू निवृत्तिनाथांच्या कृपेमुळं, आज्ञापालनामुळं, प्रेमामुळं तळहातावरच्या आवळ्यासारखा 'करतळी आवळे तैसा' हरि माझ्या हाती आला.

हा अनुभव लक्षात घेतला तर हे अवघड कष्टांचे मार्ग चालण्याच्या कल्पना टाकून नाम - प्रेम - गुरुआज्ञापालन अशा सरळ सोप्या मार्गानं अवघड ध्येय असलेला भगवंत थेट गाठावा, हा श्री माउलींचा अभिप्राय साधकांना संजीवनी देणारा ठरेल, आश्वासक ठरेल.

***

प्रपंचाचं धरणं

अनेक वेळा माणसाच्या मनात येतं की, जरा निवांतपणा मिळावा. हा व्याप फार झाला आहे, थोडा कमी व्हावा, काही करू नये-स्वस्थ बसावं आणि हे काही स्मशानवैराग्य नव्हे, बरं का! खरंच तसं वाटत असतं. पण असं वाटलं तरी प्रत्यक्षात किती जणांचा व्याप कमी होतो? किती लोक खरंच निवांत होतात-स्वस्थ राहातात ? असं म्हटलं तर मात्र फारच कमी असं उत्तर द्यावं लागतं. मग खरोखर वाटूनसुद्धा असं का होत असावं, हा शोधून काढण्यासारखा विषय आहे !

हाच विषय अधिक शोधण्यापूर्वी आपण असंच एक दुसरं उदाहरण पाहू. अनेकांना असं वाटतं की आपण शांत जीवन जगावं. आपल्याला शांतता हवी आहे. पण म्हणून एखाद्याला खरोखरच सुट्टी दिली, खायलाप्यायला दिलं आणि बैस शांत म्हणून सांगितलं तर त्यानं आता शांतपणे राहायला काही हरकत नाही, पण प्रत्यक्ष तसं घडत नाही. तशी शांतता हवीशी वाटली तरी प्रत्यक्षात ती आली तर त्याला अस्वस्थता येते.

तो टीव्हीच लावील, वर्तमानपत्र वाचेल, मासिक चाळील, उद्योग राहिलाच नाही तर कुणाला तरी दारावरून जाणाऱ्याला हाक मारील, नसेल तर आपणच कुणाकडं जाऊन बसेल. त्या वर्तमानपत्रात काही त्रासाचा विषय आला असला की त्यानं त्रासून जाईल किंवा अशा एखाद्याकडं जाऊन बसलं आणि त्यानं डोक्याला काही त्रास निर्माण केला की घरी येऊन डोकं धरून बसेल, म्हणेल काय डोक्याला ताप आहे ! पण खरं सांगायचं तर असा ताप झाल्यावर त्याला नकळत आत कुठंतरी त्या

स्वस्थतेच्या किंवा शांततेच्या तापापासून जरा बरं वाटलेलं असतं ! हे प्रथमदर्शनी थोडं धक्का देणारं पण खरं आहे.

एखाद्या ऑफिसमध्ये सारा दिवस शांतपणे जायला लागला, कुठं काही कुरबूर नाही, दंगा नाही, हसणं खिदळणं नाही, भांडणतंटाही नाही, वादवादंग नाही म्हटलं तर कितीकांना अस्वस्थता येते-त्यातलं हसणं खिदळणं एकवेळ सोडा पण इतर गोष्टी नकोशा वाटणाऱ्याच आहेत. पण त्या नसल्या तरी करमत नाही याला काय म्हणावं ?

याला कारण विनोबा म्हणत तसं आपल्याला स्वभावत:च अशांततेची सूक्ष्म आवड आहे. म्हणूनच शांत जीवन जगायची सोय झाली तरी ते पचवता येत नाही. आपल्याला अशांततेची सूक्ष्म ओढ, सवय आहे. तो आपला स्वभाव आहे. वरवर न पटण्यासारखं असलं, तरी हे तथ्य आहे. सतत अशांततेत राहूनराहून मनालाही त्या अशांततेचं प्रेम लागलं आहे.

आपल्याला निवांतपणा मिळावा वाटलं किंवा व्याप कमी करावा वाटलं तरी प्रत्यक्षात तसं होत नाही. याबाबतीत आपली तीच अवस्था आहे आणि तीच गोष्ट आपल्या 'प्रपंचाच्या स्वभावां'ची आहे. कोणतीही गोष्ट चारपाच जणांनी एकत्र येऊन करायची आहे, सतत धावत राहायचं आहे, सारखं काहीतरी करीत राहायचं आहे - अशा साऱ्या गोष्टींतून आपल्या प्रपंचाचा स्वभाव व्यक्त होतो. तो व्यवहारात, प्रपंचात ठीकही आहे.

पण होतं काय की, हा स्वभाव इतका खोल मुरतो की प्रपंचापलीकडं मनानं जाताना, भगवंताकडं जाताना तो आपल्याच आड येतो. म्हणून मग भगवंताकडं जातानासुद्धा नकळत अनेक वस्तू, खूप माणसं, खूप व्याप याची गरज मन गृहीत धरतं. खूप मंदिरं बांधावी, पारमार्थिक संघटना

काढाव्या, पारमार्थिक बैठकासुद्धा एखाद्या राजकीय सभेसारख्या प्रचंड गर्दीच्या असाव्यात, म्हैसूर-बेंगलोरला गेल्यासारखं हरिद्वार-हृषिकेश करायला हवं, भजनालासुद्धा खूप वाद्यं, खूप साथीदार, खूप ऑडियन्स हवा त्याशिवाय भगवंतापर्यंत ते पोचणार नाही, अशी काही समजूत होते.

वास्तविक निरुपाधिक, निरपेक्ष भगवंताला यानं जरी काही बिघडत नाही तरी भगवंताला त्याची गरज असणं तर्कदृष्ट्यासुद्धा शक्य नाही. पण आपल्या घराशी, मनाच्या दाराशी प्रपंचानं, त्यानं तयार केलेल्या स्वभावानं- जे 'धरणं' धरलं आहे ते धरणं आपल्याला इतका शुद्ध विचारच करू द्यायला तयार होत नाही.

अर्थात हे 'प्रपंचाचं धरणं' सोडवायला श्री ज्ञानेश्वर माउलींच्या मते 'हरिजप, हरिनाम' हा सोपा नि सूक्ष्म उपाय अनुभवसिद्ध आहे. फक्त आचरून पाहिला पाहिजे. मग माउली म्हणतात तसं 'हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे' हे शक्य आहे आणि त्यामुळंच खऱ्या आनंदाचा अनुभव घेणंही आपल्याला शक्य आहे.

***

साधूचे संगती तरणोपाय

रोमच्या चित्रकाराची एक प्रसिद्ध गोष्ट आहे. त्याला एकदा एका निरागस, पवित्र माणसाचं चित्र काढायचं होतं. त्यासाठी तो असे भाव असलेल्या एका लहान मुलाच्या शोधात होता. बराच काळ शोध घेतल्यावर त्याला अगदी तसे भाव असलेला मुलगा मिळाला. त्याला समोर बसवून त्यानं अत्यंत पवित्र, निरागस, सरळ प्रेममूर्तीचं चित्र साकार केलं. ते इतकं प्रभावी होतं की त्या चित्राच्या प्रती विकून त्याला खूप पैसाही मिळाला.

पुढं अनेक वर्षं गेली. त्यानं दरम्यान अनेक प्रकारची चित्रं बनवली. वीसपंचवीस वर्षांनी त्या निरागसतेच्या चित्राची त्याला आठवण झाली नि त्याला वाटलं की, त्याच्या अगदी विरोधी अशा क्रूर माणसाचं चित्र आपण का उभं करू नये ? अशी व्यक्ती अर्थात आजूबाजूला मिळण्यापेक्षा गुन्हेगारीच्या जगतातच मिळेल. म्हणून त्यानं वेगवेगळ्या तुरुंगात शोध घ्यायला सुरुवात केली.

अखेर एका तुरुंगात त्याला एक क्रूर, धूर्त, स्वार्थी, अतिलोभी असा एक गुन्हेगार सापडला. त्याचा चेहरा म्हणजे या साऱ्या भावनांचं प्रतीकच होता. चित्रकारानं त्या गुन्हेगाराला चित्रासाठी पोज द्यायची विनंती केली. तेव्हा चमकून त्या गुन्हेगारानं 'कशासाठी ?' म्हणून विचारणा केली. त्यावर चित्रकारानं आपल्या त्या जुन्या चित्राची, आपल्या सध्याच्या कल्पनेची सारी माहिती दिली. त्यावेळच्या त्या निरागस मुलाच्या चित्राची प्रतही त्याला दाखवली आणि म्हटलं, 'याच्या दुसऱ्या टोकाची वाईट अवस्था दाखवणारं चित्र मला आता काढायचं आहे !'

ते चित्र पाहिलं मात्र, त्या गुन्हेगाराचा चेहरा हळूहळू बदलायला लागला आणि काही क्षणातच तो हमसाहमशी रडायला लागला. चित्रकाराला काहीच कळेना म्हणून त्यानं गुन्हेगाराला कारण विचारल्यावर तो गुन्हेगार म्हणाला, 'अहो, हे चित्र माझंच लहानपणचं चित्र आहे !' दुःख आणि आश्चर्यानं थक्क होत चित्रकारानं विचारलं, 'अरे मग तुझी अशी अवस्था कशी काय झाली ?' गुन्हेगार स्फुंदतच म्हणाला, 'वाईट संगतीमुळं !'

माणसाच्या आयुष्यात संगत काय करू शकते हे यातून फार विदारकपणे स्पष्ट होतं. पण त्यातूनच वाईट संगतीनं चांगल्याचं वाईट होत असेल तर चांगल्या संगतीनं वाईटाचंही चांगलं होऊ शकतं हे कळतं. एखादा अत्यंत अट्टल गुन्हेगारसुद्धा एखाद्या उत्तम संगतीनं सारी वाईट वागणूक सोडून देऊन सामान्य सरळ मार्गानं जायला लागू शकतो हाही अनुभव आपण पाहातो.

माणूस समाजप्रिय प्राणी आहेच. त्यामुळं बिनसंगतीचं राहाणं त्याच्या स्वभावातच नाही, माणसाची मुळात जी वाढ होते तीसुद्धा आईवडील, शेजारीपाजारी, मित्रमंडळी, नोकरदार, व्यावसायिक अशा वेगवेगळ्या माणसांच्या संगतीतच. म्हणूनच लहानपणापासून बाकीची कळती माणसं मुलाच्या संगतीबद्दल - ती संगत चांगल्या, अभ्यासू, निर्व्यसनी मुलांची कशी राहील याबद्दल जागरूक असताना दिसतात. याचबरोबर आपल्याला हेही व्यवहारात नेहमी आढळतं की, त्या त्या विषयासाठी त्या त्या विषयातल्या माणसांची संगत धरावी लागते. तरच तो तो विषय समजतो, कळतो. म्हणूनच धंद्यात उतरू पाहाणारा नवशिका, व्यावसायिकांच्या ग्रुपमध्ये शिरून, राहून त्यातल्या खाचाखोचा जाणून घेताना दिसतो. संगीत शिकू इच्छिणारा गाणारे, पेटीवाले, तबलजी अशांची संगत करतो आणि हे स्वाभाविकच आहे.

श्री ज्ञानेश्वर माउलींनी या साऱ्या व्यवहाराचं तथ्य लक्षात घेऊन सुचवलेली गोष्ट मात्र तितकीच व्यवहार्य आहे. ते सुचवतात की, अशा तऱ्हेनं जो तो विषय शिकायला जर त्या त्या विषयातल्या तज्ज्ञाकडं जावं लागतं तर जे समाधान किंवा आनंद किंवा भगवंत मिळवण्यासाठी माणसाची खरी धडपड सुरू आहे किंवा असायला हवी, त्यासाठी त्याच विषयातल्या तज्ज्ञाची नको का संगत धरायला ?

हा 'आनंदा'च्या अनुभवाचा विषय शिकायला नुसत्याच मोठ्या म्हणून आईवडील काय, गुरुजन काय, ज्येष्ठ-श्रेष्ठ म्हणून कुणी समाजधुरीण काय, यांची संगती उपयोगी पडत नाही, हे आपण लक्षात घेण्याची गरज आहे. त्यासाठी या समाधानाच्या शास्त्राचा नि त्याच्या अनुभवाचा परिचय प्रत्यक्ष घडलेले 'साधू'च त्यासाठी संगत करायला योग्य होत. म्हणून श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात,'साधूचे संगती तरणोपाय।' ज्यांनी या समाधानरूप ईश्वराचा साक्षात अनुभव घेतलेला आहे ,अशांची आपली संगत घडेल तर संगतीच्याच नियमानं आपणही तसे होऊ, आनंदी होऊ. तो मार्ग आपल्याला कळेल.मग अशी साधुसंगती प्रत्यक्ष देहानं होईल, ग्रंथानं होईल, वचनानं होईल, नाममंत्रानं होईल.

पण त्यासाठी या दोनतीन गोष्टी कळायला हव्या की समाधान किंवा ईश्वराचा शोध ही एकतर इतर शोधांसारखी किंबहुना त्यापेक्षा जास्त गरजेची गोष्ट आहे आणि दुसरं म्हणजे इतर गोष्टींसारखे त्यासाठीसुद्धा निकडीचे पण योग्य प्रयत्न करणं गरजेचं आहे. चुकीचे प्रयत्न टाळून थेट साधूंकडं जाणं हाच श्री ज्ञानेश्वर माउलींनी दिलेला खात्रीचा मार्ग चोखाळणं मग व्यवहार्य व फलदायी ठरेल !

***

गुरूची गरज

माणसाचं आयुष्य म्हणजे अगणित अनुभवांची एक अखंड मालिकाच आहे, असं म्हटलं तर ते वावगं होणार नाही. लहानपणी कळायला लागल्यापासून किंवा आठवत असल्यापासून माणूस अनुभव सांगू शकतो ते अगदी त्याच्या मृत्युशय्येवरच्या अनुभवांपर्यंत. त्यामुळं माणूस एकवेळ पैशानं श्रीमंत होणार नाही, माणसांनी - ज्ञानानं समृद्ध होणार नाही पण प्रत्येक माणूस अनुभवांनी मात्र पुरेपूर समृद्ध असतो, श्रीमंत असतो. गरीब-अडाणी तसेच श्रीमंत-ज्ञानी असे कुणीच अनुभवांच्या समृद्धीला अपवाद नसतात, असं आढळून येईल. त्यामुळं कुणालाही तुमचे आयुष्यातले चार अनुभव सांगा म्हणायचा अवकाश तो चार ऐवजी चाळीस अनुभव समोर ठेवायला आणि मार्गदर्शन करायला तयार होतो. कारण प्रत्येकाला असं नकळत वाटतं की मला इतके प्रचंड अनुभव आले आहेत म्हणजे मी ज्ञानी झालो. आता मार्गदर्शन करायलाही अधिकारी झालो. गडबड आहे ती इथंच आहे.

अनुभव येणं, ते साठणं वेगळं आणि ते अनुभव कळणं वेगळं. एक साधंसं उदाहरण पाहू. एक बैलगाडी आहे. गाडीवानानं काही माल वाहून नेण्यासाठी ती एखाद्या दुकानासमोर लावली आहे. त्यात माल भरला जातो आहे. गाडी भरल्यावर ती गाडी हाकून गाडीवानानं आपल्या घरी आणली आणि त्यातला माल उतरवून ठेवला. घराकडं परतल्यावर त्यानं त्याच्या बैलांना कडबा घातला. अशा वेळी गाडीत लादलेल्या मालाचा भार खरा बैलांनीच वाहिला. कडबा खाताना त्याचं त्यांना कौतुकही वाटू

शकतं. पण ओझ्याच्या वजनाव्यतिरिक्त त्यांना त्यांतलं काही कळलं असेल असं म्हणता येईल का ?

गाडीवानाला त्यात आणलेला माल ठाऊक आहे. त्याची निवड त्यानं केली आहे.भाव-आपली गरज-आपला खिसा पारखला आहे. त्यातलं कोणतं स्वस्त, कोणतं महाग मिळालं ते त्याला ठाऊक आहे. त्याचं साठवण कसं करावं, कुठलं किती वापरावं याचं नियोजन त्याच्याकडं आहे. तो माल कुठं उत्पादित झाला, कुठून-कसा येतो, त्याचा मुळात दर किती-आपल्याला कितीला पडला अशा एक ना दोन असंख्य गोष्टी त्याला कळतात. त्यांचा विचार केला तर साऱ्या सामानाचा साठा घेऊन येणारे बैल आणि ते सामान कळणारा गाडीवान यांतला फरक आपल्याला स्पष्ट कळेल.

असंच थोडंसं आपल्या अनुभवाकडं पाहिलं तर आपल्याला दिसेल. आपल्याला असंख्य अनुभव येतात-एखाद्या परीक्षेत अनपेक्षित यश मिळतं, कुठं अनपेक्षित रितीनं नापास व्हायला होतं. त्यामुळं आपली पुढच्या शिक्षणाची दिशा बदलते, ठरते. त्यानुसार पुढचा प्रवास घडून येतो. मनुष्याचं क्षेत्र बदलतं, त्याच्या बरोबरची माणसं बदलतात. या घटना तर प्रत्येक माणसाच्या जीवनात पदोपदी घडतात. प्रवास घडतात, रद्द होतात, गाड्या चुकतात. अचानक माणसं भेटतात, अपघात घडतात, आजारपणं येतात, अचानक कुठली पुस्तकं हातात पडतात, कुणाचे शब्द सहजपणे कानावर पडतात. परिस्थिती तर आपापले बदल घडवून आणते. त्यांची नोंदही सामान्य माणूस आणखी एकेक अनुभव म्हणून करतो. पण त्यांचा अर्थ कळत नसतो. त्याचा फार मोठा तोटा म्हणजे अशा घटनांचा किंवा बदलांचा, रद्द झालेल्या घटनांचा जो लाभ माणसाला मिळायला हवा तो त्याला मिळू शकत नाही.

उदाहरण म्हणून पाहू की, एखादा नोकरदार माणूस आहे. त्याच्या अधूनमधून बदल्या होतात. त्यांचं मूल्य फार तर एक गाव सोडून दुसऱ्या गावी जाणं एवढंच असतं. तिथून बदली झाली की माणूस पुढच्या गावी जातो. पुन्हा नवी माणसं, नवं काम की पुन्हा बदलीचे वेध हे तर अनुभव झाले. पण त्यांचा अर्थ कळण्याची कल्पना व दृष्टी आपल्याकडं असली तर आपल्या लक्षात येऊ शकतं की, आपली बदली विशिष्ट गावी उगाच झालेली नाही. काही विशिष्ट माणसं, परिस्थिती यांचा संपर्क त्यामुळं यायचा असतो. काही नव्या संपर्कांच्या, नव्या विषयांच्या परिचयाच्या संधी त्यामुळं आलेल्या असतात. आपण आजवर कधी कल्पनाही केली नाही अशा घटना, प्रसंग, माणसं आपल्याला त्या बदलीच्या घटनेनं समोर आलेली असतात.

ही कळण्याची दृष्टी असेल तर तिथं जाण्यात, राहाण्यात, भेटीगाठीत, शिकण्यात सावधता, शोधकता येते. काही माणसांचा पुढं मुद्दाम संपर्क वाढवता येतो. काहींचा टाळता येतो. त्यातून माणूस समृद्ध होऊ शकतो, परिपक्व होऊ शकतो. फक्त त्यासाठी ही अनुभव कळून घेण्याची दृष्टी यावी लागते. साधी एखादी अंत्ययात्रा आपल्या समोरून गेली तरी शिकणारा माणूस सावध होतो. त्यावर विचार करू शकतो. कदाचित तो मृत्यू एखादा आदर्श मृत्यू असतो. मृत माणसाच्या परिस्थितीत किंवा मृत्यूच्या वेळी त्यानं ठेवलेल्या मनाच्या भूमिकेत शिकण्यासारखं असतं. पण हे अनुभवातून शिकण्याचं ठाऊक असलं तर अनुभव 'कळतो'. नाहीतर अशा अनेक यात्रा पाहूनही माणूस फक्त दृश्यं साठवतो. त्यांची ओझी वाहातो.

श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात की, अशी वेगळी दृष्टी यायला माणसाला सद्गुरूंची, मार्गदर्शकाची गरज असते. 'गुरूवीण अनुभव

कैसा कळे ?' गुरूंमुळे माणसाला ही शिकण्याची दृष्टी येते. जीवनातले अगदी रोजचे अनुभवसुद्धा नुसतेच दगडांची रास रचावी तसे नसतात. त्या प्रत्येक अनुभवात आपल्याला शिकवण्याची, कुठल्या ना कुठल्या मार्गानं आपल्याला समृद्ध करण्याची ताकत असते हे कळू शकतं. आपण सावध असलो तर त्यानुसार शिकून घेता येतं.

तसे अनुभव पावसासारखे असतात. ते सर्वत्रच पडत असतात पण शोधकदृष्टीची, शिकण्याची, प्रगतीसाठी त्यांचा उपयोग करून घेण्याची 'मनाची मशागत' ज्यांनी केली आहे, त्यांच्या जीवनात परिपक्वतेचं-प्रगतीचं पीक येतं. इतर लोकांना मात्र पावसाळा येतो आणि जातो. फार तर आणखी एक पावसाळा पाहिल्याचा फोल अहंकार गोळा होतो!

म्हणून आपल्याला आपल्या अनुभवांकडं बघायला शिकवणारा गुरू असणं किती गरजेचं आहे ते श्री माउलींच्या या ओळीमुळं स्पष्ट होतं.

***

दुर्गमांची आवड

एखाद्या माणसाला डोंगरदऱ्यांतून फिरण्याची, जाण्याची आवड असते. आता एवढ्या सुधारणा झाल्या आहेत की पूर्वी कठीण-कठीण मानलेल्या किल्ले-कोट-डोंगर-दऱ्या अशा बऱ्याच ठिकाणी जायला बांधीव रस्ते झाले आहेत. चालत तर आहेच, पण अनेक ठिकाणी दुचाकी-चार चाकी वाहनांनी जाऊन येणंसुद्धा शक्य झालं आहे.

अशा एखाद्या उंच किल्ल्यावर एखादा माणूस सरळ वाटेनं चालत पोचला तर वर गेल्यावर उत्साहानं वरच्या एखाद्या बुरुजावर, खडकावर विसावतो. अशा वेळी तिथं किल्ला चढून आलेली इतर माणसंही असतात. ती उत्सुकतेनं विचारतात, तुम्ही कुठून आला, केव्हा निघाला, कसेकसे आला. या माणसानं आपली माहिती-आपला सरळ मार्ग सांगितला तर ते 'ठीक आहे' म्हणतात. पण त्यांतल्या एखाद्यानं त्याच बुरुजाखालच्या भयानक कठीण, खड्या, काट्याकुट्यांच्या उताराकडं बोट करून सांगितलं की, आम्ही या बाजूनं आलो, असे घसरलो, मरतामरता वाचलो, तहानेनं कसे व्याकुळ झालो वगैरे वगैरे. तर ऐकणारा डोळे विस्फारून ऐकत राहातो, त्याच्या चेहऱ्यावर कौतुक ओसंडून वाहातं. तो त्याची आणखीआणखी चौकशी करतो. विचारणाऱ्याच्या चेहऱ्यावर असा भाव असतो की, 'हा खरा गड चढून आला ! नाहीतर तो मगाचचा माणूस ! सरळ रस्त्यानं चालतचालत वर आला !'

यात अशा अवघड मार्गानं वर येणाऱ्याचं कौतुक आहे, यात शंकाच नाही. पण सरळसोपा मार्ग असताना आणि त्या मार्गानं येणं शक्य

असताना अशा अवघड मार्गानं का यावं हा प्रश्न आहे. अशा अवघड मार्गानं येणाऱ्यांनाही आपण काहीतरी केल्यासारखं वाटतं, वेगळं केल्यासारखं वाटतं, इतरांपेक्षा आपण कुणीतरी वेगळे आहोत असं वाटतं - हे तर आहेच, पण ते पाहाणाऱ्यांना - ऐकणाऱ्यांनासुद्धा अशा अवघड कामं करणाऱ्यांचं कौतुक वाटतं हे विशेष आहे आणि ते सारं माणसाच्या स्वभावाचा एक पैलू दाखवतं, तो म्हणजे 'दुर्गमांची आवड' हा होय.

त्यातही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, एखादा किल्ला किंवा निर्मनुष्य घनदाट जंगल आहे, जिथं कुठली वाट, पायवाट, मार्ग दुरपास्त आहे. अशा ठिकाणी कितीही कठीण-अवघड-दुर्गम, धोक्याच्या मार्गानं जाणं साहसाचं आणि अपरिहार्य आहे, ते करणाऱ्याचं कौतुकही आहे. पण उगाच आपल्याला सरळ वाट माहीत नव्हती किंवा सोपा मार्ग, सुगम मार्ग समजून घेतला नाही म्हणून दुर्गम मार्गानं जाऊन त्यात यशापयश पत्करणं किंवा वेळी त्यात आपल्या शक्तीचा अपव्यय करणं नक्कीच कौतुकाचं नाही. कुणी करीत असल्यास ते फोलही आहे किंवा पोकळ अहंकारापोटीही आहे, असं समजायला हरकत नाही.

भगवंताच्या मार्गातही असं दुर्गम वाटांत मन घालायची नि त्या चालायची काहींना मोठी हौस असते. काही बेसावधपणे करतात. काहींना सोप्यासरळ तत्त्वाची माहितीच नसते. अशांना उद्देशून श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात, 'एक हरि आत्मा जीवशिवसमा । वाया तू दुर्गमा न घाली मन ।'

अनेक लोक आत्मा-परमात्मा, जीव-शिव, पिंड-ब्रह्मांड, सान्त-अनन्त अशा अनेक कल्पना घेऊन धोपटीत बसलेले असतात. दोन वेगळे कसे, त्यांची गुणवैशिष्ट्यं कोणती, त्यावरची मतं-मतांतरं कोणती - असल्या निकाली न होणाऱ्या गोष्टी घेऊन त्याच्या काथ्याकूटाच्या दुर्गम वाटेनं चालण्यात स्वत:चा काळ व शक्ती यांचा अपव्यय करीत असतात.

श्री माउली त्यांना उद्देशून म्हणतात की, आत्मस्वरूप एकच आहे. तेच जीवाला आणि शिवाला सारखेपणानं व्यापून असतं. जो 'अंतरीचा हरी' तोच 'विश्वांतरीचा हरी' इतकी सोपी, सुलभ वाट चालून आपलं भगवंताचं ध्येय नामाची कास धरून चालावं - गाठावं. आपल्यात असलेला भगवंतच दुसऱ्यात आणि तोच सर्व जगात आहे एवढं सोपं सूत्र समजून व्यवहार, आचार केला तरी आपलं काम सोपं होतं, आपली साधना सोपी होते, आनंद गवसतो.

ते सोडून तत्त्वचर्चेच्या दुर्गम मार्गात शिरलं तर बुद्धीला आव्हान व लोकांना कौतुक वाटेल, पण ध्येय मात्र अकारण दूर राहील. म्हणून असल्या अकारण-शुष्क-तात्त्विक-केवळ वैचारिक चर्चेला बळी न पडता-त्यात जाऊ शकणारी आपली शक्ती वाचवून ती नामाला दिली तर ते साधकाच्या प्रगतीला, हिताला उपयोगी ठरेल, हा श्री माउलींचा इशारा मोलाचा आहे. दुर्गम वाटांची हौस असणाऱ्यांना तर विशेषच मोलाचा आहे !

***

घनदाट हरी

एक वृद्ध गृहस्थ जड अंत:करणानं पावलं टाकीत टाकीत जराशा अनिच्छेनंच देवळाच्या पायऱ्या चढले. देवळात नुकतंच कीर्तन सुरू झालं होतं. आजचे कीर्तनकार बहुश्रुत, उत्तम अभ्यास केलेले, विनोदाची चांगली जाण असलेले आणि साधनेची बैठक असलेले असे होते. एक वेचक अभंग विवरणाला घेऊन त्यांनी विषयाची उत्कृष्ट मांडणी केली. आपल्या अनुभवाला येणाऱ्या रोजच्या जीवनातल्या प्रसंगांची उदाहरणं देत त्यांनी सर्वाचा मूळ कर्ता, त्यातही हितकर्ता भगवंत कसा आहे, हे स्पष्ट केलं. चपखल दाखले आणि संगीताची जोड ऐकताऐकता त्या वृद्ध गृहस्थांच्या हे लक्षातही आलं नाही की, ते किती काळ तिथं होते ! दोन तास अत्यंत आनंदात ते परमेश्वरी विश्वात होते.

त्यांनी आपल्या आयुष्यातल्या अनुभवांची, घटनांची पडताळणी केली. त्यांच्या लक्षात आलं की, आपण त्या त्या वेळी आपली आपली कर्तव्यं केली - काही तडीला गेली, काही नाही गेली, काहींत यश आलं, काहींत नाही. पण त्या साऱ्यांत आपण निमित्तमात्रच होतो. खरा कर्ता भगवंतच होता. आपल्याला भेटलेल्या आणि मित्र वाटलेल्यांतही तोच होता आणि शत्रू वाटलेल्यांच्या मागंही तोच भगवंत होता. त्याच विचारात या भगवंताचं आपण काही काळ आनंदानं स्मरण करीत बसावं म्हणून, कीर्तन संपल्यावरही पुढं अर्धा तास ते शांतपणे देवळात नाम घेत बसले.

घरी परतायला त्यांना थोडा उशीर झाला. वास्तविक ते आज देवळात यायच्या विचारातही नव्हते. दूरदर्शनवरची एक मालिका बघून

मग बाजारात चक्कर मारून यायचा त्यांचा विचार होता. पण संध्याकाळीच काही कारणानं सुनेची कुरबूर झाली. त्यानं ते अस्वस्थ होतात, तोवर वीज गेली. थोडा वेळ तशीच वाट पाहून अखेर ते बाहेर पडले. त्यांची पावलं देवळाकडं वळली. तेव्हा थोडा राग सुनेबद्दल होता तसाच तो विजेवरही होता.

पण आता जातानाचं चित्र वेगळं होतं. त्यांना वाटत होतं., काही कारण असो, तिचं चूक असो किंवा बरोबर असो, ती वाईट नाही, तिनं आपलं कल्याणच केलं. आपल्याला घरात बसून त्या कृत्रिम गोष्टीपुढं वेळ दवडण्याऐवजी आणि पुन्हा मालिकेतले बेगडी-भयाण प्रकार पाहून त्यांवर विचार करण्याऐवजी, किती चांगल्या वातावरणात जाता आलं ! ते पाठवणारी ती सून आणि ती वीज दोन्हींच्याही मागं सन्मार्ग दाखवणारा, सात्त्विक आनंदाकडं, खऱ्या सत्याकडं वळवणारा भगवंतच उभा होता. आता परतताना त्रागा आणि राग यांच्याऐवजी मनात शांतता, आनंद आणि कृतज्ञताच होती. लांबूनच त्यांनी पाहिलं त्यांच्या काळजीनं तीच सून त्यांची दारात वाट पाहात उभी होती. त्यांना वाटलं हा भगवंत आता या रूपात उभा आहे.

असे प्रसंग अनेकदा घडतात. पण त्यावेळी बरेचदा आकलन होत नाही, झालं तर टिकत नाही. अनेकदा तर यशात स्वत:चं कर्तृत्व वाटतं, अपयशात कुठल्या तरी व्यक्तीवर, परिस्थितीवर खापर फुटतं. दोन्हींतला खरा कर्ता भगवंत समजत नाही. म्हणून श्री माउली म्हणतात की, नाम घेत गेलं की हाच भगवंत आपल्यापासून सर्वत्र भरलेला आहे आणि तोच खरा सारं सूत्र हालवतो आहे, हे कळू लागतं. इतकंच काय, तो सर्वत्रच घनदाट भरला असून त्याच्याशिवाय काहीच नाही, हे प्रत्ययाला येतं. 'भरला घनदाट हरि दिसे । '

थोडा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, मित्रातला, यशातला भगवंत एक वेळ दिसेल, पण शत्रूतला व अपयशातला-आजारातला-अपमानातला-दुःखातला भगवंत ? तोही खराच असतो, पण तो दिसायला अवघड जातो. कारण मन एकांगी,अपूर्ण, अस्थिर असतं. खऱ्या अर्थानं नामस्मरण करण्यानं, हरिपाठ करण्यानं ते स्थिर, शांत होतं. समग्र, पूर्ण विचार करू शकतं. मग स्वाभाविकच मनाला अस्वस्थ ठेवणारे लोभ-मत्सर कमी होतात. भगवंत माणसातच नव्हे तर पशुपक्ष्यांत, झाडापेडांत, दगडधोंड्यात, पाण्यातही दिसू लागतो. आपल्या एरवीच्या चूकबरोबरच्या, लाभहानीच्या प्रतिक्रिया फार वरवरच्या व उथळ असतात हे कळू शकतं. असं दिसू लागण्यात चुकीच्या वर्तनाचं समर्थन होत नसून प्रत्येकानं बरोबर, आदर्श करावंच, पण इतरांच्या वर्तनाबद्दलच्या अपरिपक्व प्रतिक्रियांना वळण कसं द्यावं, आवर कसा घालावा - रास्त प्रतिक्रिया कशा द्याव्या - हे कळतं.

मग असंच परिपक्व मन लौकिक पातळीवर अन्याय सहन करूनही, क्षमाशील राहून 'विश्वकल्याणाची कामना करणारं पसायदान' मागू शकतं. त्यामुळं 'भरला घनदाट हरि दिसे ।' हा श्री माउलींचा प्रत्यक्ष अनुभव ठरतो, जो आपल्याला प्रेरक आहे.

***

वायाचि उपाधी

तसे बाबुराव हे नेहमी फिरायला जातायेता आम्हाला जवळपास रोज भेटणारेच गृहस्थ. पूर्ण प्रापंचिक. आज हे काम-उद्या ते काम - मुलंबाळं, आजारपणं, लग्नं, शिक्षणं, अडीअडचणी- साऱ्यांतून अखंड प्रवास. बऱ्याच प्रमाणात या साऱ्यांत यशस्वी. त्यामुळं कधी बोलायला थांबलेच तर नुकत्याच त्यांनी केलेल्या एखाद्या कर्तृत्वाची बातमी किंवा कौतुक ऐकायला मिळे. पण विशेष करून मुद्दाम थांबून बोलणारा तो माणूस नव्हेच.

त्यांच्यासारखेच त्यांचे एक फिरणारे जोडीदार होते. ते पक्के धंदेवाईक होते. सतत पैशाच्या उलाढाली. जाता येता डोक्यात चक्रंही तीच. त्यात मात्र यश उत्तम. आमचे विषय जरा देवधर्माकडले. त्यात दोघांनाही अजिबात रस नाही. त्यांतलं त्यांनी कुणी कधीच काही केलं नाही. त्यामुळं फार बोलण्याचाही प्रश्न नाही.

असं सारं असताना मध्ये जवळपास महिनाभर बाबुराव क्रॉस झाले नाहीत. त्यांची वेळ बदलली असेल, काही प्रापंचिक व्याप, आजारपणं मागं असतील असं वाटलं. तोवर एक दिवस त्यांच्या त्या धनिक मित्राची भेट झाली. त्यांनी अगदी आवर्जून थांबवून सांगितलं की, बाबुराव सध्या आध्यात्मिक कार्यात आहेत-चारी धाम करूनच येणार. त्यांना महिना-दीड महिना तरी लागणार, मग यात्रा केवढी मोठी, किती खर्चिक, त्रासाची वगैरे त्यांनी सारं कौतुकानं सांगितलं. बराच वेळानं ते थांबले. निघालेही.

पण पुन्हा वळून जवळ येऊन म्हणाले, 'आम्हीही बरेच दिवस

म्हणत होतो या धंद्यापलीकडं काही केलं पाहिजे. आपल्या गावच्या त्या जुन्या शाळेतलं नवं मोठं बांधकाम तुम्ही पाहिलं असेलच. समाजासाठी काही केलं तर ईश्वरसेवाच नाही का ती ? तिथं पाटी आहे, त्यावरून कल्पना येईलच तुम्हाला !' सांगताना अभिमानानं, आनंदानं फुललेल्या त्यांच्या चेहऱ्यावरच मला त्या पाटीवरचा मजकूर वाचायला मिळाला.

थोड्याच दिवसांनी सकाळी बाबुराव भेटले. मग काय विचारता, पूर्वी आपण देवधर्माचं काहीच करत नाही ही खंत तरी त्यांच्या बोलण्यात डोकावे, कधी शक्यतो तो विषयच ते आधी काढीत नसत. पण आता मात्र मुलांचे नवीन पराक्रम, सुनेनं मिळवलेली बक्षीसं, त्यांनी केलेलं घराचं नूतनीकरण या साऱ्या नेहमीच्या विषयांना फाटा देऊन गाडी एकदम अध्यात्माच्या स्टेशनवर ! तीर्थयात्रा, तिचं महत्त्व, त्यातही त्यांनी केलेल्या यात्रेचा वेगळेपणा, अडीअडचणी, त्यांनी त्यावर नेहमीच्याच पद्धतीनं केलेली मात !

एक यात्रेचा म्हणून आध्यात्मिक वाटणारा विषय सोडला तर बाकी सारं वर्णन एखादं अवघड लग्न ठरवून पार पाडण्याच्या चिकाटीच्या यशस्वी उद्योगाला लागू होणारं ! साऱ्याला उत्तम म्हणण्यापलीकडं पर्याय आणि अपेक्षा नव्हती. आपल्यात आध्यात्मिक कार्यच काय ते कमी होतं, तेही आपल्या कर्तृत्वानं भरून काढल्याचा भाव बाबुरावांच्या चेहऱ्यावर झळकत होता. पुढं बरेच दिवस बऱ्याच लोकांना थांबवून ही सारी कर्तृत्वगाथा ऐकावी लागली यात नवल नाही.

नवल हे आहे की, श्री ज्ञानेश्वर माउलींनी फार पूर्वी जो इशारा देऊन ठेवला आहे तो आपण कसा विसरलो ? मूळ भगवंताविषयी जिज्ञासा जागृत झाली नाही, तळमळ उत्पन्न झाली नाही, भाव उत्पन्न झाला नाही, तर अशा तीर्थयात्रा, व्रतं, नेम, पुण्यकर्मं यांना उपाधींचंच स्वरूप येतं.

'तीर्थव्रतनेम भावेवीण सिद्धी । वायाचि उपाधी करिसी जना ।'हे आपल्या लक्षात कसं आलं नाही ?

ईश्वराच्या स्वरूपाविषयी जिज्ञासा निर्माण होण्यात, तळमळ उत्पन्न होण्यात जर या यात्रेची परिणती होणार नसेल तर याच यात्रेला आता आणखीच एका उपाधीचं स्वरूप आलेलं आहे. मग अत्यंत अडचणीतून घर कसं बांधलं याचं कौतुक केलं काय आणि अत्यंत अडचणीतून भोज्याला शिवून आल्यासारखी यात्रा करून आल्याचं कौतुक केलं काय- उपाधीच्याद्दष्टीनं त्यांत काय फरक आहे ?

उलट आजवर असं काहीच पारमार्थिक काम आपल्याकडून घडत नाही याची खंत त्यांच्या मनात होती. तिचा तरी कदाचित ईश्वरप्राप्तीला उपयोग झाला असता. आता मात्र आपण यात्रा करून आल्याचा अहंकार वाढून उपाधीत भर पडली. त्यांच्या मित्राच्या बाबतीत बांधकामाला देणगी दिल्याच्या अहंकाराची भर पडली आणि भगवंत होता त्यापेक्षा आणखी दूर गेला. त्यातही आपल्या सत्कर्माची जाहिरात घडली तर लोकांकडून मिळणाऱ्या मानाची आणखी एक उपाधी निर्माण झाली.

म्हणून निदान समजूतदार माणसांनी तरी माउलींचा 'वाया उपाधी टाळण्याचा' इतका जुना इशारा लक्षात ठेवून काय ते करावं, हे हिताचं ठरेल.

***

तरी ते व्यर्थ

आपापल्या प्रपंचात, व्यवहारात आपण अनेक गोष्टी रोज पार पाडतो, अनेक कर्तव्यं पूर्ण करीत असतो. साधं एखाद्याला जेवायला बोलवायचं घ्या. काही कारणानं आपला संबंध आलेला असतो, बरेच दिवस बोलवावं असा त्यांचा विचार असतो. मग असंच काही निमित्त घडतं आणि अशी संपर्कातली व्यक्ती आपल्याला जेवायला बोलावते. आपण जातो. सारं काही वेळेवर असतं. ठीकठाक असतं. पदार्थ, व्यवस्था यातही उणं नसतं. सारा जेवणाचा कार्यक्रम होतो, आपण परतही येतो. पण येतायेताच बोलणं होतं, तसं सारं व्यवस्थितच होतं पण काही तरी रुखरुख वाटत असते. अस्वस्थता राहाते, त्याच्यावर बोलणं येतं आणि चटकन एक मुद्दा निघतो की, सारं कोरडं वाटत होतं, फॉर्मल वाटत होतं ! मनापासून केल्यासारखं वाटत नव्हतं, असा निष्कर्ष निघतो. त्यावर एकमत होतं आणि भरल्या पोटी, पोटं रिकामी राहातात.

तोच काही वेळा असाही अनुभव येत असेल, अचानक येणं जाणं घडतं, बोलावणारा अत्यंत अगत्यानं बोलावतो, त्याची परिस्थितीही यथातथाच असते, साधी भाजी भाकरी असते पण त्याच्या मागच्या भावनेनं आणि त्या अगत्यानंच पोट भरून जातं आणि हृदयही ! अनेकदा तर जेवण राहू द्या, साध्या चहाच्या कपानंसुद्धा जेवणापलीकडं पोट भरल्याचा आपल्याला अनुभव येतो. हाच अनुभव कदाचित दुसऱ्यांना आपल्याबाबतीत येत असेल !

पण मुद्दा हा की, बाकी सारं केलं तरी ते ज्यासाठी केलं ती

भावना जर त्यात नसली किंवा त्यामधला मूळ आवश्यक तो भाग-गाभा त्यात नसला तर त्या साऱ्याला कोरडेपणा तर येतोच पण त्या करण्याचा उद्देश साध्य होत नाही, ती गोष्ट करूनही उपयोगी ठरत नाही. जसं असं बिनअगत्याचं जेवण करून आपली जवळीकही वाढत नाही नि कृतज्ञता किंवा प्रेमही व्यक्त होत नाही-अशा वेळी हा सारा खटाटोप 'व्यर्थ' आहे म्हटलं तर ते बरोबरच ठरेल ना ?

हरिपाठ सांगतो ते साधनेला लागू तर आहेच, पण ते आपल्या व्यवहारालाही लागू आहे. व्यवहारातसुद्धा असलं कर्म आदर्श न ठरता-खटाटोपाचं आणि निरर्थक ठरतं. मग असलं कर्म आपलं जे मूळ उद्दिष्ट असतं ते साध्य करायला जर समर्थ ठरत नसेल तर ते 'व्यर्थच' म्हणावं लागतं.

एका सत्पुरुषांकडं एकदा एक मोठे विद्वान गृहस्थ आले. त्यांनी वेदान्ताचा मोठा व्यासंग केलेला होता. त्यांना त्यांच्या या वेदान्ताच्या अभ्यासाचा मोठा अभिमानही होता. त्या अभ्यासासंबंधी मोठ्या कौतुकानं त्या विद्वानांनी या सत्पुरुषांना सांगितलं. या सत्पुरुषांनी ते सारं ऐकून घेतलं आणि शेवटी म्हणाले, 'आपण वेदान्ताचा एवढा अभ्यास केलेला आहे, तेव्हा काय आपल्याला समाधान मिळालेलंच आहे !' त्यावर ते विद्वान गृहस्थ खंत करीत म्हणाले, 'नाही, तेवढंच काय ते मिळालेलं नाही !' यावर हे सत्पुरुष उद्‌गारले, 'मग त्या व्यासंगाचा उपयोग काय ? तो व्यर्थच म्हणायचा !'

त्या अर्थानंच श्री ज्ञानेश्वर माउली सुचवतात की, तीर्थयात्रा केल्या, अगदी त्रिवेणीसंगमात जरी पवित्र स्नान केलं, तरी ते सगळं तर भगवंताचं स्मरण व्हावं, वाढावं म्हणून करायचं. ज्यासाठी ते करायचं ते - भगवंताचं स्मरण - जर यात्रा वगैरे करताना झालं नाही तर ते उपयोगी नाही. म्हणून

हे स्मरण ज्या नामानं घडतं तेच नाम जर यात्रा वगैरे करताना जर घेतलं नाही किंवा ते स्मरणच जर ठेवलं नाही तर ही सारी यात्रा, व्रतं सारं व्यर्थच आहे. तो सारा नुसता खटाटोपच उरेल.

व्यवहारामध्येसुद्धा आपण जी कामं करतो ती मनापासून करण्याची विद्या आणि सवय उपयोगी ठरेल, मोलाची ठरेल. त्यातही ती कामं आपण ज्यासाठी करतो ती उद्दिष्टं लक्षात ठेवून ती कामं केली तर मग इथली आपली कर्मं, साधनंही 'व्यर्थ' न ठरता 'सार्थ' ठरतील !

***

मनोमार्ग

कशाविषयी काय समजुती जगात पसरलेल्या असतील हे सांगणं खरोखर कठीण आहे. जसं भगवंताला प्रसन्न करून घेण्यासाठी किंवा प्रसन्न ठेवण्यासाठी आत्ताच्या पद्धतीनं उपास करण्याची युक्ती कुणी पसरवली असेल नि ती समजूत कशी दृढमूल झाली असेल हे सांगणं खरोखर कठीण आहे. अनेकदा शरीराला त्रासदायक असलेले पदार्थ खाण्यानं किंवा जिभेच्या त्या निमित्तानं पुरवण्यात येणाऱ्या चोचल्यांनी भगवंत कसा काय जवळ येत असेल हे स्पष्ट करणं अवघड वाटतं. पण ती समजूत पक्की आहे हे मात्र खरं! साधं नेहमीचं आरोग्यकारक जेवण घेणाऱ्या माणसापेक्षा अधिकाधिक उपास तेही आत्ता सांगितलं त्या पद्धतीनं करणारा माणूस स्वाभाविक अधिकच भक्तिमान म्हणून ओळखला जावा हे ओघानंच आलं !

अशाच अनेक समजुती आणि खरं तर गैरसमजच अध्यात्माविषयी, परमार्थाविषयी जास्त असल्याचं आपल्याला आढळून येईल. अनेकांच्या दृष्टीनं आध्यात्मिकता ही वेगवेगळ्या प्रकारचे, अवघड अवघड पद्धतीचे किंवा इतर कुणाला सहजी न जमणारे यज्ञयाग करण्यात आहे, अनेकांना व्रतवैकल्यांत आपण आध्यात्मिक आणि भगवंताला हमखास प्रसन्न करणारं काम करतो असा ठाम विश्वास आहे, कुणाची कुठल्या मंदिरात विशिष्ट प्रदक्षिणा घालण्यात आध्यात्मिकता आहे. ही यादी तशी खूपच लांबलचक आहे !

त्या यादीवर ज्याचा त्याचा दृढ विश्वास असतो यात वैशिष्ट्य

नाही तर याहीपुढं जाऊन दुसऱ्यांबद्दल मत व्यक्त करतानाही नकळत आपल्या मतांचा वा वेळी गैरसमजांचा आधार कसा घेतला जातो, हे पाहाणं गमतीचं ठरेल.

श्री गुरुदेव रानडे यांचा अलाहाबादचा बंगला गंगेच्या काठी होता. गुरुदेवांच्या आध्यात्मिकतेबद्दल स्वत:च्या कल्पना वापरून असा अंदाज त्याकाळी भल्याभल्यांनी व्यक्त केला आणि तशी अनेकांची खरी समजूत होती की रोज गंगेचं पवित्र स्नान घडावं म्हणून मुद्दामच गुरुदेवांनी ती जागा निवडली होती ! प्रत्यक्षात खरे आध्यात्मिक असलेल्या नि परमार्थ जगणाऱ्या गुरुदेवांना याची कल्पनाही नव्हती आणि त्यांनी प्रत्यक्षात तिथल्या पंचवीसतीस वर्षांच्या प्रदीर्घ वास्तव्यात फक्त एकदा गंगेला स्पर्श केला होता तर बंगला मुद्दाम तिथं बांधण्याचं दूरच राहिलं.

अर्थात वर सांगितलेली ती सारी साधनं भगवंताशी अजिबातच संबंधित नाहीत असं नक्कीच नाही. पण ती संबंधित ठरवण्यासाठी खरी अट आणि खरं साधन वेगळंच आहे आणि याच संदर्भात श्री माउलींचं हरिपाठातलं मत मोठं मनोज्ञ आहे.

ते सुचवतात की हा सारा आध्यात्मिकतेचा, भगवंताचा मार्ग हा 'मनोमार्ग' आहे.पण मन तर वर म्हटलं तसं चुकीच्या समजुतींना बळी पडलं तर भलतीचकडं घेऊन जाऊ शकतं. तेच योग्य मार्गात असलं तर भगवंत गाठून देऊ शकतं. हा योग्य 'मनोमार्ग' आहे. पण तो बरोबर कळायला आणि टिकायला सत्संगतीची जोडही आवश्यक आहे.'संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे पंथे । '

श्री माउली म्हणतात जर माझं कुठलंही साधन मनापर्यंत पोचत असेल, मनाची ठेवण बदलून त्यात ते साधन ईश्वरत्व साठवण्यात यशस्वी होत असेल तर ते साधन, 'साधन' बनू शकतं. अन्यथा त्यातून ईश्वर जवळ

न येता त्याला लौकिक कर्माची कळा येऊन फुकटच नको असलेला लौकिक, मानमान्यता येईल नि आध्यात्मिकतेच्या आड येणारा दंभच उलट वाढीला लागेल.

हा अनुभव आपण घेतोच. लोकांना नाडून भरमसाठ पैसा मिळवल्यावर त्यामानानं नगण्य पण लोकांच्या दृष्टीनं मोठी रक्कम वाटणारा थोडाफार पैसा दानधर्मात वाटून टाकणाऱ्या व्यक्ती आपण पाहात नाही का? अशा वेळी दानधर्मानं कीर्ती मिळाली तरी मुळात ते दानाचं साधन आध्यात्मिक बनण्याचं दूरच राहो, ते उलट प्रसिद्धी मिळवण्याचं नि पर्यायानं दंभाचंच साधन ठरत नाही का ?

वास्तविक दानाच्या मागची मनोभूमिका लक्षात आली आणि तिचा मनावर परिणाम घडला तर मुळात दान जास्त देण्यापेक्षा लोकांना नाडणं कमी करण्याचीच त्या व्यक्तीला गरज वाटेल आणि इथंच श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात तसा 'मनोमार्गे' प्रवास सुरू होईल जो अधिक वेळा केला तर पुढं आनंदाकडं-भगवंताकडं घेऊन जाईल.

पण त्यासाठी या साऱ्या अवडंबरातून विचारपूर्वक बाहेर पडून 'मनाच्या' पातळीवर जाण्याची आणि त्यात योग्य मार्गावर टिकण्यासाठी संतसंगात राहाण्याची श्री माउलींची हरिपाठातली सूचना व्यवहारात ताडून बघण्याचा प्रयोग करायला हवा.

***

विरळा ज्ञानी

आज आजूबाजूला पाहिलं तर वेगवेगळ्या विषयांतल्या का असेना ज्ञानी, जाणकार माणसांची कमतरता नाही. अशी शेकडो जाणकार माणसं आपल्याला दाखवता येतील. अर्थात त्या त्या विषयाच्या प्रकारानुसार, व्याप्तीनुसार, तो तो विषय सोपा किंवा कठीण असणं हे स्वाभाविक आहे. पण तो विषय जाणणारी माणसं, ज्ञानी, तज्ज्ञ माणसं हे सांगूही शकतात की तो विषय कितपत सोपा, अवघड आहे आणि ती माणसं जाणकार असल्यामुळं त्यांचं ते मत अर्थातच विश्वासार्ह असतं.

पण एका विषयाच्या बाबतीत हे म्हणणं खरं नाही असा श्री ज्ञानेश्वर माउलींच्या हरिपाठात अभिप्राय आहे. हे म्हणणंही मुळातच 'ज्ञानियांच्या राजा'चं असल्यामुळं ते विचार करण्यासारखं खचितच असलं पाहिजे. त्यांनी एका ठिकाणी म्हटलं आहे,'नामाचा म्हणजेच भगवंताचा मार्ग सुलभ आहेच, पण तो सुलभ आहे, हे जाणणारे मात्र दुर्लभ आहेत, विरळा आहेत.' हे थोडंसं धक्का देणारं आहे पण विचार करायला लावणारंही आहे.

जगात इतके विषय आहेत. प्रत्येक विषयात आधी म्हटल्याप्रमाणं कठीणपणा, सोपेपणा असणार. परमार्थ किंवा भगवंत हाही, ज्ञानाचा विषय आहे. तोही जाणणारे इतर विषयांसारखेच जाणकार असणार. इतर विषयांप्रमाणंच हाही विषय काही सोपा, अवघड असेलच. तो शिकण्याचा मार्गही सोपा, अवघड असेल. पण त्या विषयातले भरपूर जाणकार असतील आणि ते सांगतीलच की तो विषय किंवा मार्ग किती अवघड,

किती सोपा आहे ! पण या विषयाच्या बाबतीत मात्र ही परिस्थिती थोडी वेगळी दिसते. माउलींच्या म्हणण्याप्रमाणं या विषयाचे जाणकार अनेक असतील पण हा विषय सोपा आहे, सुलभ आहे हे जाणणारे मात्र थोडेच आहेत.

आपण आजूबाजूला पाहिलं तर वस्तुस्थिती अशी दिसते खरी. कारण आधी परमार्थ, अध्यात्म, नामस्मरण, भगवंत वगैरे शब्द ऐकल्यावर या विषयाला बिचकणारे जास्त, त्यातही ते समजून घ्यायला 'तुमच्यासारख्या-सामान्य-विषयी, प्रापंचिक, अज्ञ जनांना तो कळणं, सांगणं फार कठीण आहे' असं सांगणारेच जास्त भेटतात. त्यातल्या त्यात आपण अशा विषयातल्या ब्रह्म, वेदान्त वगैरे शब्दांचा उल्लेख केला तर आपल्याला झुरळासारखे झटकून 'छे ! ते तुमचं काम नव्हे' असा भाव चेहऱ्यावर दाखवणारे या विषयातले 'जाणकार' आपल्याला खूप भेटले असतील. म्हणूनच माउलींना 'हा विषय सोपा आहे, यातला मार्ग सोपा आहे, असं सांगणारे जाणकार दुर्मीळ आहेत', असं म्हणावं लागलं असावं !

श्री गोंदवलेकर महाराज म्हणत वेदान्त खूप सोपा आहे, विद्वान लोक तो जगाला अवघड करून सांगतात. मुळात वेदान्त हीसुद्धा जगण्याची व्यवहार्य विद्या आहे, ही ओळखच आपल्याला कुणी करून देत नाही. साध्या भगवंताच्या नामानं, त्याच्या मनापासूनच्या स्मरणानं, तळमळीच्या उच्चारणानं साऱ्या विश्वाचा कर्ता धर्ता भगवंत आपल्याला आपलासा करता येतो. सर्व ओळखीत कठीण असलेली 'स्वत:ची ओळख' होते. हे कुणी आपल्याला समजावून देतच नाही. नाहीतर इतके विषय समजून घेऊ शकणारा माणूस, एवढा प्रपंच नेटका करणारा माणूस भगवंत मिळवून म्हणजेच अत्यंत दुर्मीळ असं अखंड समाधान मिळवून आपल्या आयुष्याचं सार्थक नाही का करून घेणार ?

पण हे त्या त्या विषयाचे जे तथाकथित जाणकार असतात ते साऱ्या जगाला अज्ञ, तुच्छ, अक्षम समजून सोपा असलेला भगवंताचा विषय मुद्दामच कठीण करून सांगून स्वत:चं महत्त्व आणि आपल्या ज्ञानाचा टेंभा मिरवायचा प्रयत्न करतात, ते आपण खरोखर लक्षात घेण्याजोगं आहे.

यात व्यवहारात उपयोगी पडण्यासारखा एक बोधही आहे तो असा की, अनेक गोष्टींच्या कठीणसोपेपणावर कुणाच्या तरी सांगण्यानुसार विश्वास ठेवताना सावध राहावं.

निदान समाधान मिळावं असं वाटत असेल तर त्याचा मार्ग कठीण आहे असं सांगणाऱ्यावर तरी अजिबात विसंबू नये. आपणच सत्य शोधून पाहावं आणि आपला लाभ घडवून घ्यावा.

***

एक कळकळीचा प्रश्न

माणसाची क्षमता हा मोठा कुतुहलाचा विषय आहे. क्षमता गोष्ट शिकण्याची असो, गोष्ट करण्याची असो, समजून घेण्याची असो, शोधण्याची असो, समजावून देण्याची असो, अक्षरश: थक्क करणारे प्रकल्प उभे करण्याची क्षमता असो, त्याच्या विलक्षण तर्कबुद्धीची झेप असो, वैज्ञानिक शोधांची असो, भावभावनांच्या बाबतीतसुद्धा कुठल्याही टोकाला जाण्याची, संतुलित राहाण्याची असो - कुठल्याही बाबतीत त्याची क्षमता खरोखर पराकोटीचं कुतुहल जागं करणारी आहे, स्तिमित करणारी आहे.

ज्याला दुपारची भ्रांत आहे, प्रपंचाची विलक्षण विवंचना आहे - त्याची त्या त्या गोष्टी मिळवण्यासाठी अगदी पहाटेपासून रात्री अपरात्रीपर्यंत सुरू असलेली अविश्रांत धडपड पाहिली तर आश्चर्य वाटतं याचं की, तशा साध्याशा, दुबळ्या किंवा इतर सृष्टीतल्या प्राणिवर्गाच्या मानानं सुमार वाटणाऱ्या एवढ्याशा देहात नि मनात एवढी टक्कर घेण्याची, परिस्थितीशी मुकाबला करण्याची क्षमता कुठून येते ? आपलं जे काही प्रापंचिक ध्येय असेल, सुस्थिती असेल, घरदार, बायकामुलं असतील, सामाजिक मानमान्यता असेल, व्यावसायिक स्थैर्य किंवा प्रगती असेल- जे काही ध्येय असेल ते गाठण्यासाठी किती अकल्पित कष्ट सर्वसामान्य माणूसही करतो, इतकंच नव्हे तो त्यात यशस्वीही होतो - हे पाहिलं म्हणजे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही.

पण याला एक दुसरी बाजूही आहे. संत सत्पुरुषांना सामान्य-असामान्य सर्व माणसांची ही धडपड पाहून कौतुक वाटत असलं, आश्चर्य

वाटत असलं तरी त्यांना तेवढंच वाटत नाही, त्यांना दुसऱ्या बाजूला ते सारं पाहून एक 'खंत' वाटते, खेद होतो, वाईट वाटतं. त्याला कारण आहे.

एका साधूची प्रसिद्ध गोष्ट पाहू. साधूच्या दर्शनाला एक तरुण मुलगा आला होता. मोठा विचारी होता. उद्योगी होता. नुकतंच त्याचं लग्नही झालं होतं. तो बोलताबोलता त्या साधूला म्हणाला, 'मी नुकताच माझा विमाही उतरवला आहे.' त्यावर हा तसा वयानं लहानखोर असल्यानं साधू म्हणाला, 'अरे वा, पण इतक्या लहान वयात तू कसा काय विमा उतरवलास ?' त्यावर तो तरुण उद्‌गारला, 'मी तरुण आहे हे खरं पण माणसाच्या आयुष्याचा काय भरवसा !' त्यावर आनंदित होऊन साधू म्हणाला, 'वा ! हे मात्र खरं आहे. तुला खूपच लहान वयात हे सत्य लक्षात आलं. माणसाच्या आयुष्याचा नेम काय सांगावा ? सारं अनिश्चित आहे. त्यामुळं आता तू रोज भगवंतासाठीही थोडा वेळ देत जा !' त्यावर तो तरुण चटकन उद्‌गारला, 'छे ! ते काय म्हातारपणी करता येईल ! आत्ता वेळच कुठं आहे त्याला ?' साधू हसला. कारण ज्या मुलाला म्हातारपणापर्यंत आपण जगू याची खात्री नाही म्हणून तो एकीकडं विमा उतरवतो आहे, तोच नाम-भगवंत आणि भक्ती म्हटलं की खात्रीनं सांगतो की ते काय म्हातारपणी करू ! यांत एका बाजूला माणसाच्या फसव्या तर्कबुद्धीची कमाल आहेच पण त्याबरोबर संतांना ज्या गोष्टीबद्दल वाईट वाटतं तीही लक्षात घेण्यासारखी आहे.

श्री ज्ञानेश्वर माउलीसुद्धा मोठ्या तळमळीनं हरिपाठात विचारतात, 'सायासे करिसी प्रपंच दिननिशी, हरिसी न भजसी कवण्या गुणे !' प्रपंचातल्या कितीही कठीण, असाध्य कामालासुद्धा कोणतीही सबब न सांगता त्यासाठी अचाट कष्ट करायला तयार होणारा माणूस तीर्थ-तप सोडा पण साध्याशा नामाला, सत्संगालासुद्धा किती सबबी सांगतो आणि

संतांना हे मोठं दु:ख आहे की, त्यामुळं तो आपलंच किती नुकसान करून घेतो आहे !

कारण सृष्टीत सर्वांत मोठी क्षमता असलेली ही मानवी आकृती भगवंताची ओळख करून घेतल्याशिवाय समाधान पावू शकत नाहीच आणि समाधान मिळवणं हे तर माणसाचं कर्तव्यच आहे. कारण माणसाच्याच ठायी ही क्षमता आहे ! तसंच समाधानाची माणसाला असलेली गरजही निर्विवाद आहे. पण दुर्दैवानं आपण प्रत्यही पाहातो की, लग्नकार्याला, सिनेमानाटकाला रात्रभर जागरण करायला तत्पर असलेला माणूस भजनाला रात्री जरा उशीर होतोसा वाटलं तरी जागरणाचा त्रास होतो म्हणून उठून जातो, ही वस्तुस्थिती आहे.

आपल्या अशा अनुभवांचा, त्यातल्या मतलबी दुटप्पीपणाचा कंटाळा आला किंवा तो अनुभव समजून येऊन आपण भगवंतासाठीही त्यात तत्परतेनं वेळ काढला, तर हरिपाठातली तळमळ सार्थ होईल, असं पुन्हा पुन्हा म्हणावंसं वाटतं !

***

असोनी संसारी

परमार्थाच्या मार्गात खरोखर सर्वांत मोठी अडचण कुठली जाणवत असेल तर ती त्या मार्गाविषयीच्या,परमार्थाविषयीच्या आपल्या 'कल्पनांची' होय. एखादा तरुण माणूस किंवा एखादी युवती जर देवळात नियमित जाताना दिसली किंवा असं कुणी कुठं दिंडीवारीत दिसलं, पारमार्थिक चर्चावर्गात हजर दिसलं तरी अनेकांची अशी प्रतिक्रिया होते की, आता याचं काही खरं नाही, याच्या अभ्यासाचं, पुढं नोकरी उद्योगाचं आता वाटोळंच आहे ! हीच मुलं सिनेमाच्या थिएटरजवळ, नाट्यगृहाजवळ दिसली तर मात्र असं एवढं काही वाटत नाही. 'ते नैसर्गिकच आहे' असं वाटतं. कारण परमार्थाचा आणि वयाचा संबंध यांनी कल्पनेनं गृहीत धरलेला असतो. त्यामुळं दिंडीत मुलं दिसणं अनैसर्गिक. कारण या वयात हे करायचं नसतं, अशी त्यांची कल्पना आड येते.

तेच दुसऱ्या बाबतीतही. परमार्थ ही बाब जणू काही प्रपंचाच्या, संसाराच्या विरोधातली आहे, अशी एक कल्पना अनेकांची असते. त्यामुळं परमार्थविषयीची नुसती चर्चा करताना कुणी मुलं किंवा प्रापंचिक माणसं दिसली किंवा त्याची आवड लागलेली दिसली की, यांच्या कल्पनेनुसार त्यांना काळजी वाटायला लागते की, आता बहुतेक हे संन्यास घेणार, बायकापोरं रस्त्यावर येणार, नोकऱ्याधंदे सुटणार, गळ्यात झोळी अडकवून हे हिंडायला लागणार. एक ना दोन अनेक कल्पना ते करीत सुटतात. प्रत्यक्ष या माणसाचं यांतलं काहीच होत नाही. तो तिकडं अधिकाधिक सुखी, समाधानी होतो. आयुष्याचं सार्थकही घडवतो. पण यांची मात्र

इकडं काळजीनं नि धाकधुकीनं तब्येत वाळते. हा परमार्थाबद्दलच्या आपल्या गैरसमजांचा नि कल्पनांचा प्रताप !

वास्तविक, एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणं परमार्थ ही तोच प्रपंच, तीच कामं पण एका वेगळ्या दृष्टीनं करण्याची विद्या आहे ! म्हणूनच ती विद्या जास्त करून अंतरंगाची आहे. त्याच गोष्टी विवेकानं, सारासार विचारानं, निरपेक्षतेनं, साक्षीभावानं, भगवंतासाठी अर्पणबुद्धीनं, सेवावृत्तीनं करण्याची ती विद्या आहे. स्वाभाविकपणे त्याला प्रपंचाचं वावडं असण्याचं मुळातच कारण नाही.

उलट या दृष्टीनं पाहिलं तर पूर्वीपेक्षासुद्धा विवेकानं, संयमानं, तारतम्यानं, तणावमुक्त मनानं तोच प्रपंच करण्यानं पारमार्थिक माणसांचे प्रपंच लौकिकदृष्ट्या अधिकच चांगले झालेले आपल्याला दिसतात. त्यामुळं खऱ्या पारमार्थिक सत्पुरुषांनी, संतांनी प्रपंच सोडण्याची सक्ती तर सोडाच पण भाषासुद्धा केलेली आपल्याला दिसत नाही. केलीच तर 'प्रपंचातली आसक्ती' सोडायची भाषा केलेली आहे.

म्हणूनच श्री ज्ञानेश्वर माउली हरिपाठातल्या पहिल्याच अभंगात म्हणतात,हे साधन,नामाचं साधन'असोनी संसारी'च करा ! आपल्यासारख्या प्रापंचिकांना हा मोठा दिलासा आहे, विचार करण्यासारखी गोष्ट आहे की इतकं मोलाचं नि गुणाचं 'नामाचं साधन' करायला मला माझा संसार, माझा प्रपंच, माणसं, संबंध, व्यवहार, कर्तव्यं यांतलं काही सोडावं लागणार नाही. ते करताकरताच हे भगवंताचं स्मरण करायची, ते वाढवायची माउलींची सूचना आहे, इच्छा आहे.

यातसुद्धा सुरुवातीला म्हटलं त्याप्रमाणं आपल्या 'कल्पना', 'समजुती' आड यायची शक्यता आहे. मूळ परमार्थाबद्दल तर आहेतच पण 'नामा'सारख्या निरुपाधिक साधनाबद्दलही आहेत. ते पद्मासन घालून

घ्यावं, मोठ्यानंच घ्यावं, बाकीच्यांनी त्यावेळी सक्तीनं शांतता पाळावी, अमुकच मंत्र, अमुकच माळा कराव्यात, आंघोळ, उपास अशा गोष्टी पाळूनच ते घ्यावं - असल्या अनेक व्यावहारिक गोष्टी आणि प्रापंचिक कल्पना यात घोटाळा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यापायी आपली दिशाभूलही होऊ शकेल.

यासाठी आपल्याआपल्या संसाराच्या ठिकाणी, आपापल्या प्रकृती-परिस्थिती-अडचणी यांमध्ये ते सहजतेनं घ्यायला माउलींनी सांगितलं आहे. एवढं सतत लक्षात ठेवलं तरी अशा 'काल्पनिक अडचणीं'चा परिहार होईल आणि जर असलीच तर भगवंताचं नाम घेताना मनापासून घ्यावं अशी अट सोडली तर यात संख्या-परिस्थिती-व्यवहार याची कुठलीच अट माउलींना अभिप्रेत नाही !

हे लक्षात ठेवलं तर आपला प्रपंचव्यवहार सांभाळून जाता येता हे साधन करून भगवंत आपलासा करणं कुणालाही शक्य आहे, नाही का ?

***

अद्वैताची कला

माणसाला अगदी स्पष्ट अशी जर कशाची कल्पना असेल तर ती स्वत:च्या अस्तित्वाची आणि त्याहूनही स्पष्ट म्हणजे स्वत:च्या वेगळेपणाची. लहानपणी अस्पष्ट स्वरूपात असलेली ही जाणीव मनुष्य मोठा होत जाईल तशी अधिकाधिक ठळक होत जाते. त्यानुसार स्वत:ला वेगळं ठेवण्याचे त्याचे प्रयत्नही अव्याहत सुरू राहातात. त्याचे सादपडसाद आपल्या सबंध आयुष्यावर उमटलेले आपल्याला दिसतील. आपल्या रोजच्या व्यवहारातसुद्धा त्याचा परिणाम घडत असलेला आपल्याला दिसेल.

ऑफिसमध्ये नवीन बदलून आलेले साहेब तिथली सारी परिस्थिती पाहातात. ते ऑफिस त्यांच्यापूर्वीसुद्धा एखाद्या कर्तबगार साहेबांच्याच हातात असतं. त्यांनीही उत्तमपणे ते चालवलेलं असतं. त्यामुळं त्या ठिकाणी असलेल्या पद्धतीप्रमाणं ते नुसतं चालू ठेवलं तरी चालण्यासारखं असतं. पण असं त्यांनाही चालत नाही आणि वरच्या अधिकाऱ्यांनाही.

मग स्वत:चं वेगळेपण जपण्यासाठी असलेली चांगली फरशी बदलून दुसरी घातली जाते. फर्निचर नवीन केलं जातं. माणसं इकडून तिकडं बसवली जातात. तेच बोर्ड पुन्हा एकदा वेगळ्या रंगात रंगवून घेतले जातात. कार्यप्रणालीत थोडेफार बदल केले जातात. एखादी न केलेली गोष्ट, योजना हुडकून काढून ती राबवली जाते.

यात गरजेचा भाग असला तर ती गोष्ट आपण क्षणभर समजू शकू. पण हे अनेकदा स्वत:चं वेगळेपण सिद्ध करण्यासाठी असतं. मग त्याचं त्या साहेबांनाही कौतुक वाटतं, इतरांनीही ते करावं असं वाटतं.

घरात नवीन आलेल्या सुनेची गोष्ट यापेक्षा फार वेगळी नसते. कॉलेजमध्ये दाखल झालेल्या नव्या प्राचार्यांचीही हीच गोष्ट असते. इतकंच काय एखाद्या मठाच्या नव्या उत्तराधिकाऱ्याचीसुद्धा असू शकते.

यानं वरवर सारे सुखावत असले तरी एक गोष्ट नकळत घडत असते ती म्हणजे, स्वत:च्या अहंकाराचं नकळत पोषण होत असतं. मुद्दाम काही वेगळं करण्यानं वाढणारा हा अहंकारच पुढं माणसाला आयुष्यात दु:खी करतो.

साधं पाहायचं तर या वेगळेपणाच्या नादात केलेल्या एखाद्या गोष्टीमुळं किंवा सुधारणेमुळं - बदलामुळं काही नुकसान उद्‌भवलं तर लगेच या माणसाचं कौतुक करणारे वरिष्ठ काय, कनिष्ठ काय सारे बाजूला होतात आणि या माणसाला दोष देऊ लागतात. आधीचं काय वाईट होतं, त्यांनीसुद्धा काही विचार करूनच ते ठरवलं असेल - अशा प्रतिक्रिया ऐकू येऊ लागतात. मग ते वेगळेपण नको, असं त्या माणसाला वाटायला लागतं.

परिस्थितीच्या गरजांपोटी, प्रत्येकाच्या कुवतीतल्या फरकापोटी बदल घडले तर त्यात त्या माणसाला अहंकार नसतो, तो इतरांसारखंच स्वत:ला समजतो. मी विशेष काहीच केलेलं नाही असं मानतो, त्यानुसार वागतो. त्यामुळं प्रयत्नांना यश येवो किंवा अपयश येवो, नफा होवो किंवा नुकसान होवो, तो अविचल, शांत राहातो. कारण त्याच्या कृतींनी त्याला वेगळं पाडलेलं नसतं. तो इतरांप्रमाणंच असतो, राहातो.

आपण इतरांसारखेच आहोत, असं मानून जगता येणं ही एक अद्वैतकला आहे. ती कला अशासाठी आहे की, शास्त्रं तर वस्तुस्थिती सांगतात. वस्तुस्थितीप्रमाणं विचार केला तर माणसं वेगवेगळीच असतात, त्यात सांगण्यासारखं काय आहे ? मूलत: माणूस म्हणून सारे एक आहेत,

जोडलेले आहेत - ते कसे हे हुडकून काढणं मात्र सांगण्यासारखं आहे, समजून घेण्यासारखं आहे. ते शास्त्रापेक्षा कलेनं साध्य होतं. म्हणून अद्वैत ही कुसर म्हणजे एक कला आहे.

वेगळेपण जपत अहंकारी होऊन दु:ख वाट्याला येतं. पण अद्वैत - एकत्व लक्षात आलं तर वेगळेपण जाऊन सर्व समान पातळीला येतात. स्वत:बद्दलच्या अपेक्षा अकारण वर जात नाहीत. वर म्हटल्या तशा वेगळेपण जपण्यासाठी अनावश्यक कृती कराव्या लागत नाहीत. त्यापोटी येणारी दु:खं टळतात. इतरांना समजून घेता येतं. त्यानुसार एकमेकांना साह्य करणारी, दिलासा देणारी - अशी कृती करीत राहाता येतं. एकमेकांवर निरपेक्ष प्रेम करून स्वत: आनंदी होता येतं, इतरांना करता येतं.

म्हणून ज्ञानेश्वर माउली एवढे थोर असून वयानं ज्येष्ठ-श्रेष्ठ पण संभ्रमित चांगदेवांना समजून घेऊ शकले, उद्‌बोधक शब्द सांगून आनंदाच्या, भगवंताच्या मार्गावर प्रगत करू शकले. म्हणून श्री माउली म्हणतात तसं प्रत्येकाला मनुष्यजन्माला येऊन मनुष्यमात्रच नव्हे तर सारे जडजीव समान आणि एक आहेत हे कळून तसं वागता आलं नाही तर 'उपजोनी करंटा, नेणे अद्वैतवाटा'च म्हणावं लागेल.

हे ऐक्य, अद्वैत तर बाहेर, दृश्य जगात नाहीच, ते अंतरंगात,अदृश्यात आहे. ते जाणण्याची क्षमता या दुर्लभ नरजन्मात आहे. ते जाणलं तर माणसाचा स्वत:चाच उद्धार आहे. त्याच्यामुळं इतरांचाही आहे.

आपण साध्या व्यवहारात, घरात पाहिलं की सर्वजण एकीनं, एकमतानं, एक विचारानं वागत असतील तर व्यवहार चांगला होतोच , पण तो सर्वांना सुखाचाही ठरतो. मग असा व्यवहार पुढं कुटुंबातला असो, समाजातला असो, देशाचा असो की मानवजातीचा असो, तोही अशाच पद्धतीनं अद्वैत जाणून करण्यानं सुखाचा ठरतो, हा आपला अनुभव

आहे.

अर्थात अशी दृष्टी यायला थोडीतरी परमार्थाची ओळख, देवाची जाणीव, नामाचा अभ्यास असणं उपयोगी होतं. ते असणारे लोक कमीच असतात, याचीही श्री माउलींना कल्पना आहे. म्हणून ते म्हणतात, 'अद्वैत कुसरी विरळा जाणे । '

आपण हे सारं वाचतो, विचार करतो, हरिनाम घेतो म्हणजे त्या भाग्यवान 'विरळा लोकांतले' आपण आहोत, हे लक्षात घेतलं तर धन्यताही वाटेल अन् पुढचा मार्गही दिसेल.

***

तैसे घे अनंता

भगवंताच्या अवताराचं, त्या अवतारात त्यानं केलेल्या लीलांचं, घडलेल्या घटनाप्रसंगांचं वर्णन करणारा एक मोठा ग्रंथ एका गुरूंमुळं त्यांच्या एका चिकित्सक, जिज्ञासू शिष्याच्या हातात आला. त्यानं तो बारकाईनं वाचला. त्याला तो आवडला. त्यानं अनेक वर्षं त्याचा साद्यंत अभ्यास केला. अखेर अभ्यास पूर्ण झाल्यावर तो आपल्या गुरूंकडं गेला आणि त्यांना म्हणाला, 'या अवतारासंबंधीच्या ग्रंथाचा मी सांगोपांग अभ्यास केला. त्यातून मी माझ्या अभ्यासाची ही टिपणं काढली आहेत.'

गुरूंनी त्याच्याकडं आणि त्या मूळ ग्रंथाकडं आणि त्याच्या त्या टिपणांकडं पाहिलं. टिपणं म्हणायची टिपणं, पण ती इतकी मोठी होती की, ती मूळ ग्रंथापेक्षाही जाडीला जास्त होती. गुरूंनी विचारलं, 'या टिपणग्रंथात काय आहे ?' तो गृहस्थ म्हणाला की, हा ग्रंथ कुणी निर्माण केला असावा, त्यातल्या शब्दांवरून तो कुठल्या काळातला आहे, त्यातल्या घटना कितपत सत्य-असत्य आहेत, त्यांतल्या वर्णनांवरून त्या काळातल्या माणसांच्या चालीरीती-जीवनपद्धती कशी होती, त्यांच्यातल्या कुटुंबसंस्था, समाजसंस्था, शासनसंस्था कशा स्वरूपाच्या होत्या - अशा असंख्य विषयांवर मी संशोधन केलं असून ते या ग्रंथात मांडलं आहे.

गुरूंनी विचारलं, 'या कामाला तुम्हाला किती वर्षं लागली ?' त्या गृहस्थानं मोठ्या अभिमानानं सांगितलं की, रात्रंदिवस काम करूनसुद्धा सुमारे बारा वर्षं लागली ! गुरू म्हणाले, 'त्याऐवजी तीच बारा वर्षं त्या अवताराचं नुसतं नाम घेण्यात वेचली असती तर एव्हाना तुमचा उद्धार

झाला असता !'

अशीच अनेकांची स्थिती असते. आता हा ग्रंथ लिहिला गेला होता तो भगवंताचं गुणगान करावं, त्याचं प्रेम लागावं, वाढावं, त्यामुळं त्याच्या गुणांची-आदर्शांची ओढ लागून माणसाचं स्वत:चं जीवन आदर्श व्हावं, भगवंताच्या नामाची आवड लागून त्या मार्गानं त्याचं स्मरण टिकून माणसाचे व्यवहार आदर्श घडावे म्हणून. त्यासाठी वारंवार ते वाचावंही, पण ते त्यांतल्या घटनांचे मथितार्थ लक्षात घेऊन त्यांतून जगलेले आदर्श घ्यावे यांसाठी. पण ते काम बाजूला राहून एकतर माणसं ग्रंथच वाचीत नाहीत, वाचलाच तर वरवर वाचतात, त्यातून त्याचं मंथन केलंच तर असली टिपणं काढण्यात आयुष्य दवडतात. ना लिहिणाऱ्याचा उद्देश सफल होत, ना वाचा म्हणणाऱ्याचा !

म्हणून श्री माउली म्हणतात,'चहू वेदी जाण, साही शास्त्री कारण। अठराही पुराणे हरिसी गाती ।' हे खरंच आहे की, एवढे वेद, शास्त्रं, पुराणं सारे भगवंतासंबंधीच सांगत आहेत. त्याच्या स्वरूपाबद्दल, त्या कर्तृत्वाबद्दल, ज्ञातृत्वाबद्दलच सांगत आहेत. ते सारं वाचण्यासाठी, अभ्यासण्यासाठीच आहे. उलट ते पुढं म्हणतात की, ते सारे ग्रंथ मंथन करण्यासाठी, वारंवार मनन करण्यासाठीच आहेत. पण तेवढंच काही आपलं काम नाही किंवा चुकीच्या किंवा अनावश्यक अभ्यासासाठी मंथन करण्याचंही आपलं काम नाही. हे लक्षात येण्यासाठी श्री माउली पुढं म्हणतात ते खरं शिकण्यासारखं आहे की,'मंथुनी नवनीता तैसे घे अनंता !'

या साऱ्या मंथनातून जर 'भगवंताचं स्वरूप, त्याचं स्मरण, त्याचं प्रेम' हाती लागलं तर उपयोग. लोण्यासाठीही ताकाचं मंथन करावं लागतंच. पण उद्देश लोणी मिळण्याचा असतो. ते मिळेपर्यंत ते काम चालू ठेवणं आवश्यक असतं,दुसऱ्या कशासाठी ते काम करायचं नसतं. इतकंच नव्हे,

तर लोणी गोळा झाल्यावर तेच मंथनाचं काम थांबवावंसुद्धा लागतं. नाहीतर लोणी पुन्हा पातळ होऊन-लोणी आणि ताक दोन्ही पातळ होऊन, बिघडून जाऊ शकतात.

या साऱ्यातून आपल्याला आध्यात्मिक ग्रंथांची गरज कशी आहे, ते वाचताना उद्देश कोणता ठेवावा, वाचण्याची पद्धत कशी असावी, काय करू नये, वाचनानंतर काय घ्यावं, ते आपल्या जीवनात कसं आणावं, वाचनाची आणि भगवंतप्राप्तीसाठी मंथनाची गरज कशी, का व केव्हा असते व ती केव्हा संपते हे सारं उलगडतं.

पुढं तर श्री माउली म्हणतात, 'वाया व्यर्थ कथा सांडी मार्ग' एकदा भगवंत सापडला, त्याचं प्रेम लागलं, नामाची गोडी लागली की, मग वाचन-मंथन सोडून द्यावं.

हे सारेच इशारे आणि मार्गदर्शन अनेकांना उपयोगी आहे. डोळे झाकून, बेसावधपणे वाचनं - पारायणं - मंथनं - अकारण व अनावश्यक अभ्यास करण्यात सारं आयुष्य घालवणाऱ्यांना, वाचन अजिबात न करणाऱ्यांना आणि ते करूनही भगवंताचं नाम न घेणाऱ्यांना-अशा सर्वांनाच श्री माउलींचं म्हणणं उपयोगी ठरेल.

***

खरं मोलाचं काय ?

माणसाला असंख्य अनुभव येतात त्यावरून त्याची मतं, धारणा तयार होतात, पक्क्या होतात. अगदी रोजच्या संबंधातल्या एखाद्या माणसाबद्दलच्या मतापासून - तो चांगला आहे, वाईट आहे - इथंपासून, एखादी वस्तू, घटना, परिस्थिती चांगली, वाईट, हवी, नको, टाळावी अशी अनेक मतं आणि तसे निर्णयही या असंख्य अनुभवांच्या साहाय्यानं तो घेत असतो. या सर्व अनुभवांत त्याची सर्वांत मोठी भिस्त असते ती डोळ्यांवर, प्रत्यक्ष पाहाण्यावर.

आज बाजारात चाकवताची भाजी आली नाही असं कुणी म्हटलं तर तो लगेच सांगतो, तसं नाही, आली आहे. जर दुसरा म्हणाला कशावरून ? तर तो लगेच सांगतो, मी स्वत: जाऊन आलो. त्या मंडईच्या कोपऱ्यातल्या अमुक भाजीवाल्याकडं चाकवत आहे. मी स्वत: प्रत्यक्ष पाहिलं आहे !

त्याच्या दृष्टीनं त्यानं स्वत: पाहिलं आहे म्हणजे ते अंतिम सत्य असतं. इतरही ते मानतात. कारण त्यांनाही डोळ्यांवर विसंबायची सवय असते. स्वत:च्या डोळ्यांखालोखाल दुसऱ्यांच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास असतो. त्यामुळं त्यांनी स्वत: ही भाजी पाहिली नसली तरी या गृहस्थानं ती प्रत्यक्ष पाहिली आहे यावर त्यांचा विश्वास बसतो. ती घटना ते खरी धरून चालतात.

मग ती आणावी म्हणून मंडईत गेलं तर मात्र वेगळं घडू शकतं. कारण या गृहस्थांनी ती भाजी काही स्वत: घेतलेली नसते. फक्त मंडईत फिरताना ती त्यांना लांबून त्या भाजीवाल्याकडं दिसलेली असते. मग

हा गृहस्थ त्या भाजीवाल्याकडं जातो, ती भाजी मागतो तेव्हा कळतं की ती भाजी त्याच्याहीकडं नाही. त्याच्याकडं चाकवत नसून तांदळी असते. त्याच्यासारखी दिसणारी दुसरी भाजी असते. आता प्रत्यक्ष पाहिलेली वस्तूही खात्रीची मानता येणार नाही, हे पटतं. अर्थात अशा ठिकाणी अनुभव घेणारे प्रामाणिक आहेत, स्वत:ची चूक कबूल करणारे आहेत असं गृहीत धरलेलं आहे.

हे भाजीपर्यंत आहे तोवर ठीक आहे. फारसा फरक पडत नाही. पण जेव्हा त्या गोष्टी एखादा माणूस अमुक ठिकाणी होता की नाही, ज्याचं नाव आहे तोच विद्यार्थी परीक्षेला बसला आहे की नाही, प्रत्यक्ष पाहिलेल्या फोटोतल्या एखाद्या दृश्यावरून एखाद्याबद्दल मत ठरवावं की नाही - मग त्यातून एखादा माणूस चांगला किंवा वाईट ठरवावा की नाही - अशा पातळीवर या गोष्टी जातात तेव्हा मात्र विचार करावा लागेल. कारण हा प्रत्यक्ष पाहाण्याचा आधार वाटतो एवढा खरा नाही, हे लक्षात आलेलं असेल.

एखादा माणसासारखा वाटणारा, वेषभूषा असलेला, प्रत्यक्ष पाहिलेला किंवा फोटोत पाहिलेला दुसराच एखादा माणूस ती कृती करीत असेल, माणूस तोच पण मुद्दाम काही हेतूसाठी तो चुकीची किंवा वेगळी वाटणारी कृती करीत असेल - असे अनेक पर्याय संभवतात. त्यामुळं साहजिकच निष्कर्ष बदलतात. बदलणं आवश्यक असतं.

म्हणून सारांशानं हे जे दिसणारं आकार-रंगरूप-उंची-रुंदी असलेलं जग आणि त्यातल्या वस्तू, घटना, कृती आहेत, त्या समोर दिसतात म्हणून त्या खऱ्या मानाव्या, अंतिम सत्य मानाव्या असं नाही. उलट त्या असत्य असण्याची शक्यता आहे. निदान त्या अंतिम सत्य नाहीत, म्हणून अंतिम महत्त्वाच्याही नाहीत. तर याउलट त्या मागं जे सत्य दडलेलं आहे, दिसत

नाही पण आहे, ते खरं लक्षात घेण्यासारखं आहे, अंतिम आहे. म्हणूनच ते खरं महत्त्वाचं आहे, हे कळू लागतं. या अर्थानं विविध आकार धारण करणारं - म्हणजेच सगुण जग - दिसायला, पटायला थेट असलं, प्रभावी असलं तरी त्या मागं असलेलं, न दिसणारं पण जाणवू शकणारं निराकार, निर्गुण जग, तत्त्व, स्थिती या खऱ्या आहेत हे पटू लागतं.

उदाहरणार्थ एखादा माणूस दुसऱ्या माणसाला नमस्कार करताना प्रत्यक्ष बघितला तर त्या 'प्रत्यक्ष' बघण्यानुसार पहिला नम्र आहे, त्याला दुसऱ्याबद्दल आदरभाव आहे - हे निष्कर्ष माणूस काढतो. वरकरणी ते बरोबरही वाटतात, पण पहिल्याचं न दिसणारं, निर्गुण अंतरंग काय सांगतं, त्यात डोकावण्याची गरज आहे. ते खरं आहे - ते भले दिसत नसलं, निराकार असलं तरी.

मुळात नमस्कार सगुण पण तो खरा ठरतो तोही त्या मागचा आदरभाव खरा असेल तरच. तो आदरभाव निर्गुण - निराकार व न दिसणारा असला तरी तोच आदरभाव हा नमस्कार 'खरा की खोटा' ठरवतो. समजा तसं नसेल आणि तो नमस्कार 'देखल्या देवा' असेल, भीतीपोटी असेल, काही लाभासाठी असेल तर तेही सारे भाव आतले, न दिसणारे, निर्गुण असूनही ते जसे असतील तसाच हा नमस्कार दिखाऊ किंवा खोटा ठरतो, हे खरं ना ?

म्हणजे अखेर सगुण दिसत असलं, त्याला आकार असला, त्यानं व्यवहार होत असला तरी त्या मागचं निर्गुण अंतिमतः खरं, महत्त्वाचं आहे, हे लक्षात येऊ शकतं. हीच गोष्ट आपल्या साऱ्या व्यवहाराला व जगाला लागू आहे. जमिनीपेक्षा तिची मालकी, कृतीपेक्षा त्यामागचा भाव, जगातल्या घडामोडींपेक्षा त्यांचा कर्ता अशा गतीनं साऱ्या सगुणापेक्षा निर्गुण कर्ता भगवंतच खरा ठरतो आणि पुढं गेलं तर लक्षात येतं की,तोही इतका व्यापक

व सूक्ष्म आहे की तो या सगुण-निर्गुणाच्याही द्वंद्वापलीकडं आहे. खरा सारभूत आहे, अंतिम सत्य आहे. म्हणून श्री माउली म्हणतात,'त्रिगुण असार निर्गुण हे सार ।'आणि हा विचार सतत मनात जागा ठेवून व्यवहार करणं हा खरा हरिपाठ करणं आहे.

अशा विचारानं केलेला व्यवहार नक्कीच एका उच्च, उदात्त पातळीवर होतो आणि आपलं नेहमीचं संकुचित, दुःखमय, एकांगी जीवन बदलून टाकतो. विशाल व सुखमय करतो.

***

वाउगाचि श्रम व्यर्थ जाय

सर्वसामान्यपणे माणसाला कर्माची आवड आहे. सतत काही तरी उद्योग करण्याचा त्याचा स्वभाव आहे. मग तो उद्योग विशेष विचारपूर्वक केलेला असो, त्याला काही विशिष्ट दिशा किंवा प्रयोजन असो किंवा नसो. म्हणूनच काही न करता स्वस्थ बसवलं तर माणसाला ती मोठीच शिक्षा वाटते. उद्योगानं माणसाच्या आयुष्यात भाग्य येतं हेही खरंच आहे. तरीही सतत काम करण्यानं आपल्यावर काही परिणाम नकळत घडत असतात, याकडं मात्र आपलं लक्ष क्वचितच जातं. ते लक्षात न आलं तरी त्याचे परिणाम किंबहुना दुष्परिणाम आपल्याला भोगावेच लागतात.

त्यातला एक परिणाम मनाच्या ठेवणीवर होतो. तो म्हणजे 'सतत व खूप उद्योग' केल्याशिवाय उपयोग नाही. प्रत्यक्षात 'तारतम्या'चं तत्त्व सगळीकडं लागू असतं. जगण्यासाठी नित्यनेमानं भरपूर खाण्यापिण्याची गरज आहे, हे नक्कीच ! पण ही भूक भागवताना तारतम्य लागतं. नाहीतर अती होणारं जेवण आता आरोग्यकारक न ठरता अनारोग्यकारक ठरतं.

पण या अतिउद्योगाच्या बाबतीत नकळत होणाऱ्या परिणामापेक्षा मनावर होणारा आणखी एक नकळत परिणाम अधिक विचार करायला लावणारा आहे. तो असा की, बराच व्यापताप केल्याशिवाय किंवा खूप कष्ट केल्याशिवाय कुठलीच गोष्ट प्राप्त होऊ शकत नाही, हे मनाला नकळत लागलेलं वळण. किंबहुना मनाला तर असं वाटतं की, मिळवायची गोष्ट जितकी मोठी, मूल्यवान तितके त्यासाठी पडणारे वेळ, पैसा, शक्ती या कर्मांचे एकूण कष्ट जास्त. हा मनाचा साचाच तयार होतो. त्यामुळं या

व्यतिरिक्त काही वस्तुस्थिती असू शकेल हे मानायलासुद्धा साचेबद्ध मन तयार होत नाही.

अशा या साचेबद्ध मनाची अडचण 'खरा आनंद' मिळवण्याच्या मार्गात होते, हे श्री ज्ञानेश्वर माउलींनी नेमकं सुचवलेलं आहे. आपल्याला सतत असमाधान, दुःख, निराशा अनुभवायला येत असतात. अनेक वस्तू, माणसं सारे उपाय आपण भरपूर कष्ट घेऊन करतो. मग कुणी तरी सत्पुरुष आपल्याला सांगतो - अशानं तुम्हाला खरा आनंद मिळणार नाही, अशा अनेक वस्तू नि माणसं गोळा करून तुमचं दुःख दूर होणार नाही. त्याचा मार्ग वेगळा आहे. त्यासाठी आणायचाच असेल तर भगवंत आणा. या साचेबद्ध मनाला वाटतं की ही तर फारच छान युक्ती आहे. किरकोळ तात्पुरतं समाधान देणाऱ्या वस्तू आणायला आपल्याला एवढे श्रम करायला लागले, भगवंत आणायला मात्र आता फारच प्रयत्न करावे लागणार-बराच पैसा, वेळ, ताकत गोळा करावी लागणार, तीर्थव्रतंवैकल्ययज्ञयाग-अनेक साधनांनी नि कष्टांनी हा भगवंत आणावा लागेल.

आणि नेमका इथंच या साचेबद्ध मनाचा अडथळा येतो. श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात, इथं असल्या कष्टाचं काम नाही. उलट 'वाउगाचि श्रम व्यर्थ जाय !' भगवंत मिळवणं अगदीच बिनखर्चाचं, बिनकष्टाचं आहे. कारण ते समजुतीचं नि नामासारख्या सोप्या साधनाचं काम आहे.

अशा वेळी हरिपाठातल्या सूचनेचा खरोखर विचार करून भगवंत सोपा, सुलभ, सहज करणाऱ्या श्री ज्ञानेश्वर माउलींच्या सूचनेचा प्रयोग आपण व्यवहारात करून पाहू का हा खरा प्रश्न आहे !

***

ठायीच समाप्ती

आपला एकूण मानवी व्यवहार पाहिला तर त्यात अनेक सामान्य गोष्टी सर्वत्र दिसतात. त्यातलीच एक म्हणजे माणसाला असलेली शाश्वताची आवड होय. ही आवड म्हणजे टिकाऊपणाची आवड. ही आवड अगदी साध्या साध्या गोष्टींतून नि व्यवहारांतूनसुद्धा व्यक्त होत असते, असं आढळून येईल. बाजारात साधीशी वस्तू जरी घ्यायला गेलं तरी आपण कळत असो किंवा नकळत असो कसा विचार करीत असतो ते पाहा.

पू. बेलसरे बाबांनी दिलेलं उदाहरणच पाहायचं झालं, तर साधं पातेलं खरेदी करायला जाणाऱ्या गृहिणींकडं पाहा. ती गृहिणी पातेलं खरेदी करायला बाजारात गेली तर जास्तीत जास्त जाडजूड नि टिकाऊ आणायचा प्रयत्न करते. भले मग चार पैसे जास्त गेले तरी चालतील. वास्तविक पाहिलं तर मुळात पातेलं हेही नाशिवंत, घेणारी गृहिणीही नाशिवंतच आणि ज्यांच्यासाठी घ्यायचं तेही नाशिवंतच. तरीही ती शाश्वताची ओढ नकळत का होईना काम करीत असते. ती या साऱ्या नाशिवंत नि अशाश्वत गोष्टींच्या जगात शाश्वततेचा शोध घ्यायचा प्रयत्न करीत असते.

ही शाश्वताची ओढ किती किती नि कुठं कुठं काम करीत असते हे पाहिलं तर आश्चर्य वाटेल. कुणीतरी आपल्याला दिलेलं, त्याच्या आवडीचं, आपल्याला काहीही कल्पना नसताना मिळालेलं हे आपलं नावच पाहा. ते टिकवण्यासाठीसुद्धा आपली किती धडपड चाललेली आपल्याला दिसून येईल. ते टिकावं म्हणून माणूस काय काय करतो ? चांगलं वागेल, समाजकार्यच करील, देणग्या देईल, अन्नदान करील, संशोधन करील,

लेखन करील, गायनवादन करील कोणत्या ना कोणत्या मार्गानं आपलं नाव पसरेल, कळेल नि पुढं ते टिकेल याची काळजी घेईल. मंदिर बांधील तर संगमरवरावर आपलं नाव पुढं काही पिढ्या तरी टिकेल असं कोरून ठेवील. इतकंच काय पण कुठल्या चांगल्या मार्गानं ते टिकवता आलं नाही तर वेळी टोकाची वाईट कृत्यं करून का होईना ते टिकवायचा प्रयत्न करणारे महाभागही कमी नाहीत. एखाद्या जागतिक विक्रमांच्या पुस्तकात आपलं नाव यावं नि टिकावं म्हणून आग पचवणारे नि काचा खाणारे लोक आपण पाहातोच ना ?

पण याची दुसरी बाजूसुद्धा आपण काही वेळा पाहातो. काही देणगी देणारे असेही भेटतात की, ते म्हणतात देणगी पाहिजे तर आणखीसुद्धा देऊ पण अट एकच की माझं नाव कुठं येऊ देऊ नका. मला त्याबद्दल सत्कार, नाव, प्रसिद्धी यांतलं काही नको. कारण अनेकदा अशा तऱ्हेनं टिकण्याच्या प्रयत्नामागचा फोलपणा नि भ्रम त्यांच्या लक्षात आलेला असतो. अशा टिकण्याच्या प्रयत्नाला बळी पडण्यातच आपण कर्मात अडकतो, त्यामुळं त्रास नि ताप घडतो. त्यामुळं ते देतात ते दान खरं दान ठरतं. ते देतात नि तो विषय तिथंच संपतो. आपली आठवण, देणगी घेणारा दरवर्षी काढतो की नाही, पाटी केवढी नि कशी लावली आहे याच्या फंदातही ते पडत नाहीत. ते देतात आणि त्या देण्यातच आनंदी होतात. पुढच्या कशातच न अडकल्यानं दु:खी होत नाहीत. उलट असं दान टिकवण्याच्या प्रयत्नात असलेले लोक मात्र देऊनसुद्धा पुन्हा दु:खी नि नाराज राहातात, कारण त्यांच्या नाव टिकवण्याच्या साऱ्या अपेक्षा सर्व काळ जग पुऱ्या करू शकत नाही.

म्हणून जसा टिकवण्याला अर्थ आहे, तसा किंबहुना आनंदाच्या दृष्टीनं पाहिलं तर पुसण्यालाही अर्थ आहे, नव्हे अधिक अर्थ आहे. उलट ते

स्वाभाविक आहे. ते आपोआप घडत असताना मुद्दाम टिकवायला जाणंच अस्वाभाविक आहे. म्हणूनच मुलाबाळांचं काय नि जगाचं काय, करून सोडून देणारा स्वत:ही आनंदी असतो नि इतरांनाही आनंदी करतो, हवासा वाटतो. जी गोष्ट माणसाच्या कर्मांची आहे तीच साऱ्या अनुभवांचीही आहे. कर्म नि त्याचा अनुभव हे ज्यांचे घडतात नि तिथंच नष्ट होतात त्यांना खरा बोध होतो, ते खरे भाग्यवान !

या पार्श्वभूमीवर हरिपाठात श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात की, कापराच्या वातीसारखं व्हावं. 'कापुराची वाती उजळली ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी ।' जीवन तर उजळून जावं पण वातीचासुद्धा मागमूस मागं उरू नये. साध्या कापसाच्या वातीची निदान कापसाची राख तरी मागं उरते. तितकंसुद्धा आपल्या कर्माचं नि अनुभवाचं होऊ नये. कालच्या पुरणपोळीची चव आजची मीठभाकरी खाताना टिकली तर पोट भरायला पुरेशी असूनही आजची भाकरी बेचव नि दु:खाची ठरेल.

म्हणून श्री ज्ञानेश्वर माउलींनी म्हटल्याप्रमाणं कापराच्या ज्योतीनं उजळावं तसं आपलं जीवन आपल्या कर्मांनी, अनुभवांनी जरूर उजळावं पण मागं काही न ठेवणाऱ्या आणि त्यामुळंच पूर्णत्व गाठणाऱ्या त्या कापराच्या ज्योतीसारखं ते जीवन, मागं काही शिल्लक न ठेवल्यानं, पूर्ण आणि आनंदीसुद्धा होऊ द्या.

***

द्वैताचं बंधन

अगदी सामान्य माणसापासून असामान्य माणसापर्यंत सर्वांच्या आयुष्याला व्यापून असणाऱ्या काही नेहमीच्या किंवा सारख्या गोष्टी आहेत. त्यांत सततची भीती, चिंता, सतत वाटत राहाणारी काळजी यांचा नंबर अगदी वरचा म्हणावा लागेल. प्रत्येकाची त्या भीतीची कारणं वेगवेगळी असतील, चिंतेचे-काळजीचे विषय वेगवेगळे असतील पण या गोष्टींचा त्याला दररोज मुकाबला करावा लागतो हे मात्र खरं. याला त्या त्या माणसाची आर्थिक परिस्थिती, हातात असलेली लहान-मोठी सत्ता, आरोग्य, पैसा या स्वरूपाचा भेद वा अपवाद नाही.

अत्यंत गरीबाला चिंता असणं आपल्याला स्वाभाविक वाटतं. पण ज्याला पैशाचं काय करायचं हा प्रश्न पडतो, अशा श्रीमंताला कशाची चिंता किंवा भीती असेल हे कदाचित आपल्याला पटणार नाही. पण तीही वस्तुस्थिती आहे. अन्यथा एक पैसा, सत्ता, आरोग्य किंवा असं काही मिळवणं एवढा एकच एक उपक्रम जगात उरला असता आणि मग अनेक लोकांना तो साधलाही असता. पण तसं घडलेलं दिसत नाही याचं कारण आपण शोधलं पाहिजे.

आश्चर्य हे आहे की, ही अगदी निकडीची आणि जिव्हाळ्याची गोष्ट असूनही कुणी अशा एखाद्या भेडसावणाऱ्या प्रश्नाचा, उदाहरणार्थ भीतीचा, अभ्यास करीत असलेला दिसत नाही किंवा बराच समाज त्या प्रश्नाची उकल करण्यासाठी धडपडतो आहे असं दिसत नाही. पण याला एक सामान्य असं कारणही असावं. ते असं की, एखादा कैदी कित्येक

वर्षं तुरुंगात राहिल्यावर त्याची त्या मूळ दु:खाची जाणीव नाहीशी होते. मग तुरुंगात जाणवणाऱ्या अडीअडचणींवर तो खूप विचार करतो, त्यावर उपाययोजना शोधतो. त्या अंमलात आणण्यासाठी धडपडतो, त्यात त्याला थोडंफार यशही मिळतं, पण त्यात त्याच्यावर असलेल्या तुरुंगाच्या मूळ बंधनाचा जोपर्यंत त्याला उलगडा होत नाही, ती जाणीव होत नाही तोपर्यंत हे सारे वरवरचे उपाय तात्पुरत्या मलमपट्ट्याच ठरतात.

त्या अर्थानं विचार केला तर माणसाचं - मग तो कोणत्याही परिस्थितीतला असो - त्याचं मूळ दु:ख- भय, चिंता, काळजी यामुळं असतं. ते दु:खही पुन्हा मुळात द्वैताच्या बंधनामुळं आलेलं असतं. हे या वरवरच्या अधिक सत्ता, अधिक पैसा, अधिक माणसं मिळवण्याच्या अशा कुठल्याच उपायानं पूर्ण दूर होत नाही. कारण मूळ प्रश्न आपण तुरुंगात म्हणजेच कसल्या तरी बंधनात असण्याचा आहे. त्याला यात उपायच केला गेलेला नाही.

म्हणूनच अशा मूळ प्रश्नाकडं आपल्याला घेऊन जाणाऱ्या, त्याची जाणीव करून देऊन आपल्याला जागृत करणाऱ्या आणि त्यावरचा सोपा, खात्रीशीर उपाय देणाऱ्या श्री ज्ञानोबा माउलींच्या 'हरिपाठां'कडं आपल्याला वळावं लागतं. ते म्हणतात की, माणसाचं सारं दु:ख त्याच्या ठिकाणी असलेल्या द्वैताच्या, दुजेपणाच्या भावामुळं आलेलं आहे, द्वैताच्या बंधनात तो आहे, हे त्याच्या दुर्दैवानं लक्षातही येत नाही.

हे द्वैत मूलत: कुणात आहे ? तर जगाला जन्म देणारी, चालवणारी जी कुणी मूळ सत्ता आहे, ईशशक्ती आहे तिच्यापासून आपण कुणी वेगळे, दुसरे आहोत या भ्रामक समजुतीत आहे. हे तत्त्व म्हणून जरी खूप मोठं वाटलं तरी व्यवहारात ते पदोपदी आपल्याला अनुभवायला येत असतं नाही का ? आपल्या घरच्या माणसांच्यात आणि आपल्यात एकपणा

असेल तर त्यांच्या कुठल्याच निर्णयानं आपल्यात अस्वस्थता, चिंता, दुःख निर्माण होत नाही.आपला एकमेकांच्यातला दृढ विश्वास हे त्या ऐक्याचं किंवा द्वैत नसल्याचं प्रतीक असतं. तर संशय, शंका हे द्वैताचं, अविश्वासाचं प्रतीक असतं. जे असेल ते परिणाम दाखवील.

एकदा एक जहाज समुद्रातून प्रवास करीत होतं. तेव्हा एक प्रचंड वादळ सुटलं. जहाजावरच्या यच्चयावत माणसांची भीतीनं गाळण उडाली. जहाजावरून एक साधू पत्नीसह प्रवास करीत होते. ते या प्रसंगीही भगवंताच्या नामात लीन होते आणि शांतपणे वादळाकडं पाहात बसले होते. त्या साधूंना पाहून त्यांच्या पत्नीनं आश्चर्यानं विचारलं,'काहो, तुम्हांला भीती नाही का वाटत ?' साधूंनी पलीकडं पडलेला कोयता उगारून तिच्या मानेवर ठेवला आणि विचारलं,'तू घाबरलीस ?' ती लगेच उद्‌गारली, 'कशाला घाबरू ? तो कोयता तुमच्या हातात आहे, आपण एक आहोत.' साधू म्हणाले,'हे वादळ हाही त्या परमात्म्याच्या हातातला कोयता आहे. मी कशाला घाबरू ?'

एकत्व आलं की भय नाही. भयाचं बंधन नाही ! असं हे द्वैताचं बंधन तर समजून घ्यावंच पण माउलींचा त्यावरचा 'भगवंताचं नाम' सतत घेण्याचा सोपा उपायही समजून घेणं मोलाचं ठरेल कारण त्यानंच 'द्वैताचे बंधन न बाधिजे' हा अनुभव येईल.

***

वाया येरझार हरिवीण

एका माणसानं एक किराणा दुकान सुरू केलं. काही वर्षं ते चालवलं. त्याची उलाढाल तीनचार लाखांच्या पुढं नव्हती. महिन्याला त्याला प्रपंचापुरते तीन चार हजार मिळत. पुढं त्याला त्याच्या अनुभवी मित्रांनी धंदा वाढवायच्या नाना युक्त्याप्रयुक्त्या शिकवल्या. त्यानुसार यानं सेल लावले, फ्री वस्तू द्यायला सुरुवात केली. कंपन्यांच्या वेगवेगळ्या स्कीममध्ये भाग घेतला. स्वाभाविकपणे याची विक्री-उलाढाल वाढायला लागली. वाढलेल्या व्यापामुळं माणूस नेमावा लागला. व्याप इतका वाढला की, माल ठेवायला जागा पुरेना. शेजारचं दुकान कर्जवेच करून घेतलं. दिवाणजी ठेवला. फर्निचर बदलावं लागलं. याला जेवायला फुरसत मिळेना. तब्येतीवर परिणाम व्हायला लागला. औषधपाणी सुरू झालं.

इकडं घरच्यांच्या स्वास्थ्यावरही परिणाम व्हायला लागला. हातात पडणाऱ्या निव्वळ नफ्यात मात्र त्याला म्हणावी तशी वाढ काही होईना. म्हणून त्यानं ताळेबंद पाहायचा ठरवला. सारी आकडेमोड झाली, तेव्हा लक्षात आलं की उलाढाल दसपटीवर गेली तरी नफा दसपटीवर सोडाच पण दुपटीवरसुद्धा गेला नव्हता. कारण वाढलेल्या धंद्याचं उत्पन्न वाढलेले नवनवे खर्च खाऊन जात होते. स्वत:ला होणाऱ्या व्यापाचा नि घटलेल्या स्वास्थ्याचा विचार केला तर ही नफ्यातली वाढ अगदी नगण्य होती. ग्राहक, विक्री, माल - इतर सारी वाढ मात्र कुठल्या कुठं होती. पण त्या वाढलेल्या उलाढालींना ना आता त्याच्या दृष्टीनं अर्थ उरला होता, ना घरच्यांच्या दृष्टीनं !

याचं कारण उघडच होतं की साऱ्या व्यापामागचा, तो वाढवण्यामागचा खरा अर्थ त्या नफ्यात होता आणि तोच जर पाहिजे तसा होत नसेल तर या नुसत्या फुगवट्याचा उपयोग काय होता ? हे त्या धंद्याचं चित्र तर आहेच पण श्री ज्ञानेश्वर माउली सुचवतात तसं ते एकंदरीत आपल्या अखंड वाढत जाणाऱ्या प्रपंचाचंच चित्र आहे.

एकट्यादुकट्यानं निवांतपणे चाललेल्या प्रपंचाचा व्याप आपण मोठ्या हौसेनं वाढवीत जातो. माणसं जोडतो, हिंडतो, फिरतो. एक असताना अजून दोन नोकऱ्या धरतो, छंद, आवडी, कला जोपासतो, कार्यक्रम करतो, सामाजिक कामं करतो. एक ना दोन नाना व्यवसाय करतो. त्याबद्दल अर्थातच तक्रार करायचं कारण नाही. प्रश्न आहे तो फक्त आपण हे कशासाठी करीत आहोत, हे लक्षात ठेवण्याचा नि त्यानुसार जागरूक राहाण्याचा !

मूळ उद्देश आपला आनंद, समाधान वाढावं हा असतो. कारण या साऱ्या व्यापातला आपला तोच 'खरा नफा' आहे. उलाढाल कितीही पट वाढवायला हरकत नाही. तो ज्याच्या त्याच्या कुवतीचा नि परिस्थितीचा प्रश्न आहे. पण ती उलाढाल जर किफायतशीर होत नसेल म्हणजे जर त्या उलाढालीतून आपल्याला मिळणाऱ्या आनंदात भर पडत नसेल, आपला आनंद त्या प्रमाणात वाढत नसेल तर त्या नुसत्या उलाढालीला कदाचित जग भुलेल, कदाचित आपणही भुलू, पण मूळ आयुष्याचं सार्थक घडणार नाही, हे खचितच !

म्हणून हरिपाठात श्री ज्ञानेश्वर माउली म्हणतात की, समाधान-आनंदरूप ईश्वर - हरी जर त्यात गवसत नसेल, वाढत नसेल किंवा हरवून जात असेल तर त्या प्रपंच व्यवहाराला तर अर्थ नाहीच पण अशा पद्धतीनं जगत राहायचं असेल तर ते नुसतंच पुन्हापुन्हा जन्माला येणं नि पुन्हापुन्हा मरणं ठरेल. ती नुसती निरुपयोगी येरझार ठरेल. ती 'वाया येरझार

हरिवीण !' ठरेल.

या अर्थानं आपणही आपला व्यवहार तपासून पाहण्याची गरज वाटते, नाही का ? व्यवहार वाढवताना आपण कदाचित यामुळं मला मानमान्यता मिळेल, लोक चांगलं म्हणून ओळखू लागतील, आपली सामाजिक, कौटुंबिक, राजकीय पत वाढेल - असे विचार करीत असू - पण या व्यापाच्या वाढीमुळं आपल्या निव्वळ, निर्भेळ आनंदात म्हणजेच त्यातल्या 'हरी'त, 'ईश्वरा'त किती भर पडेल असा विचार करण्याची गरज आहे. तो विचार आपण क्वचितच करीत असतो.

एवढं तरी श्री माउलींच्या या 'वाया येरझार हरिवीण' मुळं करायला आपण प्रवृत्त झालो तर आपल्याला ते खचितच हिताचं ठरेल !

***

हरिनामाचं शस्त्र

माणसाला एका बाजूनं स्वत:चं रक्षण करावं लागतं आणि दुसऱ्या बाजूनं ध्येयाकडं मार्गक्रमणही. माणसाला नकळत आनंदाचं, समाधानाचं, सुखाचं ध्येय असतं, ओढ असते. त्या ध्येयाकडं वाटचाल करताना येणाऱ्या अडचणी दूर करणं आणि योग्य मार्गानं ते ध्येय जवळ करीत राहाण्यासाठी लागणारी शक्ती - सामर्थ्य - गती - सातत्य टिकवणं ही दोनही त्याला करावी लागतात. माणूस सुखाच्या अनेक कल्पना घेऊन लहानाचा मोठा होतो. आजूबाजूच्या माणसांमुळं या सुखाच्या कल्पना घडतात, बनत जातात, अनुभवानं - नव्या संपर्कानं त्या कल्पना बदलतही जातात.

लहानपणी माणसाचं घरदार खाण्यापिण्यात रंगणारं - रमणारं असलं तर या लहान मुलाचीही सुखाची कल्पना आणि ते मिळवण्याचं ध्येय अशा खाण्यापिण्याच्या अधिक वस्तू, भरपूर प्रमाणात, नवनवीन, सतत टिकतील अशा गोळा करण्याचं ठरतं. तेच ही माणसं करमणुकीत रमणारी असली, कुठल्या कलेत, खेळात रमणारी असली तर माणसाच्या सुखाच्या कल्पनाही त्याभोवती घोटाळतात. त्यानुसार आपल्या आपल्या जीवनाची मांडामांड जो तो करतो. या सुखाच्या कल्पना खऱ्या आनंदाच्या, समाधानाच्या कल्पनेकडं जाणं किंवा अधिक बरोबर म्हणायचं तर समाधानाच्या वास्तव ध्येयाकडं जाणं खऱ्या भाग्याचं असतं. सामान्य माणसाला अनेकदा 'निरुपाधिक आनंद', 'खरं समाधान' अशा माणसाच्या खऱ्या ध्येयाचा परिचय खूप वर्षं जगूनही झालेला नसतो, असं आढळेल. मग वाटचाल तर कितीतरी दूरच !

या साऱ्या अडचणींचा विचार करून श्री माउली आपल्याला म्हणतात की, 'एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।' वर म्हटलं तस माणसाला खऱ्या ध्येयाची ओळख नसण्यापासून, ती ओळख झाली तरी ध्येय गाठीपर्यंत अनेक अडचणी आहेत. पण त्या दूर करायला सर्व पातळीवर 'नाम' हा मार्ग आहे.

ते सारभूत असल्यानं तेवढं एक धरून ठेवलं, विशेषत: मनापासून धरून ठेवलं तर आपल्या आजच्या जीवनाची, त्यातल्या खोटेपणाची कल्पना येण्यापासून खऱ्या समाधानाची कल्पना येऊन कृती करण्यापर्यंत सर्व प्रगती मनुष्य या हरिनामाच्या शस्त्राच्या साहाय्यानं करू शकतो. त्या अर्थानं हे शस्त्रही आहे अन् उद्धाराचं शास्त्रही. फक्त देवाचं नाव घेणं ही गोष्ट इतकी साधी आणि सोपी वाटते की ते घेण्यात, धरून ठेवण्यात मात्र हे वर वर वाटणारं सोपेपण हीच एक मोठी अडचण झाली आहे, हे खरं.

त्यामुळं नामाबद्दल, त्याच्या महत्त्वाबद्दल ऐकूनही माणूस ते दृढ धरून ठेवू शकत नाही. नाम घ्यायला लागला तरी सं देह होऊन त्याला असं वाटतं की, हे नुसतं 'रामकृष्णहरी' म्हणण्यानं आपली प्रगती कशी व्हायची त्यामुळं आपण त्याऐवजी काही मोठं करावं.ध्यान - धारणा - वाचन - चर्चा - यात्रा अशी काही जाणवण्यासारखी मोठी साधना करावी. एकदा हे मनानं घेतलं की मग नाम सुटायला वेळ लागत नाही याचीही श्री माउलींना कल्पना आहे म्हणून ते बजावतात 'वाया आणिक पंथा जाशील झणी ।' नामाच्या या सोपेपणामुळं संभ्रम होऊन आपण दुसऱ्या कुठल्या अवघड साधनाकडं आकृष्ट होऊ नये, यासाठी हे लक्षात घ्यावं.

नाम सोपं वाटतं खरं पण त्याचा हा सोपेपणा एका वेगळ्या अर्थानं फसवा आहे. जे उच्चारायला सोपं वाटतं पण त्यात टिकून राहायला ते सर्वांत कठीण आहे. कारण त्यात स्वत:ची अशी कुठली उपाधी, गोडी,

अवघडपणा नाही. माणसाला सोपी गोष्ट बेचव, नीरस, कंटाळवाणी होते. काही आव्हान असलं, बुद्धीला - शरीराला कष्ट असले, काही क्रियाकर्मं असली, मनाचं काही रंजन होत असलं की माणूस त्या गोष्टींत गुंततो. त्यांत त्याला रस वाटतो. त्या दृष्टीन नामात तसं काहीच नाही. त्याला कुठलं लौकिक प्रदर्शन, मोठेपणा नाही की त्यामुळं कुठले मानसन्मान मिळत नाहीत.

अशा अनेक कारणांनी माणूस नामात 'टिकणं' कसं कठीण आहे, हे लक्षात येऊ शकतं. म्हणूनच नामाची थोरवी आपल्या लक्षात येणं कठीण आहे हे जाणून आपल्या सद्गुरू निवृत्तिनाथांचा हवाला देऊन श्री माउली म्हणतात, नाम छोटं, साधं समजू नका. नाम हे थोरवीला आकाशाहून विशाल आहे. ते सारा अणुरेणू व्यापून भगवंतासारखं शिल्लक उरतं एवढं थोर आहे. 'गगनाहुनी वाड नाम आहे।'

तसं पाहिलं तर नामाचं महत्त्व समजून घेताना येणाऱ्या अडचणी यासुद्धा आपल्या देहबुद्धीमुळं, मनावरच्या प्रपंचाच्या संस्कारांमुळं येणाऱ्या अडचणीच आहेत, हे लक्षात येऊ शकतं. देहाला सुखाचं ते सुखाचं, चार लोकांत प्रसिद्धी देणारं, चार पैसे मिळवून देणारं, आपले त्रास कमी करणारं, आपली प्रतिष्ठा वाढवणारं असं सारं प्रपंचात चांगलं वाटतं. तसं काहीच नामानं घडताना दिसत नाही म्हणून त्याच्या महत्त्वाबद्दल शंका येते. तरीही ती शंका किंवा अडचण मनाच्या प्रपंचाच्या ठेवणीमुळं कशी आली आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे.

या आणि अशा साऱ्या अडचणींवर मात करायला पुन्हा नाम हेच शस्त्रासारखं उपयोगी पडतं. नाम कसं आहे, काय कार्य करतं, स्वत:ला कसं अनुभवायला येईल - हे सारे विचार करणं चुकीचं नाही. जरूर करावेत. पण ते विचार करणारे पुन्हा आपणच आहोत म्हणून स्वत:ला

झुकतं माप देणं, भ्रम होणं - या साऱ्या गोष्टी अडचणीच्या ठरू शकतात. म्हणून हे सारे विचार करतानासुद्धा जर सातत्यानं, श्रद्धेनं नाम घेणं चालू ठेवलं तर हेच 'हरिनामाचं शस्त्र' या अडचणी दूर करायला, नामाबद्दलच्या शंकांवर विजय मिळवायला खचितच उपयोगी पडेल.

अनेक बाजूंनी हरिपाठात नामाचं महत्त्व सांगितल्यावरसुद्धा श्री माउली सांगतात, नाम घेतल्याशिवाय राहूच नका. नाम न घेतलं तर आपला जन्म 'व्यर्थ' आहे असं समजा. 'ज्ञानदेवा जिणे नामेवीण व्यर्थ ।'

इतकंच काय रामकृष्णांसारख्या थोर अवतारांनीसुद्धा नामाचाच मार्ग चालला आहे, 'रामकृष्णी पंथ क्रमियेला ।' या खुणेतच आपण काय ते लक्षात घेऊन राहावं आणि नामाचं महत्त्व ओळखून 'जिव्हे वेगु' करून किंवा पुढं 'जपमाळ अंतरी' धरून अविलंब नाम घ्यावं एवढा बोध हरिपाठातून घेतला तरी आपलं कल्याण साधेल.

***

स्वजनांच्या उद्धाराचा मार्ग

माणूस जन्माला येतो तो काही कुणी एक सुटा, कुठले संबंध नसलेला जीव म्हणून जन्माला येत नाही. जन्मदात्या आई-वडिलांपासून सुरुवात होते. जन्मल्या क्षणीच जसे आईवडिलांचे संबंध ठरतात तसेच ते आजीआजोबा, काकाकाकू, मामामामी असे असंख्य जणांचे संबंध ठरतात. त्या त्या व्यक्तीला ते जन्मत:च स्वीकारावे लागतात.

त्याच बरोबर या अर्थानं त्याच्याशी नातेसंबंध नसलेले किंवा त्याच्या कुळातले नसलेले पण नातं असावं तसे संबंधित असलेले काही शेजारी, काही स्नेही, इतर मदतनीस - असेही अनेक लोक असतात, ज्यांचे संबंध जन्मत:च येतात. ते या अर्थानं त्याचे कुटुंबीयच असतात. ते त्याला बालपणापासून मदत करीत असतात. त्यानंतर माणूस मोठा होत जाईल तसा आपण होऊन काही संबंध जोडीत जातो. त्यांत त्याचे स्वत:चे स्नेही, त्याचे शिक्षक, त्याचे पती-पत्नी, त्यांचे नातेवाईक, पुढं मुलं, पुन्हा त्यांचे संबंधी असा एवढा मोठा स्वजनांचा गोतावळा माणसाच्या अवतीभोवती गोळा होत असतो.

पूर्वजन्मातल्या संबंधांमुळं येणारे सूक्ष्म संबंध हा विचार क्षणभर बाजूला ठेवला तरी या जन्माच्या सुरुवातीपासून माणसाच्या जीवनात या वेगवेगळ्या संबंधांचा मोठा प्रभाव पडलेला असतो. माणसाच्या जडणघडणीत, त्याच्या आयुष्यातल्या कमाईत या साऱ्यांचाच मोठा वाटा असतो. ते त्याला वेळोवेळी मदत करतात.

पुढं तो लौकिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्यावर आपल्यावरचं हे ऋण

फेडण्याच्या प्रयत्नाला लागतो. कुणाही कृतज्ञ माणसाला त्याच्या उत्तरायुष्यातल्या कामांचा तो एक आवश्यक भाग वाटतो. त्यापोटी तो वृद्ध आईवडिलांपासून अशा इतर माणसांसाठी राबतो. म्हणजे एक प्रकारे त्याच्या कुळातल्या माणसांसाठी कष्टानं, पैशानं, इतर सर्व शक्तींसह राबतो. त्यांच्या त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा, वेळेला त्यांच्या उपयोगी पडण्याचा माणूस प्रयत्न करतो. यात त्याचं सुसंस्कृतपणही आहे.

अशा तऱ्हेनं आपल्या माणसांसाठी, स्वजनांसाठी प्रयत्न करण्याच्या अनेक कल्पना असतात. कुणाची शरीरकष्टानं मदत करण्याची, कुणाची वेळेला, नडीला त्यांना अर्थिक मदत करण्याची, कुणाची आजारपणात त्यांना औषधपाणी करण्याची - अशा अनेक प्रकारच्या कल्पना असतात. त्या योग्यही आहेत. पण ज्यांना अधिकाधिक उच्च स्वरूपाची मदत करायची असते ते थोडी विचारपूर्वक किंवा नियोजनपूर्वक मदत करू शकतात.

म्हणजे असं की, एखाद्या स्नेह्याची आर्थिक परिस्थिती बरी नसली तर आपण मिळवलेल्या पैशातून त्यांना वेळोवेळी आर्थिक मदत करणं हा एक मार्ग झाला. पण या नडी तर वारंवार येतील, दिलेले पैसे संपतील, पुन्हा नड येईल. यासाठी थोडी अधिक विचारपूर्वक मदत करणारा मनुष्य त्या त्या व्यक्तींच्या परिस्थितीचा - कुवतींचा विचार करील. त्यांना जमण्यासारखा एखादा उद्योग काढून देईल, ते शक्य नसल्यास त्यांना जमण्यासारखी एखादी नोकरी त्यांना लावून देईल. जेणेकरून त्यांच्या कष्टानंच त्यांना पैसा मिळू लागेल, तो नियमितपणे मिळेल आणि त्यांची नड परस्परच भागेल. ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीच होतील. हाच एखादा विद्यार्थी असेल तर त्याला जन्मभर आर्थिक मदत करण्यापेक्षा अशी सुज्ञ माणसं त्याच्या शिक्षणाचा खर्च करून त्याला उद्योगक्षम बनवतील आणि त्याचा आर्थिक प्रश्न कायमचा सोडवतील.

हे मदतीचे विचारी व अधिकाधिक उपयोगी मार्ग असले तरी त्याही मदतींच्या पलीकडं खरी मदत आहे ती अशा आपल्या माणसांच्या कुळाचा 'उद्धार' करण्याची. मनुष्य वर म्हटलं तसा आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र, निश्चिंत होईल. पण मानसिकदृष्ट्या तो कमकुवत असेल, लोभी - स्वार्थी, अहंकारी असेल तर अशा कितीही प्रकारच्या शिक्षण, उद्योग, नोकरी अशा मदती केल्या तरी त्या मदती मर्यादित राहतील. व्यक्ती स्वतः पुन्हा असमाधानी राहील.

म्हणून खरी मदत ही त्या व्यक्तीला अंतिम समाधान, भगवंत गाठून देणं ही ठरेल. ही मदत म्हणजे त्याचा उद्धार. हा उद्धार त्याला पटला तर उद्धाराचे, म्हणजे भक्तीचे मार्ग त्याला गाठून देऊनही ही उद्धाराची मदत करता येईल. पण भक्तीचं महत्त्व त्याच्या लक्षात येत नसलं, तो त्याला तयार नसला तर जी मदत करून त्याला उद्धरता येईल, ती मदत सर्वांत मोठी मदत राहील, हे खचितच पटण्यासारखं आहे.

ती मदत म्हणजे स्वत:च नामानं प्रथम स्वत:चा उद्धार करणं. त्यानंच स्वत:बरोबर त्या कुळातल्या सर्वांचा उद्धार घडत असतो. हे कसं घडतं ते एका उदाहरणानं आपण पाहू. अंधार पडल्यावर माणसाला स्वत:ला खोलीत दिसत नसतं. म्हणून तो स्वप्रयत्नानं दिवा लावतो. त्याच्या प्रकाशात त्याला तर दिसतंच पण त्यानं वेगळं काहीही न करतासुद्धा इतरांना त्याचा प्रकाश मिळून त्यांनाही दिसतं. तसा नाम घेऊन स्वतः उद्धरल्यानं इतरांना फायदा होतो.

श्री माउलींचं म्हणणं असं की, जो स्वतः नाम घेतो तो त्याची कुळपरंपरा शुद्ध करतो. 'ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचे । परंपरा त्याचे कुळ शुद्ध ।' तर 'मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनी ठेले ।' म्हणजे नाम घेणाऱ्याचे आई, वडील, भाऊ, स्वजन - सारे भगवंतमय

होतात.

अशा रीतीनं नाम घेणाऱ्याचा स्वत:चा उद्धार तर होतोच पण त्याच्या सर्व स्वजनांनासुद्धा भगवंताचा, आनंदाचा लाभ घडून त्यांचाही उद्धार होतो आणि ही कुणालाही शक्य असलेली, करावीशी वाटणारी खरी मदत आहे.

हा स्वजनांच्या उद्धाराचा मार्ग चालायला हवा असेल तर आपण स्वत:च भगवंताचं नाम अत्यंत निरपेक्ष प्रेमानं घेऊन स्वत:च उद्धरून जायला हवं !

***

इहलोकीचा स्वर्ग

बरेच दिवसांत विश्वासरावांची भेट नव्हती. एकदोनदा घरी जाऊनही ती झाली नव्हती. तसे ते मोठ्या कंपनीत वरच्या हुद्यावर होते. पैसापाणी उत्तम. स्वभावानं चोखंदळ, रसिक पण वरच्या हुद्यावरच्या व्यापांमुळं, वाढत्या जबाबदाऱ्यांमुळं वेळ उरत नसे. पूर्वी सुट्ट्या तरी मोकळेपणानं घालवीत. आता तर हळूहळू सुट्टी मिळणंसुद्धा दुर्लभ व्हायला लागलं होतं. त्यांची मैत्री जुनी असल्यामुळं एकदोनदा घरी जाऊनही भेट झाली नाही, हा निरोप त्यांना पोचला होता. भेटायला वेळ नसल्यानं त्यांनी फोनवरच भेट घेतली.

तेव्हा कळलं की, ते नव्या मोठ्या आलिशान फ्लॅटच्या व्यापात आहेत. मग त्याचं वर्णन-घरातल्या सुखसोयी, आधुनिक मांडणी, सर्व काही अद्ययावत, बाजूला मोकळी लॉन्स, व्यायामाच्या-पोहण्याच्या सोयी, मुलांसाठी खेळायला जागा - असंख्य गोष्टी त्यांनी फोनवरच ऐकवल्या. ते म्हणाले की, इतक्या सोयी आहेत की, देऊळसुद्धा कॉम्प्लेक्समध्येच आहे. म्हणजे भूलोकीचा स्वर्गच म्हणा ना ! त्यांच्या फ्लॅटची किंमत विचारायचं धाडस मला झालं नाही. कारण आता चाळीसपन्नास लाखांत कुठं काय येतं आहे, हे ते बोलताना म्हणाले होते. ते ऐकूनच अंदाज आला होता. या फोनवरच्या भेटीनंतर पुन्हा त्यांची जवळपास वर्षभर भेट नव्हती. दरम्यान ते नव्या जागेत राहायला गेल्याचंही कळलं.

मग अचानक वहिनीसाहेबांचा फोन आला. पण आवाज दबलेला, काळजीयुक्त. मी नेहमीच्याच उत्साहानं विचारलं, काय म्हणतो तुमचा

भूलोकीचा स्वर्ग ? त्यांनी टाकलेला सुस्कारा मला इथंही ऐकू आला. त्या म्हणाल्या राहतो ती जागा फारच सोयीची आहे हो, पण इथं भीती वाटते. बाहेर सुरक्षावाले. आत माणूस फिरकत नाही. फिरकलं तर त्याच्यापासून भीतीच वाटते. कारण सर्वच बडी मंडळी. चोर-गुंड लक्ष ठेवूनच असतात. एवढ्या उत्तम सुरक्षा व्यवस्थेतूनसुद्धा शेजारच्या इमारतीत एका बड्या माणसाला प्राणाला मुकावं लागलं आणि पैशाला-दागदागिन्यालाही. पूर्वीच्या ठिकाणी जाग होती. माणसं होती, वर्दळ-त्रास होता. पण साधेपणा आणि माणुसकी होती...

मला त्यांच्या त्या स्वर्गाच्या अंतरंगाचं पुढचं वर्णन ऐकू येईनासं झालं. कारण तोवर शहरात आज मुक्कामाला असलेली श्री माउलींची दिंडी चालली होती. टाळमृदंगांच्या घोषात भगवंताच्या नामाचा आनंद दुमदुमत होता.

काही वर्षांपूर्वी जेव्हा विश्वासरावांनी चाळीतली जागा सोडली आणि ते नव्या जागेत गेले त्यावेळीही ते असेच भरभरून बोलले होते. आता नवी जागा म्हणजे जणू स्वर्गच अशी त्यांची कल्पना होती. आज ते गेले ती जागा तर त्यांच्या दृष्टीनं भूलोकीचा स्वर्ग होती. ज्यात प्रत्यक्षात आता भीतीचं, काळजीचं, अस्वस्थतेचं राज्य होतं. ते विसरायला फार तर खाणीपिणी अन् मोठमोठ्यानं टीव्ही लावून त्यावर स्वतःच नाचण्यापलीकडं दुसरे मार्ग नव्हते. त्यात धन्यता मानण्याची पोकळ संस्कृतीही तिथं होती. या स्वर्गांचे रंग कसे नकली असतात आणि त्यामुळं ते कसे उडून जातात ते पाहायला मिळत होते.

इकडं श्री माउलींची अनुभवसिद्ध, पुरातन खात्री प्रकर्षानं आठवत होती की, 'ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केले असे ।' आजही या स्वर्गाचा रंग पक्का आहे. अनुभव खात्रीचा आहे. थोरामोठ्यांचाही आहे

आणि सामान्य गरीबगुरीबांचाही आहे. या साऱ्या विश्वाचा कर्ता-धर्ता असलेल्या आनंदरूप भगवंताचं, सर्वांघटी राहाणाऱ्या, सर्वांच्या अंतर्यामी राहाणाऱ्या भगवंताचं सान्निध्य, हाच या जगात राहूनसुद्धा, सर्वांना स्वर्गाचा अनुभव देणारा मार्ग शतकानुशतकं खुला ठेवलेला आहे.

हा मार्ग भगवंताचं सतत नाम घेण्याचा आहे. नामाच्या रूपानं भगवंताचं सान्निध्य, स्मरण आणि त्या पातळीवरून आपले व्यवहार करण्याचा हा मार्ग आहे. ही भक्तीची वाट चालणारे हजारो वारकरी त्याला आजही साक्ष आहेत.

आपल्या स्वर्गाच्या कल्पना व्यावहारिक आहेत, देहाच्या सुखसोयी वाढवीत नेण्याच्या आहेत. त्यांना कुठलाच थांबा नाही, अंत नाही. म्हणूनच असल्या स्वर्गात या कल्पनेकडून त्या कल्पनेकडं प्रवास करीत आयुष्य काढण्यापलीकडं त्यात काही घडत नाही. प्रत्येक कल्पनेनं काही सुख होतं, उरलेलं दु:खही पदरी येतं. पुन्हा दुसरा डाव मांडून बघायचा, मग तिसरा. असंख्य माणसं हेच करतात. बाहेर व्यवस्था, समाजरचना, वाद, वेगवेगळ्या राज्यपद्धती - अनेक मार्गानं याच कल्पना मोठमोठ्या स्वरूपात अंमलात आणतात. पुढं त्यांच्याही पदरी नवनवे बदल करीत राहाण्यापलीकडं काही पडत नाही.

कारण खरा स्वर्ग असा कुठं बाह्य सुधारणांनी येणार नाही हा श्री माउलींचा अभिप्राय लक्षात न घेतल्यानं हे घडतं. तो स्वर्ग मनाच्या साम्यावस्थेत आहे. शांत अवस्थेत आहे. ती अवस्था मिळवायची साधनं बाहेर नाहीत. मनाला व्यापून उरणारं, त्याला निरामय करणारं, त्याच्या ठिकाणी सुव्यवस्था, तटस्थता निर्माण करणारं नामासारखं साधन त्याला लागतं. म्हणून श्री माउलींचा आग्रह आहे, 'हरिमुखे म्हणा, हरिमुखे म्हणा ।'

सतत उच्चारलेलं भगवंताचं नाम त्याचं स्मरण देतं, त्याच्या गुणांचं मनात स्फुरण ठेवतं, भगवंताचं ध्येय धरतं आणि संकुचित, स्वार्थी, सतत अपेक्षांत अडकलेल्या मनाला बदलतं. त्याला निरपेक्ष, विशाल, नि:स्वार्थी बनवतं, तशा कृतींना प्रेरणा देतं आणि त्यामुळं मग हा इहलोकीचा स्वर्ग हाती येतो. त्यासाठी अर्थातच असल्या पैशाच्या ढिगाऱ्याची अन् सत्तेच्या मनोऱ्यांची गरजच नसते.

म्हणून भक्तिमार्गातला हा स्वर्ग गरीबाच्या झोपडीतही नांदतो आणि श्रीमंताच्या महालातही तो निर्माण होऊ शकतो. त्यासाठी भगवंताचं सतत स्मरण, मन:पूर्वक ध्यान गरजेचं आहे. मग आहे त्या ठिकाणी आनंदाचा स्वर्ग अनुभवायला येऊ शकतो. म्हणून श्री माउलींचा प्रेमळ आग्रह आहे की, 'हरिमुखे म्हणा' आणि तो पाळणं आपल्याच हिताचं आहे.

***

नामधारकांची जीवनकळा

परमार्थाशी परिचित नसलेल्या अनेकांना प्रश्न पडलेला असतो की, नुसतं जगण्यात आणि नाम घेऊन जगण्यात काय फरक पडतो? जगायचं आहे, ते अधिकाधिक चांगलं, उत्तम, फारतर नीतिमान, विवेकी जगावं इथंपर्यंत त्यांना कळू शकतं. पण त्यात हे भगवंताचं नाम वगैरे घेण्याची काय गरज आहे? त्यानं असा काय फरक पडणार आहे ? प्रश्न तसा नेहमीचा आहे. फक्त त्यामागं दोन गोष्टी आहेत की, एकतर स्वत:चं आयुष्य, खाणंपिणं, शिक्षण, घर, कुटुंब, जबाबदाऱ्या आणि एक दिवशी मृत्यू एवढंच गृहीत धरलेलं आहे. तसंच जी माणसं नाम घेतात त्यांच्याही आयुष्यात एवढंच घडताना सामान्यांनी पाहिलं आहे. आणखी फार वेगळं घडत नसेल तर मग नाम घेऊन वेगळं काय साध्य होणार, असा प्रश्न त्यामुळं पडतो हे स्वाभाविक आहे. त्यासाठी थोडा सामान्य माणसाच्या जीवनाचा आणि नामधारकांच्या जीवनाचा विचार करू.

सामान्य माणूस स्वत:च्या सुखाची दृष्टी ठेवून आपली कर्मं ठरवताना व करताना दिसतो. त्यासाठी तो चिकाटीनं प्रयत्न करतो. त्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणं आणि इतर घटकांप्रमाणं यशापयश मिळतं. प्रयत्न करताना परिस्थिती, माणसं, येत चाललेली फळं यांनुसार त्याचं चित्त खालीवर होत असतं. त्याचा परिणाम कर्मांच्या प्रतीवर होत असतो. त्यात लोकांकडून अनेक अपेक्षा तो बाळगतो. त्या अर्थातच पुऱ्या कधीच होत नाहीत. झालेल्यांबद्दल सुख, न झालेल्यांबद्दल दु:ख, पुऱ्या व्हायच्या असलेल्या अपेक्षांबद्दल सतत चिंता, अपेक्षा पुऱ्या न करणाऱ्यांबद्दल राग

-अशी अनेक आंदोलनं सामान्य माणूस नित्य सहन करीत असतो. माणूस, जग हे असंच असल्यानं हे असंच होणार अशी त्याची पक्की समजूत असते.

खऱ्या अर्थानं, समजून नाम घेणाऱ्याच्या जीवनाला भगवंताचं परिमाण असतं. त्याच्याही वाट्याला परिस्थिती-माणसं-कर्मं सारं आलेलं असतं. पण नित्य नाम घेत असल्यानं त्याचं ध्येय नुसतंच स्वतःच्या सुखाची काळजी आणि त्यानुसार अविश्रांत कर्मं हे नसतं. त्याचं मूळ ध्येय - ज्याचं स्मरण तो करतो तो अंतर्यामीचा भगवंत नेहमी जागा राहून हे सारं कसं घडेल, त्या भगवंताचं दर्शन, भेट-निदान अंतर्यामीच्या भगवंताशी तादात्म्य कसं घडेल - हे असतं. त्यामुळं जिथं कर्मं निवडण्याचा प्रश्न आहे तिथं तो अशीच कर्मं निवडतो की जी त्याच्या या भगवत्प्राप्तीच्या ध्येयाला अनुकूल असतील. नसतील तर तो ती धैर्यानं बाजूला सारू शकतो.

नाम म्हणजे भगवंताचा म्हणजे संकेतानं दुसऱ्यांचा विचार. त्यामुळं कर्मं निवडताना-करतानासुद्धा तो इतरांच्या हिताचा, लाभाचा विचार करून ती निवडतो, करतो. मला पैसा हवा म्हणून तो कुठलाही अवैध व्यवसाय करू शकत नाही. वेळी तो स्वतः भुकेला राहील. कारण नामानं स्वतःच्या देहापासून वेगळं राहाण्याची, निदान त्याच्याकडं थोडंफार तटस्थतेनं बघण्याची विद्या येते. त्यामुळं तो इतरांचं अहित करतील असे व्यसनांशी निगडित अशा तऱ्हेचे व्यवसाय करीत नाही. नोकरीत असेल तर मालकाकडून त्याला मिळालेल्या पगाराचा पुरेपूर मोबदला परत कसा करता येईल याचा तो विचार करतो. तितके श्रम तो आपण होऊनच करतो. त्यासाठी त्याला कायदेकानूंच्या आणि नियंत्रणांच्या बडग्याची कधी गरज लागत नाही.

त्यानं केलेली अशी कर्मं यशस्वी झाली तरी नामानं त्याला पुन्हा भगवंताच्या खऱ्या कर्तृत्वाचं स्मरण होतं आणि त्या त्या कर्मांचं

यशसुद्धा तो भगवंताकडं देतो. त्यामुळं त्याचा त्याला अहंकार राहात नाही. कुणी त्याबद्दल चांगलं म्हणावं, प्रशंसा करावी - अशा एरवीच्या सामान्य माणसासारख्या अपेक्षाही त्याला वाटत नाहीत. निरपेक्षपणे वागल्यामुळं इतर लोकांचे संबंधसुद्धा चांगले राहातात. स्वतःचं समाधानही कायम राहातं.

ज्या ठिकाणी कर्मांच्या निवडीला वाव नसतो तिथंही त्याला नाम घेत असल्यानं ती कर्मं टाळावी, चुकवावी असं वाटत नाही किंवा ती करताना सामान्य माणसासारखी त्याला नाराजी, त्रागा नसतो. त्याच्या दृष्टीनं प्रारब्ध किंवा आपल्याच पूर्वकर्मांनी ती वाट्याला आलेली असल्यानं त्या त्या जबाबदाऱ्या पुऱ्या करून आपलं ऋण आपण फेडल्याचा आनंद त्याला होतो. कारण तो ज्या भगवंताचं नाम घेतो त्याच्या व्यवस्थेप्रमाणंच ती कर्मं योग्य म्हणून त्याच्या वाट्याला आली आहेत अशी त्याची धारणा असते.

सामान्य माणसाला कर्मं पूर्ण झाली तरी त्यांच्यातून, त्यांच्या सुखदुःखातून बाहेर येता येत नाही. परिणामी अनेकदा माणसं वर्षानुवर्षं त्याच त्याच घटना सांगतात, त्यांची त्यांची सुखदुःखं धरून बसलेली दिसतात. नामधारक मात्र एक तर प्रत्येक कर्म केलं की ते भगवंताला अर्पण करतो. त्यामुळं त्या कर्मांतून तो मोकळा होतो. दुसरं म्हणजे त्याला या लौकिक कर्मांपलीकडं रोज नामाकडं परतायचं असतं. ते तो करतो. सामान्य माणसाला त्या कर्मांशिवाय कुठलं ध्येय नसतं. त्यामुळं तो त्यांत आणि त्यांच्या हेलकाव्यातच असतो, राहातो.

असे एक ना दोन अनेक फरक दोघांच्या आयुष्यात असतात. म्हणून वरकरणी दोघांचीही आयुष्यं सारखी दिसत असली तरी नाम घेणाऱ्याच्या अंतर्यामात, ठेवणीत खूप फरक असतो. या अर्थानं नाम

घेणाऱ्याला याच जीवनात अंतर्यामी शांतता, आनंद, समाधानरूपी अमृताचा लाभ नित्य, निरंतर होत असतो.

म्हणून श्री माउली म्हणतात, भगवंतावर श्रद्धा ठेवून नाम घेणाऱ्यांची जीवनकळा आगळी असते. ती अमृतमय असते. 'नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ।' एखाद्या योग्याला जशी अमृतसिद्धी येते तशी नाम घेणाऱ्याला आनंदी जीवनाची कला व आनंदसिद्धी प्राप्त होते.

नामधारकांच्या आणि सामान्यांच्या जीवनकळेतला सर्वांत मोठा अनुभवसिद्ध फरक असा की, नामानं जिवंत आणि जवळ केलेला भगवंत एका क्षणी नामधारकाचं जीवन स्वत:च्या पूर्ण हातात घेतो. त्यानंतर भगवंत ते जीवन कसं उत्तम चालवतो ते नामधारक तटस्थतेनं, पूर्ण आनंदानं याचि देही पाहातो, ती नामधारकाच्या जीवनकळेतली पूर्णकळा होय. ही सामान्यांनाच काय पण योग्यांनाही दुर्लभ कळा होय.

श्री माउलींचा हा अभिप्राय लक्षात घेऊन, आपण नामात राहून आनंदानं जगण्याचा अनुभव घ्यावा, हे खरं !

***

❊ श्री ज्ञानेश्वरांचा हरिपाठ ❊

॥ १ ॥

देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ।।१।।
हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।
असोनी संसारीं जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा।।३।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें । द्वारकेचे राणे पांडवां घरीं ।।४।।

॥ २ ॥

चहूं वेदीं जाण साही शास्त्रीं कारण । अठराही पुराणें हरिसी गाती ।।१।।
मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वाया व्यर्थ कथा सांडी मार्गु ।।२।।
एक हरि आत्मा जीवशिवसमा । वाया तूं दुर्गमा न घालीं मन ।।३।।
ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ।।४।।

॥ ३ ॥

त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ।।१।।
सगुण निर्गुण गुणाचें अगुण । हरिवीण मन व्यर्थ जाय ।।२।।
अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार । जेथोनि चराचर त्यासी भजे ।।३।।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मोनी पुण्य होय ।।४।।

॥ ४ ॥

भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति । बळेंवीण शक्ति बोलूं नये ।।१।।
कैसेंनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहे निवांत शिणसी वाया ।।२।।
सायासे करिसी प्रपंच दिननिशीं । हरीसी न भजसी कवण्या गुणें ।।३।।
ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें ।।४।।

॥ ५ ॥

योग याग विधि येणें नोहे सिद्धि । वायाचि उपाधि दंभ धर्म ।।१।।
भावेंवीण देव न कळे नि:संदेह । गुरुवीण अनुभव कैसा कळे ।।२।।
तपेंवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त । गुजेंवीण हित कोण सांगे?।।३।।
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूचे संगती तरणोपाय ।।४।।

॥ ६ ॥

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभवें ।।१।।
कापुराची वाती उजळली ज्योति । ठायींच समाप्ति झाली जैशी ।।२।।
मोक्षरेखें आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ।।३।।
ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं । हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्त्वीं ।।४।।

॥ ७ ॥

पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणें अभक्तांसी ।।१।।
नाहीं ज्यासी भक्ति तो पतित अभक्त । हरिसी न भजत दैवहत ।।२।।
अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैचा दयाळ पावे हरि ।।३।।
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ।।४।।

॥ ८ ॥

संतांचे संगति मनोमार्ग गति । आकळावा श्रीपति येणें पंथे ।।१।।
रामकृष्ण वाचा भाव हा जिवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ।।२।।
एकतत्त्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ।।३।।
नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ।।४।।
सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ।।५।।
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ।।६।।

॥ ९ ॥

विष्णुविणे जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥
उपजोनि करंटा नेणें अद्वैत वाटा । रामकृष्णीं पैठा कैसा होय ॥२॥
द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान । तया कैचें कीर्तन घडे नामीं ॥३॥
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें ॥४॥

॥ १० ॥

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमी । चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ ॥१॥
नामासी विन्मुख तो नर पापिया । हरिवीण धांवया न पवे कोणी ॥२॥
पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक । नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

॥ ११ ॥

हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥
तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरि ॥२॥
हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा भये याचे ॥३॥
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

॥ १२ ॥

तीर्थ व्रत नेम भावेंवीण सिद्धि । वायाचि उपाधि करिसी जना!॥१॥
भावबळें आकळे येर्‍हवीं नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरि ॥२॥
पारियाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझें हातीं ॥४॥

॥ १३ ॥

समाधि हरीची समसुखेंवीण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥
बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें । एका केशवराजें सकळ सिद्धि ॥२॥
ऋद्धि सिद्धि निधि अवघीच उपाधि । जंव त्या परमानंदी मन नाहीं ॥३॥
ज्ञानदेवी रम्य रमलें समाधान । हरीचें चिंतन सर्वकाळ ॥४॥

॥ १४ ॥

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टीं ॥१॥
रामकृष्ण उच्चार अनंत राशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥२॥
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तयां मोक्ष ॥३॥
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥

॥ १५ ॥

एक नाम हरि द्वैत नाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।।१।।
समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शम दमा वरी हरि झाला ।।२।।
सर्वांघटीं राम देहांदेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ।।३।।
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ।।४।।

॥ १६ ॥

हरि नाम जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ।।१।।
रामकृष्ण नामीं उन्मनी साधिली । तयासी लाधली सकळ सिद्धि ।।२।।
सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंचीं निवाले साधुसंगें ।।३।।
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । येणें दशदिशा आत्माराम ।।४।।

॥ १७ ॥

हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ।।१।।
तपाचे सामर्थ्यें तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ।।२।।
मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनी ठेले ।।३।।
ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ।।४।।

॥ १८ ॥

हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन । हरिविण सौजन्य नेणें कांहीं।।१।।
तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटण ।।२।।
मनोमार्गें गेला तो येथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ।।३।।
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ।।४।।

॥ १९ ॥

वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन । एक नारायण सार जप ।।१।।
जप तप कर्म हरिविण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ।।२।।
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ।।३।।
ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेलें ।।४।।

॥ २० ॥

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोटी गेलीं त्यांचीं ।।१।।
अनंत जन्मांचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।२।।
योगयाग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ।।३।।
ज्ञानदेवीं यज्ञयाग क्रिया धर्म । हरिविण नेम नाहीं दुजा ।।४।।

॥ २१ ॥

काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाही उद्धरती ॥१॥
रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥२॥
हरि नाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या दैवाची कोण वानी?॥३॥
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥

॥ २२ ॥

नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयांजवळी ॥१॥
नारायण हरि नारायण हरि । भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥
हरिविण जन्म तो नरकचि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहुनी वाड नाम आहे ॥४॥

॥ २३ ॥

सात पांच तीन दशकांचा मेळा । एकतत्त्वीं कळा दावी हरि ॥१॥
तैसें नव्हे नाम सर्वत्र वरिष्ठ । येथें कांहीं कष्ट न लागती ॥२॥
अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथेंहि मनाचा निर्धारु असे ॥३॥
ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

॥ २४ ॥

जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥१॥
न सोडी हा भावो टाकी रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ॥२॥
जात वित्त गोत कुळ शीळ मात । भजे कां त्वरित भावनायुक्त ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । वैकुंठभुवनीं घर केलें ॥४॥

॥ २५ ॥

जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं । हरि उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ॥१॥
नारायण हरि उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥
तेथील प्रमाण नेणवे वेदांसी । ते जीवजंतूंसी केवीं कळे ?॥३॥
ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असें ॥४॥

॥ २६ ॥

एकतत्त्व नाम दृढ धरी मना । हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥
तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद । वाचेसी सद्‌गद जपे आधी ॥२॥
नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वाया आणिक पंथा जाशी झणीं ॥३॥
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं । धरोनी श्रीहरि जपे सदा ॥४॥

॥ २७ ॥

सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी । रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥
लटिका व्यवहार सर्व हा संसार । वाया येरझार हरिविण ॥२॥
नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णीं संकल्प धरुनी राहे ॥३॥
निजवृत्ति हे काढी सर्व माया तोडी । इंद्रियां सवडी लपू नको ॥४॥
तीर्थींव्रतीं भाव धरी रे करुणा । शांति दया पाहुणा हरि करी ॥५॥
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥

***

हरिपाठासारख्या प्राचीन वाङ्मयाविषयी अनेक अभ्यासक व संशोधक सातत्यानं काम करीत आहेत. अशा कामांच्या संदर्भात पाठभेद हा स्वतंत्र विषय असला तरी श्री माउलींचा हरिपाठातला समाप्तिसूचक अठ्ठाविसावा अभंग मध्यप्रदेशातील हस्तलिखितात व किंचित फरकानं सुमारे तीनशे वर्षांपूर्वीच्या जयरामस्वामींच्या मठातील हस्तलिखितात मिळाला असल्याचं साधार विवेचन ज्येष्ठ अभ्यासक प्रा. कृष्णा गुरव यांनी स्वीकार्यपणे मांडलं असून त्यासंबंधीचे मूळ लेख 'पैलतीर दिवाळी, १९९६' व 'कैवल्य दिवाळी, २००५' या अंकांत जिज्ञासूंनी पाहावे अशी विनंती आहे. हे संशोधन माझ्यापर्यंत पोचविणारे अभ्यासक डॉ. ना. कृ. भिडे यांचे व प्रा. गुरव यांचे आदरपूर्वक आभार मानून जिज्ञासूंसाठी हा अठ्ठाविसावा अभंग 'हरिपाठपराग'च्या या दुसऱ्या आवृत्तीत खाली दिला आहे. हरिपाठाच्या नव्या आरतीत मात्र तदनुरुप बदल सध्या केलेला नाही.

नाहीं न्यास मुद्रा ध्यानादी आसन । उघडचि निधान हरिनाम ॥१॥
हरिनामावीण कासयासी जीण । त्याहुनी मरण तेचि भलें ॥२॥
धन्य तेचि जगी येक हरिभक्त । नामासि गर्जत वेळोवेळां ॥३॥
नेणे क्रिया कर्म दान आणि धर्म । नाम परब्रह्म ज्ञानदेवीं ॥४॥

*

श्री ज्ञानेश्वरांची आरती

जय देव जय देव श्री ज्ञानेश्वर ।
योग्यांची माउली, भक्तांची सावली, देव साकार ।।
जय देव जय देव ।।धृ।।

भक्तीचा कैलास, ज्ञानसागर ।
ज्ञानेश्वर माझा प्रेमपाखर ।
ज्याला त्याला वाटे अपुला आधार ।
नाही झाली असली माउली थोर ।।१।।

जाणत असुनी गीता वेदार्थ सगळा ।
वंचित जीवांसाठी जीव कळवळला ।
ज्ञान सोपे करुनी अनुभवही दिधला ।
पसायदाने जीव शांत हा केला ।।२।।

धाक वेदज्ञांना, पाखंडी जना ।
अव्यक्ताची सत्ता दावी सर्वांना ।
देवमार्गी कोणी मोठा ना साना ।
दिंडीने विठ्ठल भेटे सर्वांना ।।३।।

साहुनी दुःख, बोल अज्ञ जीवांचे ।
हरिपाठे कल्याण केले सर्वांचे ।
ज्ञानेश्वरी अमृत अपुल्या भाषेचे ।
भाग्य दीना कळु दे काय हे अमुचे ।।४।।

*

श्री हरिपाठाची आरती

आरती हरिपाठा । झाल्या सोप्या भक्तिवाटा ।।
आरती हरिपाठा ।।धृ।।

सत्तावीस सुमनांची । कल्याणार्थ माळ झाली ।
ज्ञानदेवे कृपा केली । भक्तां नित्यसंध्या झाली ।।१।।

हरिपाठ संकीर्तन । देवकीर्तीचे गायन ।
मुखे हरि उच्चारण । थोर घडते साधन ।।२।।

नाम हाचि दिव्य मार्ग । सुखे घरा येई स्वर्ग ।
द्वैत, भेद होई त्याग । सर्व विष्णुमय जग ।।३।।

जीवनाचे सार वाटिले । गूढ तत्त्व सोपे केले ।
दीन जीव धन्य झाले । हरिनामे उद्धरले ।।४।।

*

(ही आरती ऐकण्यासाठी येथील ऑडिओ
डीव्हीडी क्र.७ मधील ट्रॅक नं.११८ कृपया पाहावा.)

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***



हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा । हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा ।